सोलापूर तरुण भारत

Solapur Tarun Bharat

न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर शनिवार, दि. २३ ऑगस्ट २०२५ | वर्ष - तिसरे | अंक १४१ | पाने : ८ | किंमत रु. ६/- www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# सायबर हल्लेखोरांच्या यादीत भारत जगात अव्वल

नवी दिल्ली: भारतासाठी एक अत्यंत चिंताजनक बाब समोर आली आहे. स्विस सायबर सुरक्षा फर्म 'ॲक्रोनिस'ने नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या अहवालानुसार, सायबर हल्ल्यांच्या यादीत भारताने ब्राझील आणि स्पेनला मागे टाकले असून, सायबर हल्लेखोरांचे भारत सर्वात मोठे लक्ष्य बनले आहे.

अहवालात दिलेल्या माहितीनुसार, २०२५ मध्ये भारतात सायबर गुन्ह्यांच्या घटनांमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. विशेषत: विंडोज ऑपरेटिंग सिस्टम वापरणाऱ्या उपकरणांवर होणाऱ्या मालवेअर हल्ल्यांचे प्रमाण भारतात सर्वाधिक आहे. मे महिन्यात हे प्रमाण १२.४ टक्के होते, जे जूनमध्ये वाढून १३.२ टक्क्यांवर पोहोचले आहे. हा आकडा जगभरातील देशांपेक्षा जास्त आहे.

याशिवाय, अधिकृत ईमेलवर होणाऱ्या सायबर हल्ल्यांमध्येही वाढ झाली आहे. २०२४ च्या सुरुवातीला २० टक्के असलेले हे हल्ले २०२५ च्या पहिल्या सहामाहीत २५.६ टक्क्यांवर पोहोचले आहेत. सायबर गुन्हेगार आता क्रेडिट कार्ड आणि पासवर्डसारखी वैयक्तिक माहिती चोरण्यासाठी आर्टिफिशियल इंटेलिजन्स सारख्या अत्याधुनिक साधनांचा वापर करत आहेत.

अहवालात असेही म्हटले आहे की, जनरेटिव्ह एआयमुळे सायबर गुन्हेगारांसाठीचे तांत्रिक अडथळे कमी झाले आहेत. यामुळे फिशिंग ईमेल, बनावट इनव्हॉइस आणि अगदी डीपफेक स्कॅमही शोधणे अधिक कठीण झाले आहे. कोविड-१९ नंतरच्या 'हायब्रिड वर्क मॉडेल'मुळे अनेक कंपन्यांच्या सिस्टीम असुरक्षित बनल्या आहेत, असे 'ॲक्रोनिस'चे भारत आणि दक्षिण आशियाचे महाव्यवस्थापक राजेश छाब्रा यांनी सांगितले.

भारतातील उत्पादन, माहिती तंत्रज्ञान, सेवा आणि दूरसंचार उद्योग हे सायबर हल्ल्यांच्या सर्वात मोठ्या धोक्यात आहेत. मालवेअर हल्ल्यांद्वारे हॅकर्स डिव्हाइसचा ताबा घेतात. भारताच्या वाढत्या डिजिटल व्यवहारांमध्ये सायबर सुरक्षिततेकडे अधिक लक्ष देण्याची गरज असल्याचे या अहवालातून स्पष्ट झाले आहे.

## ६० कोटींची सायबर फसवणूक! ९४३ बँक खात्यांचा वापर, १२ आरोपींना ठोकल्या बेड्या

मुंबई: मुंबई पोलिसांनी एका मोठ्या सायबर फसवणुकीचा पर्दाफाश केला आहे. या फसवणुकीमध्ये एका जोडप्यासह १२ जणांना अटक करण्यात आली आहे. यासाठी संबंधित आरोपींनी बँक खाती आणि सिम कार्ड खरेदी करून देशभरातील अनेक लोकांची फसवणूक केली आहे. ज्यामध्ये तब्बल ६०.८२ कोटी रुपये लांपास केल्याने सर्वत्र खळबळ उडाली आहे. पोलिसांच्या मते, आरोपींनी बँक खाती आणि सिम कार्ड खरेदी करून ही फसवणूक केली. सदर कारस्थानासाठी संबंधित आरोपींनी तब्बल ९४३ बँक खात्याचा वापर केल्याची माहिती सूत्रकडून मिळाली आहे. , त्यापैकी १८० खाती फसवणुकीसाठी वापरण्यात आली आहे. ही टोळी डिजिटल अरेस्ट आणि ऑनलाइन शॉपिंग फसवणुकीत बिलंदर होती. वृत्तसंस्थेच्या वृत्तानुसार, मुंबई गुन्हे शाखेच्या पथकाने १२ ऑगस्ट रोजी कांदिवली परिसरात छापा टाकला आणि पाच आरोपींना अटक केली. तपासात असे दिसून आले की या टोळीने आतापर्यंत ९४३ बँक खाती खरेदी केली आहेत, त्यापैकी १८० खाती फसवणुकीसाठी वापरली गेली. आरोपी ७ ते ८ हजार रुपयांना बँक खाती आणि सिम कार्ड खरेदी करायचे आणि नंतर डिजिटल अरेस्ट, ऑनलाइन शॉपिंग आणि शेअर ट्रेडिंग फसवणूक यासारख्या गुन्ह्यांमध्ये त्यांचा वापर करत असत.

# बिहार निवडणूक: मतदार यादीतील नावांसाठी आधार कार्ड आता वैध

नवी दिल्ली: बिहारमध्ये आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सुरू असलेल्या विशेष मतदार पुनरावृत्ती प्रक्रियेसाठी आता आधार कार्डलाही वैध ओळखपत्र म्हणून मान्यता देण्यात आली आहे. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या या महत्त्वाच्या निर्णयामुळे निवडणूक आयोगाला मोठा धक्का बसला आहे. याआधी निवडणूक आयोगाने आधार कार्डला या प्रक्रियेतून वगळले होते, ज्याला 'इंडिया' आघाडीने विरोध दर्शवला होता.



निवडणूक आयोगाने बिहारमध्ये १ ऑगस्ट रोजी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध केली होती, ज्यातून सुमारे ६५ लाख मतदारांची नावे वगळण्यात आली होती. ही नावे मृत किंवा दोन ठिकाणी नोंदणीकृत असलेल्या मतदारांची असल्याचे आयोगाने सांगितले होते. या प्रक्रियेत मतदारांची पडताळणी करण्यासाठी पॅन कार्ड, गुणपत्रिका यांसारखी ११ कागदपत्रे ग्राह्य धरली जात होती. मात्र, आधार कार्ड आणि मतदार ओळखपत्र या यादीतून वगळल्यामुळे मोठा वाद निर्माण झाला होता.

यावर, अधिवक्ता बरुण सिन्हा यांनी सर्वोच्च न्यायालयात निवडणूक आयोगाचा स्थिती अहवाल सादर केला. न्यायालयाने सर्व राजकीय पक्षांना त्यांच्या 'बीएलओ' यांना निवडणूक आयोगाला सहकार्य करण्याचे निर्देश दिले आहेत, जेणेकरून मतदार यादीचे पुनरावलोकन लवकरात लवकर पूर्ण होईल.

नोव्हेंबर-डिसेंबरमध्ये बिहारमध्ये विधानसभा निवडणुका होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर, केवळ वैध मतदारच मतदान करू शकतील यासाठी ही प्रक्रिया राबवली जात आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या या आदेशामुळे आता आधार कार्डचा वापर करून मतदार यादीतील नावे पुन्हा तपासणे सोपे होईल, असे मानले जात आहे.

# मुंबईतील इस्कॉन मंदिराला बॉम्बने उडवण्याची धमकी, सुरक्षा वाढवली

मुबई: मुंबईत पुन्हा एकदा दहशत पसरवण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. गिरगाव येथील प्रसिद्ध इस्कॉन मंदिराला धमकीचा ईमेल मिळाल्यानंतर ही खळबळ उडाली. हा ईमेल थेट मंदिराच्या अधिकृत मेल आयडीवर पाठवण्यात आला, त्यानंतर मंदिर प्रशासनाने तात्काळ पोलिसांना आणि बॉम्ब पथकाला याची माहिती दिली.



माहिती मिळताच पोलिस पथक घटनास्थळी पोहोचले आणि संपूर्ण मंदिर परिसराची कसून तपासणी करण्यात आली. बॉम्ब शोधक आणि निकामी पथकाने (इऊऊड) देखील शोध मोहीम राबवली. मंदिर परिसरात किंवा आजूबाजूला कोणतीही संशयास्पद वस्तू सापडली नाही.

दरम्यान, ईमेलची चौकशी करताना सदर मेलमध्ये धमकीचे शब्द वापरले गेले असल्याची सांगण्यात आले आहे. त्यामुळे कोणताही संभाव्य अनुचित प्रकार घडू नये यासाठी परिसरात सुरक्षा अधिक तैनात करण्यात आली आहे. गिरगाव येथील इस्कॉन मंदिरात मोठ्या संख्येने भाविक दर्शनासाठी येतात. अशा परिस्थितीत, धमकीचा ईमेल मिळाल्यानंतर खबरदारी म्हणून सुरक्षा वाढवण्यात आली. या प्रकरणाचा तपास गांवदेवी पोलिस ठाण्यात दाखल करण्यात आला आहे आणि सायबर सेलच्या मदतीने मेल पाठवणाऱ्याचा शोध घेण्याचे प्रयत्न सुरू आहेत. यासंदर्भात संबंधित पोलिस अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे, की सुरुवातीच्या तपासात कोणताही ठोस सुगावा लागला नाही, परंतु मेल पाठवणाऱ्याचा शोध घेतला जात आहे.

# तिरंगा फडकवल्याने तरुणाची हत्या; नक्षलवाद्यांच्या क्रूरतेने गावात शोककळा, एकमेव शिक्षित तरुण ठार

छत्तीसगड : छत्तीसगडमध्ये नक्षलवाद्यांच्या (छुरश्रळींश -ींरलज्ञ) अमानुष कृत्यामुळे पुन्हा एकदा भीती आणि संतापाची लाट उसळली आहे. कांकेर जिल्ह्यातील बिनागुंडा गावात १५ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्य दिनानिमित्त राष्ट्रीय ध्वज फडकावल्यामुळे मुनेश नूरूटी या तरुणाची निर्दय हत्या करण्यात आली. देशभरात स्वातंत्र्य दिनाचा उत्साह आणि देशभक्तीचे वातावरण अनुभवले जात असताना, या दुर्दैवी घटनेने बस्तर विभागातील नक्षलवाद्यांच्या क्रौर्याला आणखी अधोरेखित केले आहे. स्थानिकांच्या माहितीनुसार, मुनेश नूरूटीने आपल्या गावात अभिमानाने राष्ट्रीय ध्वज फडकावला होता. ही घटना नक्षलवाद्यांना न जुमानता, देशप्रेमाची जाणीव दर्शविणारी ठरली. मात्र त्याच्या या धाडसाची किंमत त्याला प्राण गमावून चुकवावी लागली. नक्षलवाद्यांनी त्याला लक्ष्य करून हत्या केली आणि गावकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण केले. या घटनेनंतर संपूर्ण परिसरात खळबळ उडाली असून राज्य प्रशासन आणि सुरक्षा यंत्रणांसाठी हा गंभीर इशारा मानला जात आहे. स्वातंत्र्य दिनी राष्ट्रीय ध्वज फडकावणे ही प्रत्येक भारतीयाची शान असताना, अशा कृत्याला जीव घेण्याइतका विरोध करणे हे नक्षलवाद्यांच्या निर्दयी आणि अमानुष चेहऱ्याचे प्रतीक असल्याचे स्थानिकांनी सांगितले. या प्रकरणामुळे पुन्हा एकदा नक्षलवाद्यांविरुद्ध कठोर कारवाईची मागणी जोर धरू लागली आहे.

बारावी उत्तीर्ण, गावातील मोजक्या शिक्षित तरुणाचा अंत



छत्तीसगडच्या कांकेर जिल्ह्यातील बिनागुंडा गावातील बारावी उत्तीर्ण मुनेश नूरूटी हा गावातील मोजक्या शिक्षित तरुणांपैकी एक होता. आपल्या शिक्षणामुळे आणि जागरूकतेमुळे तो गावकऱ्यांमध्ये वेगळा ठरत होता. स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने, १५ ऑगस्ट रोजी त्याने एक ऐतिहासिक आणि धाडसी निर्णय घेतला. नक्षलवाद्यांच्या दहशतीचे प्रतीक असलेल्या गावातील नक्षल स्मारकावरच त्याने भारताचा राष्ट्रीय ध्वज फडकावला. या धाडसी कृतीचा व्हिडिओ काढण्यात आला आणि तो सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाला. देशप्रेमाची ही घटना जशी लोकांपर्यंत पोहोचली, तशीच ती नक्षलवाद्यांच्या नजरेतही भरली. नक्षलवाद्यांसाठी ही कृती त्यांच्या अस्तित्वाला दिलेले आव्हान होती. त्यामुळे दुसऱ्याच दिवशी नक्षलवाद्यांची एक तुकडी गावात दाखल झाली. गावकऱ्यांच्या उपस्थितीत त्यांनी तथाकथित जन अदालत भरवली. या खोट्या न्यायालयात मुनेशला राष्ट्रीय ध्वज फडकवल्याबद्दल आणि पोलिसांचा मुखबीर असल्याचा खोटा आरोप लावत दोषी ठरविण्यात आले. गावकऱ्यांसमोरच नक्षलवाद्यांनी त्याला मृत्युदंड सुनावला. त्यानंतर निर्दयी पद्धतीने त्याचा गळा आवळून त्याची हत्या करण्यात आली. स्वातंत्र्यदिनाच्या दिवशी देशाचा तिरंगा अभिमानाने फडकावणाऱ्या मुनेशच्या या बलिदानामुळे गावभर हळहळ व्यक्त होत आहे.

राष्ट्रीय ध्वज फडकवल्यामुळे मुनेशची हत्या

राष्ट्रीय ध्वज फडकवल्यामुळे त्याचा जीव घेतला गेला असावा, असा संशय व्यक्त होत असताना, कुटुंबीयांनी नक्षलवाद्यांच्या दहशतीमुळे या घटनेची तक्रार पोलिसांकडे करण्याचे धाडस केले नाही. त्यांनी शांतपणे मुनेशचे अंत्यसंस्कार केले. १७ ऑगस्ट रोजी नक्षलवाद्यांनी गावाजवळ एक बॅनर लावून या हत्येची जबाबदारी स्वीकारली. त्या बॅनरमध्ये मुनेशला पोलिसांचा मुखबीर असल्याचा आरोप करत 'गद्दार' ठरविण्यात आले. या बॅनरमुळे गावकऱ्यांमध्ये अधिकच भीती पसरली.

# केळ्यांचा भाव घसरला; उत्पादकांना मोठा आर्थिक फटका

जळगाव: काही दिवसापूर्वी २ हजाराच्या वर गेलेला केळीचा भाव आता १२०० रूपयांपर्यंत घसरल्यामुळे केळी उत्पादकांना मोठा आर्थिक फटका बसला आहे. केळीचे दर घसरल्यानंतर रावेर तालुक्यातील शेतकरी व कृषी उत्पन्न बाजार समितीच्या पदाधिकाऱ्यांनी जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांची भेट घेऊन केळी दरवाढीसंदर्भात बऱ्हाणपुरच्या जिल्हा प्रशासनाशी तातडीने चर्चा करावी, अशी अपेक्षा जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.

खान्देशातील जळगाव, धुळे आणि नंदुरबार या जिल्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर केळीचे उत्पादन होते. स्थानिक कृषी उत्पन्न बाजार समित्या दररोज भाव जाहीर करत असल्या, तरी व्यापारी वर्ग मात्र मध्यप्रदेशातील बुरहानपूर बाजार समितीने जाहीर केलेल्या दरांना प्रमाण मानतात. इतकेच नव्हे तर देशभरातील व्यापारी देखील बऱ्हाणपूरच्या केळी भावावर लक्ष ठेवून असतात. त्यामुळे बऱ्हाणपूरमध्ये केळी भावात थोडासा चढ-उतार झाला तरी त्याचे पडसाद थेट देशभर उमटतात. याच परिस्थितीचा गैरफायदा घेत बऱ्हाणपूर बाजार समितीत केळी उत्पादक शेतकऱ्यांच्या हिताशी खेळ केला जात असल्याचे स्पष्ट झाले आहे. भाव मनमानी पद्धतीने केव्हाही वाढविणे किंवा अचानक कमी करणे, असे व्यवहार तिथल्या यंत्रणेकडून सुरू असल्याने शेतकऱ्यांना मोठा तोटा सहन करावा लागत आहे. त्यांना आर्थिक संकटाला सामोरे जावे लागत आहे.

गेल्या दोन आठवड्यापूर्वी केळी दराला क्विंटलमागे २ हजाराहून अधिकच दर मिळत होता. मात्र आता केळीचे दर ७०० ते ८०० रूपयांनी घसरल्यानंतर शेतकऱ्यांना एका गाडीमागे (१५० क्विंटल) एक लाख रूपयांपेक्षा जास्त आर्थिक झळ बसली आहे. भाव वाढत असताना शेतकरी आणखी चांगल्या भावाच्या आशेने इतके दिवस केळीची कापणी करत नव्हते. मात्र, गेल्या काही दिवसात मोठ्या प्रमाणात भाव कमी झाल्यानंतर शेतकरी आता आणखी भाव कमी होण्याच्या भीतीने केळी कापणीसाठी घाई करू लागले आहेत. दरम्यान आता रावेर कृषी उत्पन्न बाजार समितीचे पदाधिकारी व शेतकऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेऊन केळी दरवाढीसंदर्भात बऱ्हाणपूर जिल्हाधिकाऱ्यांसोबत संयुक्त बैठक आयोजित करण्याची मागणी केली. त्यानुसार लवकरच ही बैठक होणार असून, त्यावर केळीच्या दरासंदर्भात काही व्यापाऱ्यांकडून होणाऱ्या साखळीवर निर्बंध आणण्यासाठी उपाययोजना हाती घेतल्या जाणार आहेत.

# गगनयान अंतराळात झेपावणार, ISRO कडून तारीख जाहीर



नवी दिल्ली : भारतीय अंतराळ संशोधन संस्थाने गुरुवारी देशवासीयांसाठी एक मोठी आनंदवार्ता दिली आहे. भारताच्या पहिल्या मानवयुक्त अंतराळ मोहिमेच्या दिशेने महत्वाचे पाऊल टाकत, गगनयान-जी१ मोहिमेचे प्रक्षेपण यावर्षी डिसेंबर महिन्यात होणार असल्याची माहिती खडठज चे प्रमुख व्ही. नारायणन यांनी दिली. दिल्ली येथे केंद्रीय मंत्री जितेंद्र सिंह, तसेच मोहिमेसाठी निवडले गेलेले ग्रुप कॅप्टन शुभांशू शुक्ला आणि प्रशांत बालकृष्णन नायर यांच्या उपस्थितीत नारायणन यांनी संयुक्त पत्रकार परिषद घेतली. यावेळी त्यांनी गगनयान प्रकल्पाशी संबंधित महत्वाचे तपशील मांडले. नारायणन यांनी स्पष्ट केले की, डिसेंबरमध्ये होणारी ही पहिली मानवरहित मोहीम असेल. या मोहिमेद्वारे विविध प्रणालींची चाचणी घेण्यात येणार असून, त्यानंतर मानवयुक्त उड्डाणासाठीची तयारी अधिक वेगाने केली जाईल. गगनयान प्रकल्प हे भारतासाठी केवळ अंतराळ मोहिमेचे ध्येय नसून, देशाच्या अंतराळ संशोधन क्षमतेतील एक नवा टप्पा ठरेल. या मोहिमेमुळे भारत हे जगातील निवडक त्या देशांच्या यादीत सामील होईल, ज्यांनी मानवाला स्वतःच्या तंत्रज्ञानाच्या साहाय्याने अंतराळात पाठवले आहे.

खडठज प्रमुख नारायणन यांनी सांगितले की, गेल्या चार महिन्यांत भारताच्या अंतराळ संशोधन क्षेत्रात अनेक महत्त्वपूर्ण कामगिरी करण्यात आल्या असून, विविध प्रयोग यशस्वीरीत्या पार पडले आहेत. या यशामुळे गगनयान प्रकल्पाची तयारी अधिक वेगवान झाली आहे.

# संसदेत घुसखोरीचा प्रयत्न, भिंत ओलांडून गरुडद्वारापर्यंत पोहोचलेल्याला अटक

नवी दिल्ली : नव्या संसदेत घुसखोरीचा प्रयत्न झाला. एक व्यक्ती भिंत ओलाडून गरुडद्वारापर्यंत पोहोचली. अखेर सुरक्षा रक्षकांनी घुसखोराला अटक केली.



संसदेच्या संरक्षणाची जबाबदारी आता सीआयएसएफकडे सोपवण्यात आली आहे. अती महत्त्वाची इमारत असल्यामुळे संसदेच्या प्रत्येक कोपऱ्यावर सुरक्षा यंत्रणेची बारीक नजर असणे अपेक्षित असते. यासाठी नव्या संसदेच्या आवारात ठिकठिकाणी सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची व्यवस्था करण्यात आली आहे. या कॅमेऱ्यांनी अज्ञात व्यक्तीच्या हालचालींची नोंद घेतल्यानंतर सुरक्षा रक्षकांनी तातडीने कारवाई केली. गरुडद्वार परिसरातून संसदेच्या आवारात घुसखोरीचा प्रयत्न करताना बघून अज्ञात व्यक्तीला अटक करण्यात आली.

याआधी १३ डिसेंबर २००१ रोजी भारताच्या संसदेवर अतिरेक्यांनी हल्ला केला होता. पाकिस्तान पुरस्कृत अतिरेक्यांनी हा हल्ला केला होता. या घटनेत दिल्ली पोलिसांचे सहा कर्मचारी, संसदेच्या सुरक्षा यंत्रणेचे दोन कर्मचारी आणि संसद परिसरातल्या उद्यानाचा एक माळी अशा नऊ जणांचा मृत्यू झाला होता. सुरक्षा पथकाने हल्ला करणाऱ्या पाच अतिरेक्यांना ठार केले होते. या घटनेनंतर संसदेच्या सुरक्षेत वाढ करण्यात आली होती. पण संसदेची दोन्ही सभागृह नव्या इमारतीत स्थलांतरित केल्यानंतर संसदेच्या आवारात कायदा हाती घेण्याचा हा दुसरा प्रयत्न आहे. याआधी २०२३ मध्ये कृषी कायद्यांना विरोध म्हणून संसदेत प्रेक्षक म्हणून आलेल्या चौघांनी रंगीत धूर सोडून निषेध व्यक्त केला होता. त्यावेळी संसदेत धूर करणाऱ्या चौघांना सुरक्षा पथकाने अटक केली होती. या घटनेनंतर थेट आता २०२५ मध्ये संसदेत घुसखोरीचा प्रयत्न झाला आहे. यामुळे संसदेची सुरक्षा व्यवस्था हा मुद्दा पुन्हा एकदा चर्चेत आला आहे.

यावेळी संसदेत घुसखोरी करणाऱ्या व्यक्तीचे नाव रामा असे आहे. मूळचा उत्तर प्रदेशचा रहिवासी असलेल्या रामाची कसून चौकशी सुरू आहे. प्रथमदर्शनी रामाचे वर्तन विक्षिप्त असल्याचे मत दिल्ली पोलिसांच्या जवानांनी व्यक्त केले आहे. यामुळे रामाला काही मानसिक त्रास आहे का याचीही तपासणी केली जाण्याची शक्यता आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार रामाला शुक्रवारी पहाटे ५.५० च्या सुमारास घुसखोरीचा प्रयत्न केल्याप्रकरणी अटक करण्यात आली आहे.

# उपराष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीत ट्विस्ट, मुख्यमंत्री फडणवीसांचा शरद पवारांना फोन

मुंबई : भाजपकडून एनडीएने उपराष्ट्रपती पदासाठी सी.पी. राधाकृष्णन यांना उमेदवारी दिली आहे. राधाकृष्णन यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला असून या निवडणुकीची सर्व जबाबदारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर सोपवण्यात आली आहे.

याच पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे प्रमुख शरद पवार यांच्याशी संपर्क करून पाठिंब्याची मागणी केली मात्र या फडणवीसांच्या पाठिंब्याला पवारांनी नकार दर्शवला आहे. राष्ट्रवादी काँगेसची बैठक झाली आणि या बैठीकीनंतर शरद पवारांनी याबाबत स्पष्टीकरण दिलं आहे.



यावेळी शरद पवार यांनी आमच्या बैठका झाल्या असून सुदर्शन यांचा फॉर्मही भरलं असं पवार यांनी स्पष्ट केला आहे. उपराष्ट्रपतीपद निवडणुकीसाठी फडणवीसांनी मला फोन केला आणि राधाकृष्णन यांना पाठिंबा द्यावा अशी फडणवीसांनी मला विनंती केली आहे असंही शरद पवार यांनी म्हटलंय.

यावेळी शरद पवार यांनी मुख्यमंत्री फडणवीसांना सी.पी. राधाकृष्णन हे आमच्या विचाराचे नाहीत असं म्हणत पवारांनी स्पष्ट नकार दिलाय. उद्धव ठाकरे, शरद पवार यांना मी फोन केला. मी निवेदन केलं की, महाराष्ट्राचे राज्यपाल जे मुंबईचे मतदार आहेत, त्यांना उपराष्ट्रपतीपदाचं उमेदवार बनवलं आहे.

उपराष्ट्रपतीपदाची निवडणूक पक्षीय नसते. त्या निवडणुकीसाठी व्हीप नसतो. महाराष्ट्राच्या अस्मितेला आपण मानता, त्यामुळे महाराष्ट्राचा एक मतदार या देशाचा उपराष्ट्रपती बनणार आहे. त्यांना समर्थन द्या अशी विनंती मी केली. त्यावर उद्धव ठाकरे म्हणाले की, सर्वांशी चर्चा करुन आम्ही निर्णय घेऊ. शरद पवार म्हणाले की, विरोधी पक्षांनी एकत्र येऊन उमेदवार ठरवलाय, आम्ही त्याच्यासोबत जाऊ असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.

# आयुष्यमान भारत योजनेचा लाभ वेळेत द्यावा -पालकमंत्री संजय शिरसाट

### पालकमंत्र्यांनी घेतला विविध विषयाचा आढावा

छत्रपती संभाजीनगर, दि. २२ - आरोग्य विभागाच्या विविध योजनांचा लाभ गरजू रुग्णांना वेळेत मिळावा यासाठी आयुष्यमान भारत योजनेचा लाभ वेळेत द्यावा, त्यासाठी रुग्णालयांनी तत्पर रहावे,असे निर्देश राज्याचे सामाजिक न्याय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट यांनी आज दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात पालकमंत्री शिरसाट यांनी प्रधानमंत्री जन आरोग्य योजना , महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेचा आढावा घेतला. बैठकीस खासदार डॉ.भागवत कराड, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, महानगरपालिकेचे आयुक्त जी .श्रीकांत, जिल्हा





परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके , निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते,जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.अभय धानोरकर ,महापालिकेचे आरोग्य अधिकारी डॉ. पारस मंडलेचा, प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेचे जिल्हा समन्वयक डॉ. रवी भोपळे यांच्यासह आरोग्य यंत्रणातील संबंधित अधिकारी या बैठकीत उपस्थित होते.

जिल्ह्यात एकूण ८१ रुग्णालय हे प्रधानमंत्री जन आरोग्य योजना तसेच महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेच्या उपचारासाठी संलगनीत असून या योजनेचा लाभ गरजू रुग्णांना रुग्णालयाच्या माध्यमातून देण्यात येतो. रुग्णालयाने विविध कागदपत्राच्या अभावी रुग्णास वेठीस धरू नये. आलेल्या रुग्णास वेळेत उपचार करून आरोग्य सेवा देण्याचे निर्देश जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट यांनी दिले .संबंधित नोंदणीकृत रुग्णालयांमध्ये रुग्णांना होणारी गैरसोयी टाळावी. त्याचप्रमाणे रुग्णांना उपचार नाकारणाऱ्या रुग्णालयावर आरोग्य विभाग व जिल्हा प्रशासनाने कारवाई करावी, असे निर्देश पालकमंत्री शिरसाट यांनी दिले. जिल्ह्यातील आयुष्यमान भारत योजनेचा लाभ घेण्यासाठी नागरिकांनी ई केवायसी करून घ्यावी.सेतू सुविधा केंद्र,आशाताई, व स्वस्त धान्य दुकानदार यांचे सहकार्य करून ई केवायसी पूर्ण करण्याचे आवाहन पालकमंत्री संजय शिरसाट यांनी नागरिकांना केले . यासाठी जिल्हा प्रशासनाने संबंधित आपले सरकार सेवा केंद्र, स्वस्त धान्य दुकानदार आणि अशा अंगणवाडी सेविका यांना सूचित करण्याचे निर्देश दिले.

महसूल व कृषी विभागाचा आढावा

जिल्ह्यामध्ये काही ठिकाणी अतिवृष्टी झालेली आहे. या अतिवृष्टी झालेल्या मंडळामध्ये शेतकऱ्यांच्या नुकसान झालेल्या पिकाचे पंचनामे करून तात्काळ याबाबतची मदत मिळवून द्यावी. यासाठी कृषी आणि महसूल विभागाने पंचनामे करून प्रक्रिया पूर्ण करावी .ज्या गावांमध्ये पुराच्या पाण्यामुळे रस्ते वाहून गेलेले आहेत. तेथे उपाययोजना करून सुविधा उपलब्ध करून शेतकऱ्यांना वेळेत मदत करण्यात कृषी विभाग आणि महसूल विभागाने कुचराई करू नये. शेतीचे नुकसान पाहणी प्रत्यक्ष अधिकारी व कर्मचाऱ्यांनी शेतीवरच्या बांधावर जाऊन पाहावे व त्याचे योग्य निरीक्षण पंचनाम्यात नोंदवावीत जेणेकरून शेतकऱ्यांना वेळेत मदत मिळण्यास मदत होईल असे पालकमंत्री शिरसाट यांनी सांगितले.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# मराठा महासंघाच्या दणक्यामुळे दोन वर्षापासून बंद रस्ता झाला मोकळा

## जनतेने शिवाजी हायस्कूल समोरील रस्त्याचा वापर करावा – पीआय प्रताप इंगळे

तभा वृत्तसेवा
जालना/प्रतिनिधी

जालना शहरातील गांधी चमन परिसरातील शिवाजी हायस्कूल समोरील मराठी कन्या पाठशाळा, पेशवा चौकाकडे जाणाऱ्या सार्वजनिक रस्त्यावर पत्र्याचे शेड टाकून एका बांधकाम व्यावसायिकाने गेल्या दोन वर्षापासून बंद केलेला हा रस्ता मराठा महासंघाच्या आक्रमक पावित्र्यानंतर अखेर मोकळा करण्यात आला असून, जनतेने या रस्त्याचा वापर करावा असे आवाहन शहर वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक प्रताप इंगळे यांनी केले आहे. शिवाजी हायस्कूल मार्गे गांधी चमन आणि कन्या पाठशाळा मार्गाला जोडणारा हा अत्यंत जवळचा रस्ता एका बांधकाम व्यावसायिकाने दोन वर्षापासून बंद केल्याने जनतेला मोठा त्रास सहन करावा लागत होता. या मार्गावर शाळा आणि दवाखाने असल्याने वाहतुकीचा मोठा खोळंबा होत होता. यासंदर्भात ८ ऑगस्ट रोजी जिल्हाध्यक्ष अरविंद देशमुख यांच्या नेतृत्वाखाली मराठा महासंघ आणि माजी नगरसेविका संध्या संजय देठे यांच्यासह पालक व नागरिकांनी महानगरपालिकेला निवेदन दिले होते. मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष अरविंद देशमुख, जिल्हा कोषाध्यक्ष अशोक पडूळ, सकल दिव्यांग सामाजिक संघटनेचे जिल्हाध्यक्ष राहुल मुळे, मनसेचे शहराध्यक्ष राहुल रत्नपारखे यांनी शांतता समितीच्या बैठकीत जिल्हाधिकारी अशीमा मित्तल, जिल्हा पोलीस अधीक्षक अजयकुमार बंसल, अपर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी, महानगरपालिकेचे आयुक्त संतोष खांडेकर यांच्यासमोर हा गंभीर विषय मांडला होता. त्याची दखल घेत शुक्रवार दि. २२ ऑगस्ट रोजी सायंकाळी ५ वाजता शहर वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक प्रताप इंगळे, पोलीस उपनिरीक्षक प्रदीप घोरपडे पोलीस कर्मचारी भीमा घोडके, मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष अरविंद देशमुख, कोषाध्यक्ष अशोक पडूळ, सामाजिक कार्यकर्ते संजय देठे, ड. शैलेश देशमुख, मंगेश मोरे, सकल दिव्यांग सामाजिक संघटनेचे जिल्हाध्यक्ष राहुल मुळे यांच्या उपस्थितीत या रस्त्याची पाहणी करून, पोलीस कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत शेड हटविण्यात आले आणि हा सार्वजनिक रस्ता वाहतुकीसाठी खुला करण्यात आला. शिवाजी हायस्कूल समोरील या रस्त्याचा जनतेने वापर करावा, असे आवाहन शहर वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक प्रताप इंगळे यांनी नागरिकांना केले आहे. यावेळी अरविंद देशमुख, अशोक पडुळ यांनी महानगरपालिका आणि शहर वाहतूक शाखेचे आभार मानले.



# जालना जिल्हा पोलीस दलासाठी मोबाईल फॉरेन्सिक व्हॅन उपलब्ध

तभा वृत्तसेवा
जालना / प्रतिनिधी

जालना जिल्हा पोलीस दलात एकुण १९ पोलीस ठाणे कार्यारत असुन पोलीस ठाणे हद्दित खुन, खुनाचा प्रयत्न, दरोडा, दरोडयाचा प्रयत्न, दुखापत, जबर दुखापत, फुस लावुन पळुन नेणे, बलात्कार, आत्महत्यास प्रवृत करणे, जबरी चोरी, चोरी, घरफोडी, पोस्को, हुंडा बळी, अंमली पदार्थ विरोधी कार्यवाही असे गुन्हे घडत असतात. पोलीस दलाकडुन आरोपी विरुध्द घटनास्थळावरील पुरावे गोळा केले जात होते, परंतु पुरावे गोळा करतांना पोलीसांना खुप अडचणी निर्माण होत होत्या. आता महाराष्ट्र शासनाने जालना जिल्हा पोलीस दलासाठी अत्याधुनिक मोबाईल फॉरेन्सिक व्हॅन उपलब्ध करुन दिली असुन जिल्हात २४द७ उप विभागीय पोलीस अधिकारी कार्यालय येथे उपलब्ध राहणार आहे. सदर मोबाईल फॉरेन्सिक व्हॅन मध्ये भौतीक, रासायनिक, जैविक व डिजीटल पुरावे गोळा करण्याकरीता किटस्, रसायने व साधण साम्रगी उपलब्ध करुन देण्यात आली आहे. मोबाईल फॉरेन्सिक व्हॅन जिल्हयातील घटनाऱ्या घटनास्थळी विनाविलंब भेटी देऊन आरोपी विरुध्द भौतीक, रासायनिक, जैविक व डिजीटल पुरावे गोळा केल्याने आरोपीस मा. न्यायालयात शिक्षा होण्यास मदत होणार आहे. तसेच सध्या जालना जिल्हा पोलीस दलासाठी ०१ मोबाईल फॉरेन्सिक व्हॅन मिळालेली असुन अजुन ०३ मोबाईल फॉरेन्सिक व्हॅन महिनाभराच्या अंतराने उपलब्ध होणार आहे. सर्व मोबाईल फॉरेन्सिक व्हॅन हया उप विभागाप्रमाणे कार्यरत असणार असुन त्यावर उप विभागीय पोलीस अधिकारी हे देखरेख ठेवणार आहे.



# संक्षिप्त

## जालना जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसाठी अंतिम प्रभाग रचना जाहीर

तभा वृत्तसेवा
जालना/ प्रतिनिधी

राज्य शासनाच्या ग्रामविकास विभागाच्या प्रधान सचिव यांच्या १२ जून २०२५ रोजीच्या आदेशानुसार जालना जिल्हा परिषदेच्या ५७ जागा आणि त्याअंतर्गत भोकरदन–२२, जाफ्राबाद–१२, बदनापूर–१०, जालना–१८, मंठा–१२, परतूर–१०, घनसावंगी–१४ व अंबड–१६ अशा एकूण जिल्ह्यातील सर्व पंचायत समित्यांच्या ११४ जागांसाठी निवडणूक प्रभाग रचनेचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. त्यानुसार आज दि. २२ ऑगस्ट २०२५ रोजी अंतिम प्रभाग रचनेची अधिसूचना शासन राजपत्रात प्रसिद्ध होणार आहे. ही अधिसूचना जालना जिल्हाधिकारी कार्यालय, जालना जिल्हा परिषद कार्यालय, सर्व उपविभागीय कार्यालये, सर्व तहसील कार्यालये आणि सर्व पंचायत समिती कार्यालयांतील फलकांवर नागरिकांच्या अवलोकनासाठी उपलब्ध असेल. सर्व संबंधितांनी अंतिम प्रभाग रचनेचे अवलोकन करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी केले आहे.

## गोदावरी नदीकाठच्या नागरिकांनी सतर्क रहावे–माजी मंत्री राजेश टोपे



तभा वृत्तसेवा
अंबड /प्रतिनिधी

जायकवाडी धरण ९५ टक्के भरले असून धरणात पाण्याची आवक सुरु असल्याने आज सायंकाळी ६ ते ७ वाजेच्या दरम्यान जायकवाडी धरणाचे १८ दरवाजे २ फुटाने उघडणार असून ३७ हजार ७२८ क्युसेक पाण्याचा गोदावरी नदीपात्रात विसर्ग करण्यात येणार आहे असल्याचे कडाचे कार्यकारी अभियंता श्रीमती जगताप यांनी सांगितले. गोदावरी नदीकाठच्या दोन्ही बाजूच्या नागरिकांनी सतर्क रहावे, नागरिकांनी गोदावरी नदीपात्रात जाऊ नये, विशेषतः अंबड, घनसावंगी, परतूर आणि पलीकडील माजलगाव, गेवराई भागातील गोदाकाठच्या गावात राहणाऱ्या सर्व नागरिकांनी सतर्कता बाळगावी. घाबरून न जाता सतर्क राहून प्रशासनास सहकार्य करावे. मी स्थानिक आपत्ती व्यवस्थापन पथकांना सतर्क रहाण्याबाबत जिल्हाधिकारी यांना बोलावून आदेश देणेबाबत सुचना केल्या आहेत. नदीपात्रालगतच्या भागातील शेतामध्ये असणारा शेतीमाल, शेतीऔजारे, मोटारी, विद्युत उपकरणे तसेच पाळीव प्राणी, जनावरे यांना सुरक्षित ठेवावे. नदीलगतच्या घरामध्ये राहणारे वयोवृध्द, लहान मुलं, महिला या सर्वांना सुरक्षित ठिकाणीच ठेवणे आवश्यक आहे. गावातील सर्वपक्षीय पदाधिकाऱ्यांनी एकत्रितपणे गावकऱ्यांची काळजी घ्यावी.कोणाच्याही मालाची अथवा कोणतीही जीवित हानी होणार नाही,याची दक्षता घ्यावी. कुठलीही समस्या उद्भवल्यास जिल्हा प्रशासन आणि पोलिस प्रशासन यांच्याशी संपर्क साधावा

## उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या हस्ते चंद्रकांत कारके यांच्या पुस्तकाचे प्रकाशन

### साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांचा चरित्र ग्रंथ नव्या पिढीला प्रेरणादायी – अजितदादा पवार



तभा वृत्तसेवा
जालना/ प्रतिनिधी

राज्याचे कणखर लोकप्रिय उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या शुभहस्ते मुंबईत जगविख्यात, विद्रोही बहुजन साहित्यिक अण्णाभाऊ साठे या चंद्रकांत कारके लिखित चरित्र ग्रंथाचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी प्रदेश सरचिटणीस आमदार शिवाजीराव गर्जे, मराठवाड्याचे नेते, शिक्षक मतदार संघाचे आमदार विक्रमजी काळे, संजयजी बोरगे, विठ्ठल बरकुले यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रम प्रसंगी उपमुख्यमंत्री अजित दादा पवार म्हणाले की, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांचा चरित्र ग्रंथ नव्या पिढीला प्रेरणादायी ठरेल, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे हे केवळ थोर लेखक नव्हते तर ते समाज परिवर्तनाच्या लढ्यातील अग्रणी सैनिक होते. वंचित उपेक्षित, शोषीतांचे दुःख त्यांनी आपल्या लेखणीतून मांडले. बहुजन समाजाला स्वाभिमानाची दिशा त्यांनी दिली. अण्णाभाऊंच्या साहित्यातून केवळ विद्रोहच नव्हे तर संवेदना, संघर्ष आणि आशावादाची दिशा मिळते. पुढे अजित दादा पवार म्हणाले की, लेखक चंद्रकांत कारके यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या जीवन कार्यावर आधारित लिहिलेल्या या पुस्तकात अण्णाभाऊ साठे यांच्या व्यक्तिमत्त्वाचा, साहित्यप्रवासाचा आणि सामाजिक कार्याचा मागोवा घेतलेला हा ग्रंथ नव्या पिढीला निश्चितच प्रेरणादायी ठरेल. यासाठी हा ग्रंथ प्रत्येकाने वाचला पाहिजे. पुस्तक प्रकाशन बद्दल लेखक चंद्रकांत कारके यांचे मनःपूर्वक अभिनंदन व शुभेच्छा असे ते शेवटी म्हणाले.

# कुंभार बांधवांकडून चिखलाचे बैल आणून केली जातेय पूजा

## तीर्थपुरी येथे चिखलाच्या बैलाची पूजा: चार पिढ्यांपासून जपली जातेय परंपरा



तभा वृत्तसेवा
जालना /प्रतिनिधी

घनसावंगी तालुक्यातील तीर्थपुरी येथे वाद टाळण्यासाठी कोणालाच मान न देता चिखलाच्या बैलाची पूजा केली जाते. चार पिढ्यांपासून चिखलाच्या बैलाची पूजा करण्यात येत असल्याचे जाणकारांनी सांगितले. वर्षभर शेतात मेहनत करून घराला धन–धान्य देणाऱ्या गाय आणि बैलांची पोळ्याला पूजा करून कृतज्ञता व्यक्त करणे शेतकरी बळीराजा धन्यता मानतो. पोळा हा शेतकरी आणि बैलांचा सण मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. पोळ्याला बहुतांश गावात काही ठराविक जणांचाच पूजेचा मान असतो. त्यांच्या बैलांची पूजा करून सर्वांत पुढे त्या पूजेकरी बैल आणि नंतर इतर सर्वांना वेशीतून वाजत–गाजत आपापले बैल नेण्याची प्रथा आहे. काही गावात पूजा तसेच कोणाचे बैल पुढे यावरून वाद होऊन हाणामाऱ्या होण्याचे प्रकार देखील होतात. तीर्थपुरीत पूर्वी मुस्लिम समाजाचे फकीर कठूभाई हे कुंभाराकडून चिखलाचे बैल आणायचे. पोलीस पाटील आणि ब्राम्हण यांनी त्याची पूजा करायची अशी सर्वधर्म परंपरा होती. परंतु कठूभाई यांचे काही वर्षांपूर्वी निधन झाल्याने आणि गावात कोणी फकीर नसल्याने तसेच पोलीस पाटील शेषराव बोबडे यांचे देखील काही वर्षांपूर्वी निधन झाल्याने आता पोलीस पाटील यांचे चिरंजीव अशोक बोबडे हे स्वतः कुंभाराकडून चिखलाचे बैल आणतात. ब्राम्हण मंत्र पूजा केल्यानंतर पोळा फुटला असे जाहीर करण्यात येते. मग सर्वजण वाजत–गाजत आपापले बैल घरी नेऊन त्यांची पूजा करून पुरण–पोळी खाऊ घालतात. अशी परंपरा आजही कायम आहे.

# जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टीची पाहणी करून तात्काळ पंचनामे करावे

## कोणतेही निकष न लावता शेतकऱ्यांना मदत जाहीर करावी – महेश नळगे

तभा वृत्तसेवा
जालना / प्रतिनिधी

यंदाच्या सालमानत मान्सुन पाऊसाने लवकरच पडण्यास सुरुवात केली होती. तसेच जालना जिल्हयात सर्वदुर जोरदार पाऊस पडत असल्याने जिल्हयातील नदी नाले व तलाव पुर्ण क्षमतेणे भरले आहेत. परभणी लोकसभेचे खा. संजय जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली व जालना जिल्हाप्रमुख महेश नळगे यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी यांना निवेदन जालना जिल्ह्यात गेल्या दिवसापासून सतत सुरू असलेल्या मुसळधार शेतकऱ्यांच्या पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. सतत पडणऱ्या पावसामुळे शेतकरी पुरता हवालदिल झाला शेतकऱ्यांनवर मोठे संकट आ वासून उभे राहिले आहे. शेतकऱ्यांच्या पिकांचे प्रचंड मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याने शेतकऱ्यान मध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झालेले आहे. हाता तोंडाशी आले घास निसर्गाने हुसकावून घेतो काय याचा धसका शेतकरी घेत आहेत. पावसाचे पाणी शेतात साचलेने कापूस सोयाबीन मका तुर यासारख्या खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे तसेच जिल्ह्यातील फळबागांना सुध्दा मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. तसेच अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या पशुधनाची सुध्दा वाताहत झाली आहे. आणि काही पुराचा फटका सुद्धा बसलेला आहे शेतात आलेल्या पुरामुळे शेतजमीन खरडून गेली आहे. शेतकऱ्यांच्या परिस्थितीचे गांभीर्य लक्षात परभणी लोकसभेचे खा. संजय जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली जालना जिल्हाचे जिल्हा प्रमुख महेश नळगे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेच्या (उबाठा) शिष्टमंडळाने मा. जिल्हाधिकाऱ्यांना शेतकरी मदतीचे निवेदन दिले.



यावेळी उपस्थित जिल्हाप्रमुख महेश नळगे उपजिल्हाप्रमुख माधवराव कदम अशोक, आघाव, तालुकाप्रमुख प्रदिप बोराडे, प्रल्हाद नाईकनवरे, बाळासाहेब गावडे, गणेशराव दराडे, भारत पंडित, संजय नागरे, विठ्ठल वटाणे, मधुकर पाईकराव, दत्ता सुरंग, आबा कदम, दिपक काळे, संदिप पाचारे, किसान सेनेचे, राजु शिंदे, देविदास राठोड, प्रभाकर बामणे, रजनीश कणके, गणपतराव खोसे, बाळासाहेब वैद्य, परमेश्वर खरै, इब्राहिम कायमखानी, अकबर शेख, विजय बोरूडे, विकास सदावर्ते, शिवसेनेचे सर्व आघाडीचे पदाधिकारी व मोठ्या संख्येने शिवसैनिक उपस्थित होते .

# नायगाव येथे शिवसेना (उबाठा) पक्षाची शाखा स्थापन

## जिल्हाप्रमुख महेश नळगे व तालुकाप्रमुख प्रदिप बोराडे यांच्या नेतृत्वाखाली युवकांनी घेतली हाती मशाल!

तभा वृत्तसेवा
मंठा/ प्रतिनिधी

नायगाव ता. मंठा येथे शिवसेनेचे (उबाठा) गटाचे जिल्हाप्रमुख महेश नळगे व तालुकाप्रमुख प्रदिप बोराडे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत मतदार संघातील अनेक कार्यकर्त्यांनी शिवसेनेची मशाल हाती घेत शिवसेनेत जाहीर पक्षप्रवेश केला. महेश नळगे जिल्हाप्रमुख व प्रदिप बोराडे तालुकाप्रमुख झाल्यानंतर परतुर मंठा विधानसभा मतदारसंघाला रोखठोक असे युवा नेतृत्व लाभले असल्याचे मतदार संघातील प्रत्येक मतदार बोलत आहेत. मतदार संघातील सामान्य नागरिक आपली अडचण घेऊन जिल्हाप्रमुख श्री नळगे व तालुकाप्रमुख प्रदीप बोराडे यांच्या कडे गेल्यावर तत्काळ त्यांच्यासाठी झटणारे नेतृत्व पहावयास मिळत आहे. त्यांच्या परखड व रोखठोक भूमिकेमुळे विधानसभा मतदारसंघातून आजी माजी सरपंच, ग्रामपंचायत सदस्य तसेच इतर पक्षातील पदाधिकारी शिवसेनेत प्रवेश करित असल्याने विरोधकांचे धाबे दणाणले आहेत. नायगाव येथील शाखा स्थापनेच्या वेळी तालुका संघटक ज्ञानेश्वर सरकटे, उपतालुकाप्रमुख संजय नागरे, उपतालुकाप्रमुख देवीदास खरात, अशोक खंदारे, गोरख चव्हाण, सचिन चव्हाण, विजय वाघमारे, निलेश बोराडे, आदिराज बोराडे, नायगाव शाखाप्रमुख रवींद्र राठोड, राजू जुमडे, शरद वाव्हळे, राजेश आढे, शिवकुमार देशमुख, सचिव मारुती, खंदारे ऋषी, दराडे, भारत राठोड, अविनाश राठोड, महेश राठोड, कृष्णा घोगरे, कृष्णा फुफाटे, प्रदीप वाव्हळे, जय सुतार, अमोल राठोड, संदीप चव्हाण, लक्ष्मण फुफाटे, बाळू चिफडे, अनिल दहिजे, सचिन राठोड, प्रसाद वाव्हळे, विक्रम राठोड, योगेश उपाटे, कांताराम पवार, सतीश प्रधान, लक्ष्मण कोकाटे, प्रतीक सुतार, आकाश प्रधान, राजकुमार राठोड, रामेश्वर राठोड, रवींद्र आढे, राहुल चव्हाण, महादेव चव्हाण, गजानन फुपाटे, रामेश्वर फुपाटे, मारुती फुपाटे, नितीन राठोड, अमोल आढे, रवी चव्हाण, अनिल राठोड, नितीन राठोड, रवि राठोड, रंजीत राठोड, संदीप राठोड, जानकीराम राठोड, गोपाळ राठोड, संजय चव्हाण, समाधान राठोड, पृथ्वीराज चव्हाण, संतोष मिरासे यांची उपस्थिती होती.



# वनविभाग, स्थानिक मच्छीमार व ग्रामस्थांच्या प्रयत्नाने बेटावर अडकलेल्या वाणरांची सुटका !!

तभा वृत्तसेवा
परतुर / प्रतिनिधी

नैसर्गिक संकटात सापडलेल्या प्राण्यांचे जीव वाचविण्यासाठी मानवी संवेदनांचा हात पुढे आला की, हृदयाला स्पर्श न जाणणारे दृश्य घडते. असेच एक भावनिक दृश्य परतूर तालुक्यातील निम्न दुधना प्रकल्पातील मौजे वैजोडा येथीन वस्ती परिसरात पाहायला मिळाले. जवळपास पंधरा दिवसांपासून जलाशयातील काही भागावर अचानक पाण्याने बेट पडले तेथे असेलेले झाडांवर अडकून पडलेल्या वानरांची वनविभाग, स्थानिक मच्छिमार व ग्रामस्थांच्या मदतीने त्या अडकलेल्या वाणरांना बुधवारी सुखरूप सुटका करण्यात आली. निम्न दुधना प्रकल्पाच्या जलाशयात गेल्या पंधरा–वीस दिवसांपासून पाण्याची पातळी झपाट्याने वाढली होती. या वाढीमुळे परतूर तालुक्यातील वैजोडा वस्ती परिसरातील एका झाडावर वानरांचा एक गट अडकून पडला होता. जवळपास १५ वानरे झाडावरून खाली येऊ शकत नव्हती. अडकल्यामुळे वानरे भुकेली होती. ही बाब गावकऱ्यांच्या लक्षात आल्यानंतर ग्रामस्थ अंगद लहिरे यांनी वनविभागाशी संपर्क साधला. त्यानंतर तातडीने सुटका मोहीम आखण्यात आली. झाडावरून सुटका होताच वानरांनी अक्षरशः आनंदाने उड्या मारल्या. वैजोडा येथील ग्रामस्थ अंगद लाहिरे यांनी त्यांच्या भ्रमणध्वनी क्रमांक ८०८०१७२१३० वरून माहिती दिली की तलावामध्ये बारा ते पंधरा वानर फसलेले आहेत. तात्काळ जागेवर जाऊन





परिस्थितीची पाहणी केली व सदर अडकलेले वानर यांना बोटीच्या आणि रशीच्या साह्याने सुखरूप बाहेर काढण्यात आले. सदर कारवाई मा. वनसंरक्षक छत्रपती संभाजीनगर प्रमोदचंद लाकरा व उपवनसंरक्षक छत्रपती संभाजीनगर श्रीमती सुवर्णा माने मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक वनसंरक्षक (रोहयो व वन्यजीव) जालना एस. एन. मुंडे व वनपरिक्षेत्र अधिकारी जालना दक्षिण (प्रादेशिक) व्हि. एम. दौंड यांच्या नेतृत्वात वनपरिमंडळ अधिकारी मंठा एस. एन. पठाण, वनरक्षक मंठा, के. बी. वाकोदकर, वनरक्षक परतुर एम. एम. डब्ल्यु. सय्यद, वनमजूर परतूर आत्माराम राठोड, दत्ता जाधव, भास्कर जाधव, उद्धव मांडगे व इतर ग्रामस्थ यांनी संयुक्तरित्या केली होती.



मंगरूळ मध्ये उत्साहात पोळा साजरा करण्यात आला सूत्रसंचालन सुभाष बोर्डे यांनी योग्यरीत्या केले.

# लंडनमध्ये आ. प्रशांत बंब यांचा गौरव, 'कोहिनूर ऑफ इंडिया' पुरस्काराने सन्मानित

खुलताबाद प्रतिनिधी - गंगापूर खुलताबाद विधानसभेचे कर्तव्यदक्ष आमदार श्री प्रशांत बंब यांच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे. 'लोकमत' समूहाच्या वतीने लंडन येथे आयोजित भव्य 'ग्लोबल इकॉनॉमिक कन्व्हेन्शन' मध्ये त्यांना 'कोहिनूर ऑफ इंडिया' या सर्वोच्च पुरस्काराने (१८ ऑगस्ट) रोजी महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष श्री. राहुलजी नार्वेकर यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार स्वीकारताना आ. प्रशांतजी बंब सपत्नीक व परिवारासह उपस्थित होते. हा केवळ पुरस्कार नाही, तर जनसेवेच्या अखंड प्रवासाला मिळालेली प्रेरणा आहे. ज्या अपेक्षेने माझी निवड झाली, त्या अपेक्षांची पूर्तता करण्यासाठी मी अखेरच्या श्वासापर्यंत जनसेवा करीत राहीन, अशी भावना आ. प्रशांतजी बंब यांनी याप्रसंगी व्यक्त केली.

('देशाच्या प्रगतीसाठी दिलेल्या आपल्या अद्वितीय योगदानामुळे आम्हाला अभिमान आहे. या जागतिक व्यासपीठावर आपल्या कार्याचा उत्सव साजरा करणे ही आमच्यासाठी गौरवाची बाब आहे,' असे लोकमत समूहाचे चेअरमन श्री. विजयजी दर्डा यांनी गौरवपत्रात नमूद केले आहे.)



महाराष्ट्रासाठी अभिमान

'कोहिनूर ऑफ इंडिया' हा पुरस्कार केवळ एखाद्या व्यक्तीचा नाही, तर महाराष्ट्रातील गंगापूर खुलताबाद तालुक्यातील प्रत्येक नागरिकांचा वैभवाचा सन्मान आहे. लासुर- स्टेशनच्या मातीतून उभा राहिलेले अभ्यासू नेत्याला, कोविड काळात संपूर्ण जग झोपलेले असताना रस्त्यावर उभे राहून हजारो नागरिकांना अन्नदान करणार्या नेत्याला, कोविड काळात मतदारसंघातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात येऊ नये म्हणून लासुर स्टेशन येथे मोठे हॉसपिटल उभारणी करुन हजारों नागरिकांचे प्राण वाचविणारा नेत्याला, गंगापूर खुलताबाद तालुक्यात विकासाची गंगा खेचून आणणारा नेत्याला, दुष्काळात मुक्या जनावरांसाठी चारा छावण्या सुरू करणारा नेत्याला, शेतीच्या बांधापर्यंत पाणी पोहोचविणारा नेत्याला, उ ड ठ फंडातून गंगापूर खुलताबाद तालुका पाणीदार करणारा नेत्याला, प्रत्येक गावात वाचनालयाच्या माध्यमातून हजारो पुस्तके देऊन शेकडो विद्यार्थ्यांना नोकरी देणार्यां नेत्याला, प्रत्येक गावात आमदार निधी देऊन विकास करणार्या नेत्याला, महाराष्ट्र सरकारच्या वैयक्तिक लाभाच्या योजना सामान्य नागरिकांपर्यंत पोहचवण्यासाठी मेहनत करून मिळवुन देणारा सामान्य माणसाच्या गळ्यातील ताईत असणार्‍या बहादूर नेत्याला आज जागतिक स्तरावर पुरस्कार मिळवून मानाचा तुरा ठरत आहे. आ. प्रशांतजी बंब यांच्या नेतृत्वगुणांची, जनसेवेतल्या निष्ठेची आणि विकासदृष्टीची ही मिळालेली दाद महाराष्ट्राच्या अभिमानात भर घालणारी ठरली आहे. आमदार प्रशांत बंब यांना मिळालेल्या पुरस्कार, बद्दल प्रकाश वाकळे जिल्हा उपाध्यक्ष भाजपा छत्रपती संभाजीनगर व , गंगापूर खुलताबाद तालुक्याच्या वतीने सतीश दांडेकर संदीप निकम यांच्यावतीने स्वागत करण्यात आले

## कन्नडमध्ये भाजपाचा रक्षाबंधन साजरा



कन्नड :- दि.२१ ऑगस्ट - शहरातील वाणी मंगल कार्यालयात दि.२० रोजी भारतीय जनता पक्षाच्या वतीने रक्षाबंधन उत्सव मोठ्या उत्साहात आणि पारंपरिक पद्धतीने साजरा करण्यात आला. या प्रसंगी भगिनींनी प्रमुख पाहुण्यांना राखी बांधून बंध प्रगतीचा - बंध विश्वासाचा हा संदेश दिला. या वातावरणात आपुलकी, विश्वास आणि हिंदू संस्कृतीची सुगंधी झुळूक पसरली होती.

या कार्यक्रमाला भाजपा जिल्हाध्यक्ष संजय खंबायते, उद्योजक मनोज केशवराव पवार, मध्य मंडळाध्यक्ष सुनील पवार, जिल्हा सरचिटणीस सुभाष काळे आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. या उत्सवाचे आयोजन भाजपा नेते मनोज पवार मित्र मंडळ यांच्या पुढाकाराने करण्यात आले होते. आयोजनात माजी पंचायत समिती उपसभापती काकासाहेब तायडे, ड्रीम लॅण्ड प्रि-स्कूल संस्थेच्या अध्यक्षा वर्षा लहाने आणि गिरिजा बांधकाम संघटनेच्या जिल्हाध्यक्ष कोमल खरे यांनी सहकार्य केले.

यावेळी महिला अध्यक्ष अर्चना पवार, युसूफ शेख, कैलास जाधव, अनिल शिरसाठ, राजू भोसले, मनोज देशमुख, पवन ठाकूर, संदीप नरवडे, केतन त्रिभुवन, इम्रान शेख, सचिन राजपूत, तात्याराव भुजंग, शंकर राऊत, जीवन राजपूत, बंटी जाधव आदींसह मोठ्या संख्येने नागरिक महिला उपस्थित होते.

## भाजप नूतन पदाधिकाऱ्यांचा भव्य सत्कार सोहळा



कन्नड - दि.२२ ऑगस्ट - भारतीय जनता पक्षाच्या वतीने नुकतेच घोषित झालेल्या नूतन पदाधिकाऱ्यांचा दि.२१ रोजी भव्य स्वागत सत्कार सोहळा कन्नड शहरातील राजुरेश्वर लॉन्स येथे पार पडला. जिल्हाध्यक्ष संजय खंबायते यांच्या आदेशानुसार व मध्यमंडळ अध्यक्ष सुनील पवार यांच्या नेतृत्वाखाली हा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.भाजपाचे नेते व उद्योजक मनोज केशवराव पवार यांच्या हस्ते नूतन पदाधिकाऱ्यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

या सोहळ्याला पंचायत समिती माजी उपसभापती काकासाहेब तायडे, मनोज देशमुख, संगेश भारुका, कोमल खरे, संदीप नरवडे, केतन त्रिभुवन, प्रशांत शिंदे, मनीष राठोड, शंकर राऊत, सोपान शिरसाठ, अमोल सोनवणे, मालकर, इम्रान शेख, खलील शेख, शेख विखार, संदीप कांबळे, कपिल लालवाणी, नवनाथ साळवे, रोहित कांबळे, छोटू हिरे आदिंची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन काकासाहेब तायडे यांनी केले.

## फर्दापूर अंतर्गत सर्व गावांत बैल पोळा साजरा

फर्दापूर दि २२ फर्दापूर पोलिस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या सर्व गावांत शांतते बैल पोळा साजरा करण्यात आला

फर्दापूर . फर्दापूर पोलिस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या सर्व गावांत शांतते बैल पोळा साजरा करण्यात आला फर्दापूर गावात सुध्दा बैल पोळा अति उत्साहात बैल पोळा साजरा करण्यात आला यावेळी फक्त वरुन देवानेच पावसाची हजेरी नाही लागली यामुळे शेतकरी राजा थोड्या प्रमाणात चिंतत आहे सहा पोलिस निरीक्षक प्रफुल्ल साबळे यांनी सांगितले की फर्दापूर पोलिस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या सर्व गावांत शांतते बैल पोळा साजरा करण्यात आला कुठेही कुठल्याही प्रकारचे वादविवाद झाले नाही त्यामुळे आम्ही सर्व पोलिस पाटील यांची बैठक घेऊन हा निर्णय घेण्यात आला की बैल पोळा हा सण अत्यंत शांतपणे साजरा करण्यात यावा जेणेकरून बैलराजा ला एक दिवस आनंदाने पुरणपोळी चा नैवेद्य देण्यात यावा सर फोटो मेल वर पाठविला आहे.

## बॉलीवूड फॅशनिस्टा अनन्या पांडे यांच्याकडून 'फॅशन अँड ग्लो अप' अनुभव फक्त एअरबीएनबी वर


छत्रपती संभाजीनगर : बॉलीवूड फॅशन आयकॉन अनन्या पांडे एक खास, अद्वितीय फॅशन आणि ग्लो अप अनुभव अनन्याज स्टाईल एडिट, फक्त एअरबीएनबीवर आयोजित करण्यासाठी सज्ज आहे. फॅशनप्रेमी, ग्लॅमरचा शोध घेणाऱ्या आणि अनन्याच्या चाहत्यांना त्यांच्या सिग्नेचर स्टाइल विश्वात प्रवेश देण्यासाठी डिझाइन केलेला हा अनुभव जास्तीत जास्त चार पाहुण्यांना उपलब्ध असेल. हा ४ तासांचा अनुभव फक्त शून्य रूपये किमतीत उपलब्ध आहे. या अनुभवात जास्तीत जास्त ४ पाहुणे सहभागी होऊ शकतात. १ किंवा २ लोकांसाठी बुक करा. परंतु जागा मर्यादित असल्यास फक्त एकाच व्यक्तीचे बुकिंग होईल.पाहुण्यांची निवड प्रथम येणाऱ्यास प्रथम संधी या तत्वावर असेल. नवी दिल्ली येथे जाणे आणि येण्याचा खर्च पाहुण्यांना करावा लागेल. या ४ तासांच्या अनुभवात फॅशन रिबूट, स्ले अँड स्प्रे, पोज अँड शाइन, कॉफी विथ अनन्या आणि स्ले दि डे भेटवस्तू या गोष्टी समाविष्ट असतील दिल्लीतील सर्वात आकर्षक एअरबीएनबीपैकी एक असलेल्या अनन्याच्या स्वप्नातील क्लोसेट आणि व्हॅनिटी स्पेसच्या स्वप्नातीतल आवृत्तीत राहण्याची संधी चाहत्यांना मिळेल. तिच्या वॉक-इन वॉर्डरोबपासून ते व्हॅनिटी झोनपर्यंत ही जागा पूर्णपणे धमाल फॅशन प्लेग्राउंडमध्ये रूपांतरित झाली आहे.

## लो-इमिशन झोन्समुळे महाराष्ट्राची नवीन ईव्ही पॉलिसी आणखी मजबूत होणार - श्री.मूर्ती नायर

छत्रपती संभाजीनगर : श्री.मूर्ती नायर - संशोधक इंटरनॅशनल कौन्सिल फॉर क्लीन ट्रान्सपोर्टेशन सांगतात महाराष्ट्र सरकारने २०२५ साठीची दुसरी इलेक्ट्रिक वाहन (ईव्ही) पॉलिसी जाहीर केली आहे. ही पॉलिसी कर्नाटकच्या पावलावर पाऊल ठेवून तयार करण्यात आली असून, पुढील पाच वर्षांसाठी तब्बल १,९९३ कोटीं रुपयांच्या खर्चाची तरतूद करण्यात आली आहे, जी २०२१ च्या ईव्ही पॉलिसीत दिलेल्या ९३० कोटी रुपयांच्या तुलनेत दुपटीहून जास्त आहे. २०२४ मध्ये महाराष्ट्र हा देशातील दुसऱ्या क्रमांकाचा सर्वात मोठा ईव्ही बाजार होता. त्यामुळे नवीन पॉलिसीत व्यापक उपाययोजना समाविष्ट केल्या आहेत. यात सर्व प्रकारच्या वाहनांच्या खरेदीवर अनुदान (सबसिडी) दिली जाणार आहे - कृषी ट्रॅक्टर आणि हार्वेस्टरलाही यात समाविष्ट केले आहे. तसेच वाहन नोंदणी आणि नूतनीकरण शुल्क माफी, महत्त्वाच्या रस्त्यांवर टोल माफी, चार्जिंग इन्फ्रास्ट्रक्चर उभारणीसाठी मदत आणि स्थानिक उत्पादनाला प्रोत्साहन यासारख्या सवलतींचाही समावेश आहे. या योजनेचे उद्दिष्ट स्पष्ट आहे - २०३० पर्यंत राज्यात नोंदवली जाणारी ३०% नवीन वाहने इलेक्ट्रिक असावीत.

मोठ्या आर्थिक तरतुदी आणि व्यापक नियोजन असूनही, या नवीन पॉलिसीत एक महत्त्वाची बाब समाविष्ट नाही - ती म्हणजे लो-इमिशन झोन्स (डएनी). हे झोन्स पारंपरिक इंधनावर चालणाऱ्या वाहनांवर नियंत्रण ठेवून महाराष्ट्राला भारताच्या शाश्वत वाहतूक क्षेत्रात आघाडीवर राहण्यास अधिक बळकटी देऊ शकले असते.

## विशाल कंडारे यांचे निधन



सोयगाव,दि.२२ ऑगस्ट - सोयगाव शहरातील विशाल पारस कंडारे (वय.३५) यांचे दि.२२ शुक्रवार रोजी सकाळी ४:०० वाजता अल्पशा आजाराने निधन झाले.त्यांचेवर संध्याकाळी ५:०० वा.सोयगाव येथील स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या पश्चात, मुलगा, आई, वडील, असा परिवार आहे.ते रमेश कंडारे यांचे पुतण्या होय.

# सिल्लोड-सोयगावचे आमदार अब्दुल सत्तार यांच्याहस्ते वेताळवाडी धरणातील जलाशयाचे पूजन

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.२२ ऑगस्ट

येथील वेताळवाडी धरण पूर्ण क्षमतेने भरल्याने ओसंडून वाहत आहे.वेताळवाडी धरण भरल्याने सोयगाव आणि शेंदूर्णी गावचा पाण्याचा प्रश्न मिटला आहे.बुधवार (दि.२१) रोजी आमदार अब्दुल सत्तार यांच्याहस्ते वेताळवाडी धरणातील जलाशयाचे पूजन करण्यात आले.



यावेळी आमदार अब्दुल सत्तार यांनी उपस्थित अधिकारी - नागरिकांशी चर्चा केली.वेताळवाडी धरण ओसंडून वाहत असल्याने सोना नदी दुथडी भरून वाहत आहे.त्यामुळे सोना नदी काठच्या नागरिकांनी आपली व आपल्या पशुधनाची काळजी घेवून सतर्क राहण्याचे आवाहन आमदार अब्दुल सत्तार यांनी याप्रसंगी केले.आमदार अब्दुल सत्तार यांनी अधिकाऱ्यांशी चर्चा करुन धरणाची माहिती जाणून घेतली.वेताळवाडी धरण भरल्याने धरणातून जलविसर्गाबाबत लोकांमध्ये आगाऊ सूचना देऊन खबरदारी बाळगण्याबाबत जनजागृती करण्याचे निर्देशही दिले.याप्रसंगी जिल्हा बँकेचे चेअरमन अर्जुन पा.गाढे,माजी जि.प.उपाध्यक्ष केशवराव पा.तायडे,माजी सभापती रामदास पालोदकर,नगराध्यक्षा आशाबी तडवी,जलसंपदा विभागाच्या कार्यकारी अभियंता साजिदा बानो शाहपूरे , उपविभागीय अभियंता अभय शेळके,शाखा अभियंता प्रितम राठोड,मुख्याधिकारी संभाजी देशमुख,नगरपंचायत शिवसेना गटनेता अक्षय काळे,फिरोज पठाण,जीवन पाटील,महंम्मू पटेल,संतोष बोडखे,हर्षल काळे,गजानन कुडके,कदीर शहा,शेख रऊफ,राजू दुतोंडे, भारत तायडे,भगवान तायडे,भारत इंगळे,अन्वर पठाण,कादर पठाण,युनूसखा पठाण,मजीद नाना,श्रीराम जाधव,सुरेश जाधव,इरफान पठाण आदींसह गावकऱ्यांची उपस्थिती होती.

# शांतीसागर महाराज यांच्या ७० व्या समाधी महोत्सवा निमित्त महाशोभायात्रा व विशेष प्रवचन

तभा वृत्तसेवा

छत्रपती सभाजीनगर - छत्रपती सभाजीनगर मराठवाड्याची राजधानी ऐतिहासिक नगर तथा संतांची पावन भुमी छत्रपती संभाजीनगर शहरात प्रथमच समस्त दिगंबर जैन समाजाचे वतीने वीर,परम तपस्वी,परम उपकारी,प्रथमाचार्य चारित्र्य चक्रवर्ती १०८ आचार्य श्री शांतिसागरजी महाराज यांचा ७० वा समाधी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे,हा महोत्सव परमपूज्य भक्तामर वाले बाबा आचार्य डॉ. प्रणामसागर महाराज, परमपूज्य उपाध्याय विरंजन सागरजी महाराज चर्या



शिरोमणी प्रभावसागरजी महाराज यांचे मंगल पावन सानिध्यात आयोजित करण्यात आला आहे

महोत्सव समिती मध्ये शहरातील समस्त दिगंबर जैन मंदिर चे अध्यक्ष हे महोत्सव समिती चे अध्यक्ष म्हणून घोषित करण्यात आले आहे, या महोत्सवात जितेंद्र पापळकर, विभागीय आयुक्त,विनयकुमार राठोड पोलिस अधीक्षक छत्रपती संभाजीनगर ग्रामीण ,दिलीप घेवारे अध्यक्ष अखिल दिगंबर जैन सैतवाळ संस्था मुंबई, संजय केणेकर विधान परिषद सदस्य, नितीन चित्ते मा नगरसेवक यांना आमंत्रित करण्यात आले आहे. शोभायात्रा दिनांक २४ रविवार रोजी सकाळी ठिक आठ वाजता आचार्य विद्यासागरजी किर्ती स्तंभ भगवान पार्श्वनाथ चौक येथुन निघणार आहे. याच ठिकाणी मुख्य कार्यक्रम मंगलाचरण दिपप्रज्वलन दिपनृत्या नंतर चारित्र्य चक्रवर्ती प्रथमाचार्य शांतीसागर महाराज यांचे पुजन होईल तसेच भक्तामर वाले बाबा आचार्य डॉ प्रणाम सागर महाराज, उपाध्याय श विरंजन सागर महाराज, चर्या शिरोमणी मुनिश्री प्रभावसागर महाराज यांचे पाद प्रक्षालन पुजन होईल व त्या नंतर मंगलमय प्रवचन होणार आहे. या कार्यक्रमाला श आनंद जैन, जैन भक्ती संगीतकार तथा संगीत संच यांची विशेष उपस्थिती राहणार आहे.

## हैद्राबाद इनामे व रोख अनुदाने रद्द अधिनियमांतर्गत जमिनींच्या वर्ग बदलासाठी शिबीरात सहभाग घ्यावा

छत्रपती संभाजीनगर, दि. २२ -महाराष्ट्र शासनाने दि. १५ जुलै रोजी जारी केलेल्या शासन परिपत्रकानुसार हैद्राबाद इनामे व रोख अनुदाने रद्द अधिनियम १९५४ अंतर्गत येणाऱ्या मदतमाश जमिनी भोगवटादार वर्ग - २ मधून वर्ग - १ मध्ये रुपांतरीत करण्याची प्रक्रिया सुलभ केली आहे. ही प्रक्रिया आता महसुल विभागामार्फत राबविण्यात येत आहे.

यापूर्वी या प्रक्रियेसाठी ५० टक्के नजराणा आकारला जात होता. यामध्ये शासनाने सुधारणा करून तो आता केवळ ५ टक्के निश्चित केला आहे. या निर्णयामुळे मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीचा कायमस्वरूपी हक्क वर्ग - १ मध्ये मिळविणे शक्य होणार आहे.

या साठी छत्रपती शिवाजी महाराज महसूल अभियानांतर्गत विशेष शिबिरे आयोजित करण्यात येणार आहेत.या शिबिरात पात्र शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन पैठण - फुलंब्री उपविभागीय अधिकारी यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे. अधिक माहितीसाठी व आवश्यक कागदपत्रांसाठी संबंधित मंडळ अधिकारी व तलाठी यांच्याशी संपर्क साधवा. असे कळविले आहे.

## ऍमेझॉनने प्रस्तुत केले समर्पित स्टोअर

छत्रपती संभाजीनगर : ऍमेझॉन इंडियाने आज ऍमेझॉन डॉट इन वर समर्पित गणेश चतुर्थी स्टोअर सुरू करण्याची घोषणा केली, जे ग्राहकांना पर्यावरणपूरक आणि पारंपारिक उत्सवाच्या आवश्यक वस्तूंचा विचारपूर्वक तयार केलेला संग्रह देणार आहे. या स्टोअरमध्ये मातीच्या गणेशमूर्ती आणि हस्तनिर्मित सजावटीच्या साहित्यापासून ते उत्सवाचे कपडे, पूजासाहित्य आणि गोड पदार्थांपर्यंत सर्व काही उपलब्ध असून ही उत्पादने अमर्यादपणे आणि शाश्वतपणे साजरीकरण करता यावे याकरिता तयार करण्यात आली आहेत. ग्राहक उत्पादने शोधण्यासाठी, वैयक्तिकृत शिफारसी मिळविण्यासाठी आणि त्यांचा उत्सवातील खरेदी अनुभव वाढविण्यासाठी ऍमेझॉनच्या एआय-संचालित शॉपिंग असिस्टंट रुफसचा वापर देखील करू शकतात.

### जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, (क. स्तर) न्यायालय गंगापुर जि. औरंगाबाद.**

सिव्हील एम ए.क. ४९८/२०२५ पुढील तरीख दि.०३/०९/२०२५

अर्जदार : १) कचरू विठ्ठल शिंदे, वय ३८ वर्ष, धंदा शेती, रा. घोडेगांव ता. गंगापुर जि. औरंगाबाद. २) मालती विठ्ठल शिंदे, तय ४४ वर्ष, धंदा घरकाम, रा. विनय युनीक इम्पोरिया बिल्डींग, सी विंग फ्लॅट क ४०८, ४ फ्लोर, अग्रवाल लाईफ स्टाईल, विरार वेस्ट, पालघर. ३) सुरेखा दत्तु म्हैसमाळे, वय ११ वर्ष, धंदा घरकाम, रा. शहापुर बंजर ता. गंगापुर जि. औरंगाबाद. ४) सुमनबाई सोपान कांबळे, वय ५२ वर्ष, धंदा घरकाम, रा. नगिना पिंपळगांव ता. वैजापुर जि. औरंगाबाद. ५) मुक्ता मच्छिंद्र लोखंडे, वय ३८ वर्ष, धंदा घरकाम, रा. घोडेगांव ता. गंगापुर जि. औरंगाबाद. ६) ममता विनायक गोळेकर, वय ३६ वर्ष, धंदा घरकाम, रा. संदेशनगर, बैलबाजार कुर्ला मुंबई.

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट VIII 1827 अन्वये लिगल हेअरशिप सर्टिफिकेट मिळणे बाबत

सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त अर्जदार यांनी या न्यायालयात ॲड. एस. एन. साबणे, गंगापुर यांच्यामार्फत बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट VIII 1827 अन्वये लिगल हेअरशिप सर्टिफिकेट मिळणे कामी अर्ज सादर केला आहे की, अर्जदार हे वर नमुद ठिकाणचे राहणारे असुन अर्जदार क १ ते ६ हे आपसात सख्खे भाउ व बहिनी आहेत. अर्जदार क १ ते ६ यांचे वडील नामे विठ्ठल राधाजी शिंदे हे दि. १२/१०/२०१५ रोजी मौजे घोडेगांव ता. गंगापुर जि. औरंगाबाद येथे मयत झालेले असुन मयत विठ्ठल राधाजी शिंदे यांची पत्नी म्हणजेच अर्जदार क १ ते ६ यांची आई नामे शशिकला विठ्ठल शिंदे हि दि. २१/११/२०२० रोजी मौजे घोडेगांव ता. गंगापुर जि. औरंगाबाद येथे मयत झालेली आहे. दोन्ही मयतांना अर्जदार क १ हा मुलगा व अर्जदार क २ ते ६ हया मुली कायदेशीर वारसदार आहेत त्यांच्या व्यतिरिक्त मयतांना इतर कोणीही कायदेशीर वारसदार नाहीत. मयत विठ्ठल राधाजी शिंदे व मयत शशिकला विठ्ठल शिंदे यांना अर्जदार क १ ते ६ हेच एकमेव कायदेशीर वारसदार आहे. अर्जदारांच्या व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही वारसदार नाही. मयत विठ्ठल राधाजी शिंदे व मयत शशिकला विठ्ठल शिंदे यांच्या मृत्यु मुळे अर्जदारांना शासकीय, निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणुन अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज मा. न्यायालयात दाखल केला असुन वारस प्रमाणपत्राची मागणी केली आहे सबब सदर प्रकरणी कोणाचाही कोणत्याही प्रकारचा आक्षेप किंवा उजर असल्यास त्यांनी प्रस्तुत जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत या न्यायालयात नोंदवावा. त्यानंतर आलेल्या आक्षेपाचा विचार केला जाणार नाही. करीता जाहीर प्रगटन.

आज दि.२१/०७/२०२५ रोजी माझ्या सहिने व या न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशावरून

लिपीक सहाय्यक अधिक्षक दिवाणी

न्यायालय क. स्तर गंगापुर

### जाहीर प्रगटन

**मा.दिवाणी न्यायाधिश न्यायालय व.स्तर गंगापुर, ता. गंगापुर जि. औरंगाबाद**

दिवाणी किरकोळ अर्ज नं. ५५८/२०२५

हिराबाई उत्तम गवळी व इतर

विरुध्द निरंक

प्रकरण - भारतीय वारसा कायदा १९२५ चे कलम ३७२ प्रमाणे अर्ज

ज्याअर्थी अर्जदार नं. १ यांचे पती, अर्जदार नं. २ ते ४ यांचे वडील नामे उत्तम महादु गवळी दि.२८/०५/२०२३ रोजी रांजणगाव शेणपुंजी, बजाजनगर, ता.गंगापुर जि. औरंगाबाद येथे मृत्यु पावले असुन अर्जदार नं. १) हिराबाई उत्तम गवळी, २) रमेश उत्तम गवळी, अर्जदार नं. १ व २ रा.गल्ली क्रमांक १. सावता मंदिराजवळ, सावता नगर, रांजणगाव शेणपुंजी, ता. गंगापूर जि. औरंगाबाद ३) मंगलबाई ज्ञानेश्वर गोल्हारे, ४) उज्वला मधुकर गोल्हारे अर्जदार नं. ३ व ४ रा.पाल. ता. फुलंब्री, जि.औरंगाबाद यांनी मयताचे नावे बँकेमध्ये असलेल्या खाली नमुद रक्कमेचे अनुषंगाने वारस प्रमाणपत्र मिळणे कामी ॲड.बी. पी.जोशी, गंगापुर यांचे मार्फत या न्यायालयात अर्ज सादर केला आहे.

१) आय.सी.आय.सी.आय. बँक शाखा एम.आय.डी.सी. वाळूज, बजाजनगर, ता. गंगापूर रक्कम रु.३३,२५३.२८/-

२) स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा एम.आय.डी.सी. वाळूज, बजाजनगर, ता. गंगापूर रक्कम रु.२.५८,००५.९८/-

३) मुदत ठेव पावती क्रमांक १३२४३४४१ दिनांक १६/०९/२०२१ रक्कम रु.३,००,०००/- आय.सी.आय.सी.आय. बँक शाखा एम.आय.डी.सी. वाळूज, बजाजनगर, ता. गंगापूर

४) मुदत ठेव पावती क्रमांक १९८२८१५३ दिनांक २८/०६/२०२२ रक्कम रु.१,००,०००/- आय.सी.आय.सी.आय. बँक शाखा एम.आय.डी.सी. वाळूज, बजाजनगर, ता. गंगापूर

५) बचत बैंक खाते क्रमांक ६२१८५९३५७५८ स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा एमआयडीसी वाळूज, बजाजनगर, ता. गंगापूर रक्कम रु. जय बजरंग साउंड सर्व्हिसचे मालक मयत उत्तम महादू गवळी यांच्या नावावरील खात्याच्या विवरणानुसार,

त्याअर्थी अर्जदार नं. १ ते ४ यांना या न्यायालया तर्फे वारस प्रमाणपत्र देणे कामी कोणाचाही कोणत्याही प्रकारचा आक्षेप असल्यास जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्याचे तारखेपासून ३० दिवसाचे आत या न्यायालयात लेखी आक्षेप स्वतः अथवा आपल्या विधीज्ञा मार्फत नोंदवावा. मुदतीचे आत आक्षेप प्राप्त न झाल्यास पुढील कायदेशीर कार्यवाही नियमाप्रमाणे करून अर्जदारांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. सदरचे जाहीर प्रगटन माझ्या सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी प्रसिध्दीस देण्यात येत आहे.

दि.१६/०८/२०२५

आदेशावरून

सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय व. स्तर गंगापुर

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर), सोयगांव यांचे न्यायालय, ता. सोयगांव जि. औरंगाबाद.**

### जाहीर प्रगटन

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.: २५०/२०२५.

अर्जदारः १) दिलीप रतन माळी उर्फ गोपाळ, वयः ४० वर्षे, धंदा :- शेती, २) साहेबराव रतन माळी, वय ३७ वर्षे, धंदा शेती, ३) रविंद्र रतन माळी उर्फ गोपाळ, वयः ४३ वर्षे, धंदा शेती, ४) जिजाबाई रतन माळी उर्फ गोपाळ, वयः ६७ वर्षे, धंदा शेती, वरील सर्व रा. घोसला ता. सोयगांव जि. औरंगाबाद.

// विरूध्द //

गैरअर्जदार : निरंक.

अर्ज : वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधीतास जाहीर प्रकटन व्दारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी ॲड. आर. एस. महाजन साहेब, सोयगांव ता. सोयगांव जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर), यांच्या मार्फत या न्यायालयात वारस प्रमाणपत्रासाठी अर्ज केलेला आहे. मयत नामे. रतन महादु माळी उर्फ गोपाळ, हे दिनांकः ०४/०८/२०२२ ला मौजे घोसला ता. सोयगांव जि औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर) येथे मयत येथे मयत झालेले असुन त्यांना वरील अर्जदार हे वारसदार आहे. अर्जदारांना शासकीय सवलतसाठी व शासकीय लाभासाठी वारस प्रमाणपत्र मिळणे आवश्यकता आहे. सदरचा अर्ज हा अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळवण्यासाठी दाखल केलेला आहे.

(पुढील दिनांक :- ०१/१०/२०२५).

तरी, ज्या कोणाचा अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनव्दारे प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत या न्यायालयात योग्यं त्या कागदोपत्रीसह उजर अगर आक्षेप नोंदवावा. अन्यथा अर्जदारांना कायदेशीर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक : २१/०८/२०२५ ला रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले.

विभागीय लिपीक. सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क. स्तर, सोयगांव

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर), सोयगांव यांचे न्यायालय, ता. सोयगांव जि. औरंगाबाद.**

### जाहीर प्रगटन

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२५१/२०२५.

अर्जदारः १) रेखा गणेश सोनवणे वयः २९ वर्षे, धंदा मजुरी २) कु. वैष्णवी गणेश सोनवणे वयः ११ वर्षे, अ. पा. क. अर्जदार नं.१. ३) कु. तनुजा गणेश सोनवणे, वयः-०७ वर्षे, अ. पा. क. अर्जदार नं.१ . ४) कमलबाई सुकदेव सोनवणे वय ५५ वर्षे धंदा-मजुरी ५) सुकदेव शंकर सोनवणे वय -६० धंदा-मजुरी वरील सर्व रा. बनोटी ता. सोयगांव जि. छत्र. संभाजीनगर (औरंगाबाद.)

// विरूध्द //

गैरअर्जदार : निरंक.

अर्ज : वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधीतास जाहीर प्रकटन व्दारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी ॲड. आर. एस. महाजन साहेब, सोयगांव ता. सोयगांव जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर), यांच्या मार्फत या न्यायालयात वारस प्रमाणपत्रासाठी अर्ज केलेला आहे. मयत नामे - गणेश सुकदेव सोनवणे हे दिनांक ११/१२/२०२१ ला मौजे बनोटी ता. सोयगांव जिः छत्र संभाजीनगर औरंगाबाद येथे मयत झालेले असुन त्यांना वरील अर्जदार हे वारसदार आहे. अर्जदारांना शासकीय सवलतसाठी व शासकीय लाभासाठी वारस प्रमाणपत्र मिळणे आवश्यकता आहे. सदरचा अर्ज हा अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळवण्यासाठी दाखल केलेला आहे.

(पुढील दिनांक :-१/१०/२०२५).

तरी, ज्या कोणाचा अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनव्दारे प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्रीसह उजर अगर आक्षेप नोंदवावा. अन्यथा अर्जदारांना कायदेशीर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक :-२१/०८/२०२५ ला रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले.

विभागीय लिपीक. सहाय्यक अधिक्षक,

दिवाणी न्यायालय क. स्तर, सोयगांव

## अग्रलेख...

# रामराज्य आणि राजकारण!

आदर्श समाजव्यवस्था म्हणून ज्या संकल्पनेचा प्रभाव भारतीय जनमानसावर पुराणकाळापासून आहे, त्या रामराज्याच्या संकल्पनेत, पारदर्शक प्रशासन, संवेदनशील शासन आणि कृतिशील यंत्रणा या तीन बाबींचा समावेश होतो. रामायण ही पुराणकथा की वास्तव यावर कितीही वाद असले, तरी रामराज्य ही संकल्पना म्हणजे आपला सांस्कृतिक वारसा आहे, ही बाब अमान्य केली जात नाही. महात्मा गांधींनी ज्यासाठी ब्रिटिशांविरोधातील स्वातंत्र्यलढ्याचे नेतृत्व केले, त्यामागे त्यांनादेखील स्वातंत्र्यानंतरच्या रामराज्याच्या संकल्पनेतील राज्यव्यवस्थाच अपेक्षित होती. सत्य आणि सद्भावना यांचा प्रभाव असलेली आणि लोकांची, लोकहितासाठी राबणारी व्यवस्था म्हणजे रामराज्य ही त्यांची संकल्पना होती. अर्थात, असे रामराज्य कधी अस्तित्वात येईल का, याविषयी त्यांच्या मनात शंकादेखील होती. स्वातंत्र्याच्या जेमतेम दोन महिने आधी 'हरिजन' या नियतकालिकातील एका लेखात गांधीजींनी व्यक्त केलेली ही शंका कालातीतपणे आजही देशासमोर तेच प्रश्नचिन्ह होऊन उभीच आहे. रामराज्य हे राजकुमार आणि गरीब, सामान्य माणूस या दोघांनाही समान हक्क प्रदान करते, पण सध्याच्या अन्याय्य असमानतेच्या स्थितीत रामराज्य असूच शकत नाही, अशीही त्यांची खंत होती. म्हणूनच स्वातंत्र्याची शतक महोत्सवी वाटचाल करणाऱ्या आजच्या अमृतकाळात पाऊणशे वर्षांपूर्वीच्या गांधीजींच्या कल्पनेतील रामराज्याचा आज कोठे सुगावा लागतो का, हे पाहणे गरजेचे आहे.

भारताच्या लोकशाहीमध्ये विधिमंडळे व संसद हे जनहिताची कामे करवून घेण्याचे हक्काचे सर्वोच्च स्थान असल्याने या सभागृहांकडे जनतेच्या साऱ्या अपेक्षा एकवटलेल्या असतात. ज्यांना आपल्या हिताचे विश्वस्त या जबाबदारीनिशी सभागृहात पाठविलेले असते, त्यांनी या सभागृहांचा वापर संयतपणे, समंजसपणे आणि पूर्णतः जनहिताच्या मुद्द्यांशी निगडित विषयांच्या चर्चेसाठी करावा अशी सामान्यतः अपेक्षा असताना, अशा सभागृहांत अधिवेशनांसारख्या महत्त्वाच्या काळात जे काही पाहावे लागते, ते पाहता, अपेक्षाभंगाच्या भावनेव्यतिरिक्त अन्य काही वाट्यास येण्याची शक्यताच नाही, याची खात्री पटते. संसदेची आणि विधिमंडळाची सभागृहे हा राजकारणाचा आखाडा बनला आहे, अशी सर्वसामान्यांची समजूत होण्यासाठी पोषक असे वातावरणच दिसत असेल, तर या खात्रीला अन्य पुराव्याची गरज नसते. म्हणूनच रामराज्याच्या संकल्पनेस हातभार लावणाऱ्या, पारदर्शक कारभाराच्या आणि संवैधानिक जबाबदाऱ्यांचे भान देणाऱ्या कोणत्याही निर्णयामागे पक्षभेद विसरून ठामपणे उभे राहिल्यास अशा कुरघोडीच्या राजकारणास विराम द्यावा लागेल आणि रामराज्याच्या त्या संकल्पनेची पायाभरणी करण्यात हातभार लावता येईल, अशा जाणिवा जाग्या करण्याचे मोठे आव्हान अजूनही कायम आहे. संसदेच्या पावसाळी अधिवेशनात दोन दिवसांपूर्वी, २० ऑगस्टला, जे काही सभागृहात घडले, ते पाहून रामराज्याच्या अपेक्षेने लोकप्रतिनिधींकडे पाहणाऱ्यांचा विरसच झाला असेल. राज्यकर्ते केवळ सूडबुद्धीचेच राजकारण करतात आणि विरोधकांना नामोहरम करण्याचा कट रचला जातो, अशा भावनेने ग्रासलेल्या विरोधकांनी बुधवारी संविधानातील काही दुरुस्त्यांबाबत गृहमंत्र्यांनी दाखल केलेल्या व साधकबाधक चर्चेसाठी पारदर्शीपणे खुल्या ठेवलेल्या प्रस्तावादरम्यान सभागृहात सुधारणा प्रस्तावाची कागदपत्रे फाडून फेकाफेक करणे, कागदाचे बोळे करून भिरकावणे आणि चर्चेच्या सभ्य मार्गाने सहभागी न होता केवळ गदारोळ करून कामकाजात सातत्याने व्यत्यय आणणे हा प्रकार बुधवारी देशाने अनुभवला.

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी बुधवारी लोकसभेत १३० व्या घटनादुरुस्तीसह तीन महत्त्वाचे प्रस्ताव सादर केले. भ्रष्टाचार किंवा गंभीर स्वरूपाच्या गुन्हेगारी कृत्याच्या आरोपाखाली ३० दिवसांपर्यंत कोठडीत असलेल्या कोणा मुख्यमंत्री किंवा मंत्र्यास आणि पंतप्रधानपदासारख्या पदावरील व्यक्तीसही, ३० दिवसांनंतर पदावरून हटविण्यात यावे, अशा दुरुस्तीच्या या प्रस्तावावर खरे पाहता, योग्य त्या वैधानिक माध्यमातून आणि साधकबाधक दुरुस्त्या सुचवून सभागृहाने जबाबदारीपूर्वक चर्चा घडवावी आणि राजकीय भेदांच्या पलीकडे जाऊन पारदर्शक कारभारास पोषक ठरविणारे पाऊल अधिक ठामपणे कसे पुढे टाकता येईल, याबाबत सहमतीचे राजकारण करावे, अशी अपेक्षा होती. प्रत्यक्षात तसे घडले नाही. या दुरुस्त्यांना विरोधकांनी आक्रमक विरोध केला. सत्ताधारी पक्षास धारेवर धरणे आणि विरोध करणे ही विरोधकांची भूमिकाच असते हे खरेच आहे. पण पारदर्शक आणि जबाबदारीच्या जाणिवांना बळ देणाऱ्या कोणत्याही मुद्द्यावर केवळ विरोध करून असे प्रयत्न हाणून पाडण्याचे राजकारण मात्र अनाकलनीय ठरते. मुख्यमंत्री किंवा मंत्रिपदावरील कोणाही व्यक्तीस भ्रष्टाचाराच्या आरोपावरून तुरुंगवास भोगावा लागत असेल, तर रामराज्याच्या संकल्पनेस अपेक्षित असलेल्या पारदर्शकपणाला तडा जातो, हे स्पष्ट आहे. अशा व्यक्तीने आपल्या पदाचा वापर करून तुरुंगातूनही सत्तास्थान बळकावून बसणे हे कायदेशीरदृष्ट्या कदाचित अयोग्य नसेलही; पण रामराज्याची संकल्पना केवळ कायद्याच्या बडग्याने राबविता येत नाही. त्यासाठी नैतिकतेचे पाठबळही लागते. म्हणूनच अमित शाह यांनी दाखल केलेल्या प्रस्तावास आक्रस्ताळेपणाने विरोध करणे योग्य ठरत नाही. हे खरे आहे की, या विधेयकात नमूद केलेल्या कालावधीत या देशातील कोणत्याही व्यवस्थेकडून न्याय मिळणे सहसा सामान्य माणसासही शक्य नसते. देशाच्या सर्वोच्च न्यायालयापासून न्यायव्यवस्थेच्या अखेरच्या स्तरावरील न्यायालयापर्यंत सर्वत्र कोट्यवधी खटले वर्षानुवर्षांपासून प्रलंबित आहेत आणि ज्या वैधानिक पदांवरील व्यक्तींच्या विरोधात न्यायालयात दाखल होणाऱ्या खटल्यांशी संबंधित न्यायालयीन प्रक्रिया पूर्ण करण्यात अशा यंत्रणांकडूनही दिरंगाईही होत असते. या देशात कोणत्याही कृत्याबाबत केवळ शिक्षा देणे एवढाच न्यायव्यवस्थेचा हेतू नसतो. त्यामुळेच दंड संहितेचे रूप बदलून न्यायसंहिता असा नवा चेहरा न्यायव्यवस्थेस दिला गेला. जोवर एखादी व्यक्ती गुन्हेगार असल्याचे अंतिमतः सिद्ध होत नाही, तोवर त्या व्यक्तीस गुन्हेगार मानले जात नाही. त्यामुळे केवळ ३० दिवस तुरुंगात राहिल्याने त्याचे पद रद्द होण्याची तरतूद असलेल्या या दुरुस्तीवर या अनुषंगाने साधकबाधक चर्चा होऊ शकते. संसदेमध्ये किंवा विधिमंडळांमध्ये अशा चर्चा घडविण्याची वैधानिक आयुधे उपलब्ध असतात आणि त्यांचा योग्य मार्गाने वापर करण्याचा संपूर्ण हक्क लोकप्रतिनिधी म्हणून सभागृहात दाखल होणाऱ्या व्यक्तीस असतो. त्यामुळे मुदत संपताच भ्रष्टाचार किंवा गंभीर गुन्हेगारी स्वरूपाच्या कारवायांचा आरोप असलेल्या व्यक्तीच्या कोठडीचा ३० दिवसांचा काळ संपताच त्याचे पद रद्द करण्याच्या या प्रस्तावाबाबत खुलेपणाने चर्चा होणे अपेक्षित आहे. केंद्र सरकारने याबाबत सकारात्मकता दाखविली आहे, त्यामुळेच हा प्रस्ताव आता संयुदत चिकित्सा समितीकडे पाठविण्यात आला आहे. या समितीकडून त्याची छाननी होईल आणि त्यानंतर पुन्हा त्यावर वैधानिक मार्गाने चर्चा होऊनच त्याचे भवितव्य ठरेल हे स्पष्ट असताना, अशा प्रकारे केवळ गदारोळ करणे, कागदपत्रे फाडणे, कागदाच्या बोळ्यांची फेकाफेक करणे अशा अशोभनीय कृतीमधून जनतेच्या अपेक्षाभंगाचे धनी होण्याचा ठपका माथ्यावर मारून घेण्यापेक्षा, विधायक आणि पारदर्शक राज्यव्यवस्थेच्या प्रयत्नांत सहभागी होणे केव्हाही चांगलेच ठरते.

गृहमंत्री अमित शाह यांनी संसदेत हे प्रस्ताव दाखल करताना, स्वातंत्र्यानंतरच्या आणि तेव्हापासून अगदी अलिकडच्या काळातील पदाच्या गैरवापराचे दाखले दिले. तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी आणिबाणीच्या कालखंडात केलेल्या ३९ व्या घटनादुरुस्तीमुळे या पदावरील व्यक्ती कायदेशीर कारवाईपासून मुक्त राहील, अशी तरतूद केली गेली. घोटाळ्याच्या आरोपावरून तुरुंगात असतानाही दिल्लीचे तत्कालीन मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी पदावरील पकड कायम ठेवून तुरुंगातून मुख्यमंत्रिपदाचा कारभार राबवत सरकार चालविले. ठाकरे सरकारमधील एक मंत्री अशाच काही गंभीर स्वरूपाच्या आरोपावरून तुरुंगात असतानाही, त्यांच्या खात्याबाबत मंत्रिमंडळाने घेतलेल्या निर्णयांच्या प्रसिद्धीसोबत त्यांची छायाचित्रे झळकत होती. कोणत्याही व्यवस्थेच्या किंवा यंत्रणेच्या ढिलाईमुळे दीर्घकाळ कोठडीची हवा खावी लागलेल्यास पदमुक्त व्हावे लागणार असेल, तर दंड संहितेचे नामांतर करून त्यास न्यायसंहिता असा मुखवटा चढविल्याने रामराज्याची संकल्पना साकारणार नाही.

## प्रासंगिक

श्रीराम मोतीराम पुंडे

# लोककल्याणकारी माता

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची पुण्यतिथी १३ ऑगस्ट या इंग्रजी तारखेप्रमाणे व श्रावण वद्य चतुर्दशी या मराठी तिथीप्रमाणे दरवर्षी साजरी होत असते अहिल्यानगर जिल्ह्यातील चौढी या लहानशा गावी त्यांचा जन्म झाला. वडील माणकोजी शिंदे व आई सुशीला बाई शिंदे हे भाग्यवान दाम्पत्य. सुभेदार मल्हारराव होळकर यांचा मुलगा खंडेराव व अहिल्यादेवींचा विवाह पुण्यातील शनिवार वाड्यामध्ये स्वतः पेशव्यांनी लावून दिला. त्यानंतर त्या सासरी इंदोर येथे गेल्या. सुसंस्कारित अहिल्यादेवींनी सर्वांना आपलेसे करून घेतले. संधी मिळतात त्याचे सोने कसे करावे हे त्यांनी आत्मसात केले होते. त्याचप्रमाणे त्यांनी सर्वांची मने सुद्धा जिंकली होती. इंग्रजी तत्त्ववेत्ता सर जॉन माल्कम यांनी असे म्हटले आहे की, अहिल्यादेवींचे चरित्र हे अलौकिक आहे. ती स्त्री असून तिच्यात मुळीच अहंमन्यता नव्हती. तिला धर्माचे विलक्षण वेड होते. पण असे असूनही तिच्या ठायी परधर्म सहिष्णुता तितकीच होती. त्यांचे धार्मिक कार्य हे भारताच्या इतिहासातील सोनेरी पान आहे. भारत माता ही आपली सर्वांची आई असून तिची योग्य ती सेवा आपापल्या परीने सर्वांनीच करावी हा उदात्त विचार त्याकाळी त्यांच्या मनामध्ये आला व तो त्यांनी प्रत्यक्ष आचरणात आणण्याचा प्रयत्न करून भारताचा भूभाग जुळवून देशाची एकात्मता साधण्याचा आटोकाट प्रयत्न केला. आपल्या देशामध्ये त्याकाळी ४८० च्या वर संस्थाने होती. प्रत्येक जण आपापल्या संस्थांमध्ये गुंग होता. देशाच्या एकात्मतेचा विचार करणाऱ्या फक्त अहिल्यादेवी या एकमेव होत्या. त्या कट्टर हिंदुत्ववादी होत्या. परकीयांनी आक्रमणे करून देशातील मंदिरे उद्ध्वस्त केली होती. अहिल्यादेवींनी संपूर्ण देशातील मंदिरांचा जीर्णोद्धार केलाच त्याचबरोबर बौद्ध विहारे आणि मशिदी सुद्धा बांधून दिल्या. त्यामुळे त्यांच्याबद्दल देशवासीयांच्या मनामध्ये एक नवीन विश्वास निर्माण झाला होता. आसेतुहिमाचल पसरलेला हा देश माझा आहे ही भावना जागृत करण्याचे काम अहिल्यादेवींनी केले. आमच्या चालीरीती, भाषा, वेष जरी भिन्न असले तरी या भारतभूमीची आम्ही सर्व लेकरे आहोत ही भावना त्यांनी त्याकाळी लोकांमध्ये जागृत केली. त्यांनी आपल्या कार्याच्या बळावर संपूर्ण देश जोडण्याचा प्रयत्न केला. त्यातही त्या यशस्वी देखील झाल्या. चारही धाम त्यांनी रस्त्याने जोडले. रस्त्याच्या बाजूला झाडे लावली. पिण्यासाठी पाणी उपलब्ध करून दिले.



पाय विहिरी देखील तयार केल्या. अनेक नद्यांवर घाट बांधून लोकांची योग्य ती सोय केली. अन्नक्षेत्रे उघडली. प्रजेला योग्य तो न्याय दिला. परिणामतः जनताही त्यांच्यावर खुश होती.

आज आपल्या देशात रस्त्याचे महत्त्व समजले आहे. मात्र त्याकाळी अहिल्यादेवींनी राज्याच्या प्रगतीकरिता व समृद्धीकरिता रस्त्याचे महत्त्व ओळखले होते. रस्ते म्हणजे राज्याच्या रक्तवाहिन्याच. रस्ते वाहत राहतील तरच राज्याची प्रगती होईल असे त्यांना वाटत असे. त्यांनी आपल्या राज्यातील रस्ते तर बांधलेच परंतु राज्याबाहेरील अनेक रस्ते व पूल बांधले. कलकत्ता ते काशी हा रस्ता त्यांनी बांधल्याचा पुरावा आजही उपलब्ध आहे. रस्त्याच्या दुतर्फा झाडे लावून, विहिरी खोदून त्यांनी लोकांची सोय केली होती. अहिल्यादेवींची परराष्ट्र नीती सुद्धा वाखाणण्याजोगी होती. शेजारी राज्याशी त्यांचे सलोख्याचे संबंध होते. आपल्या राज्याच्या सीमा वाढविण्याचा आततायीपणा त्यांनी कधीच केला नाही. त्याकाळी अनेक राजांना आपण अहिल्यादेवींचे मित्र आहोत याचा सार्थ अभिमान वाटत असे. त्या काळातील परिस्थितीचा विचार करता तत्कालीन राज्यकर्ते हे आपल्या प्रजेकडून पैसा वसूल करत असत आणि थोडासा पैसा लोककल्याणाकरिता खर्च करून जास्त पैसा वैयक्तिक विकासाकरिता खर्च करीत असत. अहिल्यादेवींना स्वतःचे खाजगी उत्पन्न होते. त्यांनी त्यातून स्वतःसाठी, चैनीसाठी खर्च केला असता तरी त्यांना कोणी नावे ठेवली नसती. परंतु त्यांनी तसे न करता आपले संपूर्ण खाजगी जहागिरीचे उत्पन्न लोककल्याणासाठी खर्च केले. त्याकाळच्या राज्यकर्त्यांच्या तुलनेत त्या अतिशय साधे जीवन जगत होत्या.

ही भारत भूमी एक असून आमची संस्कृती ही एकच आहे आणि येथील धार्मिक सत्ता ही सार्वभौम आहे ही भावना त्यांनी लोकांमध्ये जागविली म्हणूनच पुण्यश्लोक अहिल्यादेवींना नमन करणे म्हणजे भारतीय संस्कृतीला नमन करणे होय. प्रबळ इच्छाशक्ती, बुद्धिमत्ता, चातुर्य, दूरदृष्टी, पराक्रम, अफाट कर्तृत्व, त्याग, चरित्र, धार्मिक निष्ठा आदी अलौकिक गुण अहिल्यादेवींच्या अंगी होते म्हणूनच पंडित मोरोपंत म्हणतात- देवी अहिल्या झालीस तू जगत्रयात धन्या॥ न न्याय धर्मनिरता अन्या कली माजी एकली कन्या । हे देवी, तू या तिन्ही लोकांमध्ये धन्य आहेस, न्याय आणि धर्माचे पालन करणारी तू कलियुगामध्ये एकटीच आहे. तुला या जगामध्ये तोड नाही. दौलत सांभाळण्यासाठी प्रसंगी कुणापुढेही लाचार व्हावे, गोरगरिबांची लुटालूट करावी व ती संपत्ती स्वतःच्या भूगोलाकरिता वापरावी यातच रममान असलेल्या तत्कालीन राजकारण्याच्या काळ्याकुट्ट रात्रीमध्ये देवघरातील समईच्या ज्योतीप्रमाणे सतत तेवत राहून अहिल्यादेवींचे जीवन मनाला मोठा सात्त्विक आधार देणारे व धर्म प्रेरणा उजाळून टाकणारे असेच आहे. "परोपकाराय फलनीवृक्ष परोपकारायच वहन्नती नद्या " या उक्तीप्रमाणे त्यांनी आपले संपूर्ण जीवन समाजसेवेकरता समर्पित केले होते. हरिभक्त परायण धुंडा महाराज देगलूरकर यांनी असे म्हटले आहे की, भारताच्या या पुण्यभूमीवर अनेक थोर व्यक्ती, महात्मे अवतरले पण या भूमीचे पुण्य कुणामुळे टिकून राहिले असेल तर ते फक्त आणि फक्त पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्यामुळेच. आज त्या माउलींची २३० वी पुण्यतिथी. त्यांच्या पावन स्मृतीस विनम्र अभिवादन.

८२७५०६३६९८

## वेध

रेवती जोशी-अंधारे

# पहलगाम, सिंदूर आणि क्रिकेट

येत्या ९ सप्टेंबरपासून सुरू होणाऱ्या या क्रिकेट मालिकेत भारत आणि पाकिस्तान संघांदरम्यान १४ सप्टेंबरला सामना खेळला जाणार आहे. सोबतच दोन्ही संघादरम्यान आणखी दोन सामने खेळले जाण्याचीही शक्यता आहे. क्रिकेट ही राष्ट्रभावना समजल्या जाणाऱ्या आपल्या देशात, भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने हा सामना खेळण्यास नकार द्यावा, असा मतप्रवाह आहे. मात्र, 'पैसा बोलता है' या न्यायाने बीसीसीआयने या सामन्याला नकार देता येणार नाही, असं उत्तर दिलं आहे.

याच पाकिस्तानच्या हॉकी संघाने, भारत सुरक्षित नसल्याचे कारण सांगून आशिया चषक खेळण्यास नकार दिला होता, हे आपल्या गजनी स्मरणशक्तीला कोण सांगणार? सी-व्होटरच्या ताज्या सर्वेक्षणानुसार, ५१ टक्के भारतीयांनी भारत-पाकिस्तान सामना खेळण्यास विरोध केला आहे तर ४५ टक्के नागरिकांच्या मते, हा सामना खेळला जायला हवा. दहशतवादाला प्रोत्साहन देणाऱ्या पाकिस्तानसोबत क्रिकेटचे संबंध ठेवणे हा आपल्या जवानांच्या बलिदानाचा अपमान आहे, असं मानणाऱ्या भारतीयांची संख्या ७५ टक्के आहे.



१९८४ मध्ये सुरू झालेल्या आशिया चषकाच्या दुसऱ्याच सिझनमध्ये श्रीलंकेकडे यजमानपद असताना, भारतीय संघानं खेळण्यास नकार दिला. १९९०-९१ मध्ये राजकीय संबंध बिघडल्याचे कारण सांगून पाकिस्तानने भारतात येऊन खेळण्यास नकार दिला. हरभजन सिंग, शिखर धवन, युवराज सिंग, सुरेश रैना, इरफान पठाण आणि युसूफ पठाण यांच्यासारख्या क्रिकेटपटूंनी देश सबसे पहले अशी भूमिका सोशल मीडियावर स्पष्ट केली आहे. एकीकडे भारतीय क्रिकेटपटू ठाम मत मांडत असताना, पाकिस्तानी क्रिकेटपटूंनी मात्र पुन्हा विकृत मानसिकतेचं प्रदर्शन मांडलं. तसे तर पाकिस्तानी इनफ्लुएन्सर्सचे इन्स्टाग्राम खाते भारतात बंद आहेत. पण, पाकचा क्रिकेटपटू राणा फहीम अश्रफ याची चिथावणीखोर पोस्ट व्हायरल झाली आहे. त्यात पाकिस्तानी आर्मीच्या गणवेशातील व्यक्ती तिरंग्याची साडी नेसलेल्या स्त्रीचा हात पकडून, तिच्या भांगात सिंदूर भरतो आहे. मागे एक बॅनर लागले असून त्यावर 'न्यू चॅप्टर बिगिन्स' असे लिहिले आहे. पाकिस्तानला कोणते नवीन चॅप्टर सुरू करायचे आहे? ऑनलाईन पोस्टच्या या लढाईत पाकिस्तानने नेहमीप्रमाणे पातळी सोडली आहे. हा अश्रफ आशिया चषकात खेळणार आहे.

भक्कम रेव्हेन्यूचा चष्मा लावलेल्या बीसीसीआयने राष्ट्रसन्मान कधीचाच विकला आहे. नागरिकांचा विरोध सहन करू, दुबईचा न्युट्रल व्हेन्यू निवडू आणि पाकड्यांचे भारतमातेवरील घाणेरडे कॉमेंट्सही सहन करू; पण पैसा कमविण्याची संधी सोडणार नाही, अशी लोभी भूमिका घेतलेली बीसीसीआय हा सामना खेळविण्यासाठीच उतावीळ आहे. एकीकडे ऑपरेशन सिंदूर अजून सुरू आहे. त्यावरून राजकारणही रंगलेलं आहे. पहलगाम हत्याकांडातून दुर्दैवी कुटुंबं सावरलेली नाहीत, सिंधूचं पाणी थांबलेलं आहे आणि दुसरीकडे भारतीयांच्या गळ्यातील ताईत असलेला भारतीय संघ दहशतवादी देशासोबत सामना खेळण्यास धडपडतो आहे. पाकिस्तानवर भारतीय परराष्ट्र धोरणामुळे निर्माण झालेला दबाव आणखी वाढविण्याची हीच संधी होती.

भारतीय क्रिकेट नियामक मंडळ जगातील सर्वाधिक शक्तिशाली आणि आर्थिकदृष्ट्या प्रभावी क्रिकेट मंडळ आहे. पाकिस्तान क्रिकेट बोर्डही त्यांच्या अर्थव्यवस्थेप्रमाणेच दिवाळखोर आहे. अशात भारत-पाकिस्तानचा सामना होणं म्हणजे पाकिस्तानला आर्थिक उभारी मिळण्यासारखं आहे. जगभरात एक अब्ज लोक हा सामना बघतील, असा अंदाज आहे. त्यातून प्रसारक, प्रायोजक आणि क्रिकेट मंडळांना सामान्यांच्या कल्पनेपलीकडे फायदा होतो. ही एक मॅच न खेळून होणारं नुकसान, बीसीसीआय आणि करोडपती खेळाडू सहज उचलू शकतात. आपल्या नियम, अटी, शर्ती लावून अनेक वेळा बीसीसीआयने टूर्नामेंट्समध्ये भाग घेतला आहे. आता राष्ट्राचे धोरण आणि समाजाची धारणा लक्षात ठेवून निर्णय घेण्याची वेळ आली आहे.

९८५०३३९२४०

## दखल

मोरेश्वर बडगे

# शरद पवार किती खरं बोलतात?

'काँग्रेसला सावरायचे असेल तर शरदलाच मुख्यमंत्री करायला पाहिजे' असे कोण बोललं असेल? कल्पना करा. लक्षात येत नाही ना. येणारच नाही. कसा येईल? ज्येष्ठ नेते शरद पवारांचा तसा रेकॉर्डच नाही. मात्र, पवारांनी तसा रेकॉर्ड काढला आहे. पुण्यातल्या एका कार्यक्रमात पवारांनी तसा दावा केला. 'काँग्रेसला सावरायचे तर शरदलाच मुख्यमंत्री करायला पाहिजे' असे दुसरे तिसरे कोणी नाही तर खुद्द वसंतदादा पाटील म्हणाल्याचा संदर्भ पवारांनी दिला तेव्हा श्रोते हादरले असणार. 'ज्याचं सरकार मी पाडलं त्या वसंतदादांनी १० वर्षांनंतर काँग्रेसच्या बैठकीत माझं नाव मुख्यमंत्रिपदासाठी सुचवले' असे सांगत पवारांनी दादांची महानता सांगितली. शरद पवार खोटं बोलतात असं मी म्हणणार नाही; पण पवार किती खरं बोलतात? हा प्रश्न वेळोवेळी उठत आला आहे. पवार जे बोलतात त्याच्या उलट करतात, ही पवारांची ख्याती त्यांचे कार्यकर्तेही सांगतील. ते ठीक आहे. इथे मुद्दा वसंतदादांचा आहे. दादा असं बोलले असतील? कारण 'त्याने खंजीर खुपसला' हे शब्द दादांचे आहेत. खंजिराच्या जखमा दादा त्या १० वर्षांत विसरले असतील? ज्या काळाचा संदर्भ पवार देतात त्या काळात दादांच्या हातात काहीही उरले नव्हते. मग पवार असं का बोलले असावे? बोलले, तर पवारांनी काँग्रेसला किती सावरलं? पवार नेहमीच सत्तेच्या सोबत राहत आले. आपली ही दुखरी नस लपवण्यासाठी त्यांनी लोकांपुढे सतत स्वतःला संभ्रमावस्थेत ठेवले. काहीतरी मोघम बोलायचे आणि त्याचा अर्थ शोधताना कार्यकर्त्यांची होणारी पळापळ एन्जॉय करायची, हा पवारांचा खाक्या राहिला आहे. मीडियातले त्यांचे भक्त याला 'पवारांची गुगली' संबोधतात. मग वसंतदादांबद्दलचे त्यांचे वक्तव्य हेदेखील गुगली समजायचे? पवार काँग्रेसला सावरायच्या भानगडीत कधीही पडले नाहीत, असेच इतिहास सांगतो. सत्तेच्या शिड्या चढण्यासाठी त्यांनी वेळप्रसंगी काँग्रेसला वापरून घेतले. चढायचे नाही तेव्हा फेकून दिले. आजच्या राजकारणाबद्दल खूप वाईट बोलले जाते. 'आताचे राजकारण खूप गढूळ झाले आहे. राजकारणाचा पोत बिघडला आहे' असे खूप काही बोलले जाते. त्याची सुरुवात पवारांनी केली का? वसंतदादा यांच्याविरोधात बंड करून पवार राज्याचे सर्वात तरुण मुख्यमंत्री झाले. 'खंजीर' हा शब्द पवारांमुळे राजकारणात चर्चेत आला. राजकारणात सत्ता हवी असेल तर सोबत खंजीर बाळगावा लागतो आणि संधी मिळताच तो खुपसावाही लागतो, हे शरद पवारांनी दाखवून दिले. पुढे त्यांनी ही दीक्षा उद्धव ठाकरे यांनाही दिली. मुख्यमंत्री होण्यासाठी भाजपा-शिवसेना युती मोडून ठाकरे शरद पवारांच्या मांडीवर जाऊन बसले. नियती मोठी क्रूर असते. या जन्माचा हिशोब याच जन्मात चुकता करावा लागतो. पुतण्याने काकाचे आमदारच नव्हे तर पक्षच पळवून हिशोब चुकता केला.



राक्षसाची ताकद त्याच्या बेंबीत असते असे म्हणतात. पवारांची ताकद कशात होती, की त्यांनी तब्बल ५० वर्षे महाराष्ट्राला आपल्या गुगलीवर खेळवले, झुलवले? मुळात ताकद होती कुठे? सत्तेच्या सोबतीत राहून पवारांनी पत्ते पिसले. १९८५ च्या निवडणुकीत पवार काँग्रेससोबत नव्हते. त्या निवडणुकीत महाराष्ट्रात काँग्रेसला १८५ जागा मिळाल्या होत्या. त्या नंतरच्या सलग पाच निवडणुकीत कधीही काँग्रेसला एवढी श्रीमंती अनुभवता आली नाही. या काळात पवार काँग्रेससोबत होते किंवा काँग्रेसमध्ये तरी होते. इंदिराविरोधी राजकारण पवार खेळले. कसेही करून सत्तेत राहायचे हा पवारांचा मूलमंत्र राहिला. कधी राजीव गांधी यांच्या नेतृत्वात काँग्रेसमध्ये प्रवेश घेऊन त्यांनी मुख्यमंत्रिपद मिळविले तर १९९९ मध्ये सोनिया गांधी विदेशी आहेत, असे सांगून राष्ट्रवादी काँग्रेस नावाचा स्वतःचा पक्ष काढला. नंतर सोनियासोबत जाऊन केंद्रात तब्बल १० वर्षे मंत्रिपद मिळवलं. १९९९ मध्ये पवारांनी स्वतःचा राष्ट्रवादी पक्ष काढला तेव्हा बंगालच्या ममता बॅनर्जी राजकारणात आल्या नव्हत्या किंवा चंद्राबाबू नायडू यांचा तेलगू देसम पक्षही स्थापन झाला नव्हता, शिवसेनाही मुंबईपुरती होती. आज ममता कुठे आहेत आणि पवार कुठे आहेत? तुम्हीच तपासून पहा. ममता किंवा जगन मोहन रेड्डी यांनी जितका मुरब्बीपणा दाखवला, तितकेच पवार उतावळे राहिले. त्यांनी कधी सत्तेशी संघर्ष केला नाही. 'जुगाड टेक्नॉलॉजी'च चालवली. जिल्ह्यातले कारखानदार, धनाढ्य माणसांची मोळी म्हणजे पवारांचा पक्ष. आमदार कसे खेचता येतील, यातच पवारांनी धन्यता मानली. नुसत्या कोलांटउड्या मारण्यात या तथाकथित 'जाणत्या राजा'ने ५० वर्षे वाया घालवली. आज त्यांच्या पावसात भिजण्याचं ज्यांना कौतुक वाटते त्यांच्या बुद्धीची कीव कराविशी वाटते. पवार वसंतदादांचे झाले नाहीत तसे राजीव गांधी यांचेसुद्धा झाले नाहीत. सदा उंटाच्या चालीसारखे तिरकस चालले. इंदिराजींच्या मृत्यूनंतर राजीव गांधींना प्रचंड प्रतिसाद मिळालेला पाहून पवारांनी १९८७ मध्ये औरंगाबादेत आपला पक्षच काँग्रेसमध्ये विलीन केला. मात्र, राजीव गांधी यांच्या हत्येनंतर सोनिया गांधी आपल्याला पंतप्रधानपदाचा उमेदवार म्हणून घोषित करतील, अशा भ्रमात पवार होते. तसे झाले नाही तेव्हा पवारांनी सोनिया गांधींच्या विरोधात वेगळी काँग्रेस काढली. पण पुढे केंद्रीय मंत्रिमंडळात घुसले. पवार सत्तेशिवाय राहूच शकत नाहीत. देशाचे कृषिमंत्री तब्बल १० वर्षे होते. मंत्री म्हणून काय दिवे लावले? आज दररोज सात शेतकऱ्यांच्या आत्महत्या होतात, असे सांगितले जाते. कुठलीही विशेष कर्तबगारी नसताना पवार महिमामंडन सुरू आहे का?

नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत पवारांच्या राष्ट्रवादीला फक्त १० जागा मिळाल्या. १९८५ मध्ये पवारांनी लढवलेल्या निवडणुकीत त्यांच्या पक्षाला ५२ जागा मिळाल्या होत्या. पाच वर्षांपूर्वी म्हणजे २०१९ मध्ये पवारांनी काँग्रेससोबत हातमिळवणी करून निवडणुका लढवल्या तेव्हा त्यांना मिळालेल्या जागा होत्या ५४. आणि आज २०२५ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीत पवारांच्या राष्ट्रवादीला मिळालेल्या जागा आहेत फक्त आणि फक्त आठ आणि विधानसभेत त्यांनी जिंकलेल्या जागा आहेत अवघ्या १०. त्यामुळे पवारांची ताकद आज विचाराल तर ती फक्त १० आमदार निवडून आणण्याइतकी आहे. अशा हवेतही पवार तलवारबाजी करत आहेत. त्यांना हवे आहे तरी काय? राजकारणात रिटायरमेंटचे वय नसते. पण वयाच्या ८० व्या वर्षीही पवार थांबायला तयार नव्हते तेव्हा पुतण्याने पक्ष पळवला. पवारांनी कोणावर कधी विश्वास दाखवला नाही. पुतण्यावरही दाखवला नाही. त्यातूनच अजित पवार यांनी भाजपाशी जवळीक साधली आणि सध्या राज्याचे अर्थमंत्री म्हणून मजेत आहेत. मात्र आपल्या मुलीचे म्हणजे सुप्रियाचे करीअर आपण सेट करून देऊ शकलो नाही, याचे दुःख बाप या नात्याने पवारांना कुरतडत असणार. बाप आहे म्हणून सुप्रिया बारामतीतून गेल्या चार निवडणुका निवडून येत आहेत. पण पुढे? कारण सुप्रियाचं नेतृत्व अनेकांना भावालाच मान्य नव्हते म्हणूनच राष्ट्रवादी फुटली. पवारांना ही चिंता छळत असणार. 'ऑपरेशन सिंदूर' मोहिमेत पंतप्रधान मोदींनी जगभर पाठविलेल्या प्रतिनिधिमंडळांमध्ये सुप्रिया सुळेही गेल्या होत्या. पवारसाहेब, जागे व्हा. पुतण्या हातातून गेला. आता उद्या मुलगीही विचार करू शकते. तिलाही तिचे करीअर आहे.

९८५०३०४१२३

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

## वाचक पत्रे

### संसदेत सादर विधेयक स्वागतार्ह

बुधवार, २० ऑगस्ट रोजी देशाचे गृहमंत्री अमित शाह यांनी एक विधेयक सादर केले. देशातील मंत्री, मुख्यमंत्री, पंतप्रधान यापैकी कोणालाही, कोणताही गुन्हा केल्याबाबत पोलिसांनी अटक केल्यास व त्या व्यक्तीला ३० दिवसांत जामीन न मिळाल्यास ती व्यक्ती संवैधानिक पदावरून आपोआप बरखास्त होईल. अर्थात त्या व्यक्तीचे संवैधानिक पद जाईल. हे विधेयक जनतेच्या मनातील आहे. अटक झाल्यास सगळेच राजकीय नेते नैतिकता म्हणून राजीनामा देत नाहीत. काही दिवसांपूर्वी दिल्लीचे तत्कालीन मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना मद्य परवाने वाटप घोटाळ्यात अटक झाली होती. तेव्हा त्यांनी राजीनामा देण्याची नैतिकता न दाखवता तुरुंगातून राज्य कारभार चालविण्याचा प्रयत्न केला. गुन्हा सिद्ध झाल्यानंतर एखादा नेता संवैधानिक पदावर कसा राहतो, असा प्रश्न जनतेला पडतोच. परंतु संसदेत उपरोक्त विधेयक सादर झाल्यानंतर विरोधी पक्षाच्या सन्माननीय खासदारांनी विधेयकाला विरोध करण्यासाठी नेहमीप्रमाणे गोंधळ घातला. विरोध करण्यापूर्वी काय चांगले आहे व काय चुकीचे आहे, याचा विचार न करता सरकारला व मोदींना केवळ विरोध करण्याचा एककलमी कार्यक्रम विरोधी पक्षांचा सुरू आहे. त्यामुळे विरोधी पक्ष जनतेच्या मनातील उरली सुरली सहानुभूतीसुद्धा गमावून बसणार आहे. चांगल्या गोष्टींचे समर्थन केले व वाईट, चुकीच्या गोष्टींना विरोध केला तरच विरोधी सत्ता प्राप्तीचे स्वप्न प्रत्यक्षात येऊ शकेल.

**श्रीराम ढोले**/अमरावती

●● ●●

### गोंधळलेला विरोधी पक्ष आणि बेजबाबदार वर्तन

सद्यस्थितीत विरोधी पक्ष जनतेचे प्रश्न मांडणे सोडून आपापल्या राजकीय भविष्याचा विचार करण्यात मग्न आहे, पण तरीही सत्तेची भ्रांत काही संपत नाही. गेल्या ११ वर्षांत विरोधी पक्ष हा विरोधी पक्ष होण्यासही पात्र नाही असे वाटते. काही लोकप्रतिनिधींकडून परंपरागत एका ठरावीक घराण्याचे गुलाम होण्यातच धन्यता मानली जात आहे. त्यांना जनतेच्या मतरूपी सदिच्छाही कायम ठेवता येत नाहीत आणि नसतील. काहींना लोकांनी घरी बसवले आहे आणि पुढेही तेच होईल अशी सगळी चिन्हे दिसत आहेत. अगदी गुन्हेगारांची बाजू मांडण्यासाठी दिवसरात्र मेहनत घ्यायला मागेपुढे पाहत नाहीत. वारंवार निरुपयोगी असणाऱ्याचे प्रक्षेपण-पुनर्प्रक्षेपण करूनही काही फायदा होताना दिसत नाही. मग आता व्यवस्थांवर दोषारोप करणे. लोकांच्या मनात त्यांच्याबद्दल अविश्वास, नकारात्मकता आणि संभ्रम निर्माण करणे. हे सगळे फक्त जनतेने ११ वर्षे सत्तेबाहेर हाकलून दिल्यामुळे जर त्यांना सामोरे जावे लागत असेल तर जेव्हा सत्तेत होते तेव्हा जनतेला तुमच्या विषयी किती चीड आणि राग असेल याचा अभ्यास करणे गरजेचे आहे. राजकीय यश अपयश मिळणे ही वेगळी गोष्ट आहे पण एकदा गेलेली विश्वसनीयता जनतेत परत मिळवणे फार कठीण असते आणि आहे. जे विरोधी विचारांचे आहेत त्यांचा विरोध असणे हे ठीक आहे, पण त्यामधील काही लोक सरसकट विरोधी पक्षाच्या मूर्खतापूर्ण वाटचालीला साथ देत असतील तर मग अवघड आहे. नरेंद्र मोदी पंतप्रधान झाल्यापासून जनतेत विश्वासार्हता अनुभवास मिळत आहे आणि त्यातून दुसऱ्या बाजूला मात्र निष्प्रभ अपात्र विरोधी पक्ष धुमाकूळ गोंधळ करण्यातच दंग आहे. असे सर्व चालू असेल तर मग जनता तुमच्यावर कसा विश्वास ठेवणार?

**गणेश शेवते**/९०९६१५२९४९

●● ●●

### तंत्रज्ञानाचा वापर साधन म्हणून...

आजच्या काळात तंत्रज्ञानाशिवाय जगणे अशक्य झाले आहे. आज कोणत्याही स्तरातील किंवा वयोगटातील व्यक्तीसाठी कुठे ना कुठे तंत्रज्ञानाचा वापर आवश्यक झाला आहे. अगदी शेतकऱ्यापासून ते व्यावसायिक, विद्यार्थी, कलाकार यांना आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करावा लागतो. आजच्या युगात तंत्रज्ञानाशिवाय जीवनाची कल्पनाच करता येत नाही. शिक्षण, व्यवसाय, संवाद, आरोग्य, मनोरंजन अशा प्रत्येक क्षेत्रात तंत्रज्ञानाने क्रांती घडवली आहे. मोबाईल, इंटरनेट, संगणक, कृत्रिम बुद्धिमत्ता अशा अनेक साधनांमुळे मानवी जीवन सोपे झाले आहे. आजकाल सर्व कामे ऑनलाईन होतात, यात आधुनिक तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणात वापर होतो. पण याच तंत्रज्ञानाचा अतिरेक झाल्यावर त्याचे नकारात्मक परिणामही दिसून येतात. विशेषतः युवक आणि विद्यार्थी वर्गावर तंत्रज्ञानाचे दुष्परिणाम अधिक गंभीर आहेत. तंत्रज्ञानाच्या प्रगतीसोबत एक मोठा प्रश्न उभा राहिला आहे. तो म्हणजे तंत्रज्ञानाचा योग्य वापर करायचा की त्याचे व्यसन अंगीकारायचे? साधन म्हणून तंत्रज्ञानाचा योग्य वापर केला तर तंत्रज्ञान हे एक अमूल्य साधन आहे. शिक्षणात ऑनलाईन कोर्सेस, ई-बुक्स, व्हिडीओ लेक्चर्स हे ज्ञानाची दारे खुली करतात. व्यवसायासात ई-कॉमर्स, डिजिटल मार्केटिंग, स्टार्टअप्स या सर्वांत तंत्रज्ञानामुळे युवकांना नव्या संधी मिळतात. आरोग्यविषयक ॲप्स, स्मार्ट डिव्हाइसेस वेळ व श्रम वाचतात. आजकाल तंत्रज्ञानाचा वापर व्यसनासारखा व्हायला लागला आहे. दुर्दैवाने अनेक युवक तंत्रज्ञानाला साधन न मानता व्यसन बनवतात. यावर उपाय म्हणजे, मनावर ताबा ठेवणे. तंत्रज्ञानाचा मर्यादित वापर करणे. मोबाईल आणि सोशल मीडियासाठी वेळेची मर्यादा ठरवता आली पाहिजे. तंत्रज्ञानाचा उद्देशपूर्ण वापर झाला पाहिजे. तंत्रज्ञानावर नियंत्रण ठेवले तर ते यशाच्या वाटेवर नेईल. त्याचे व्यसन अंगीकारले तर ते आयुष्याची वाट चुकवेल.

**सुमेघ वानर**/९१३००२१३८७

●● ●●

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# जिल्हा क्रीडा पुरस्कार सन २०२३-२४ साठी अर्ज सादर करण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२२ ऑगस्ट**

क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे अतंर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय तथा जिल्हा क्रीडा परिषद, बीड मार्फत जिल्हयातील गुणवंत क्रीडापटु गुणवंत क्रीडा मार्गदर्शक यांच्या कार्याचे, योगदानाचे मुल्यमापन होउन त्यांचा गौरव व्हावा व प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने शासनातर्फे २०२३-२४ करीता जिल्हा क्रीडा पुरस्कार नियम जिल्हयातील ०१ गुणवंत क्रीडा मार्गदर्शक व गुणवंत खेळाडू (०१ पुरूष ०१ महिला व ०१ दिव्यांग खेळाडू) असे एकुण ०४ पुरस्कारा साठी अर्ज मागविण्यात आहेत.

२०२२ नुसार सन २०२३-२४ च्या जिल्हा क्रीडा पुरस्कारासाठी दि. ०१ जुलै २०२३ ते ३० जून २०२४ या कालावधीसाठी खेळाडूची मागील पाच वर्षाची कामगिरी व क्रीडा मार्गदर्शकासाठी मागील दहा वर्षाची कामगिरी विचारात घेतली जाईल.अ) गुणवंत खेळाडू :-खेळाडूने पुरस्कार वर्षासह लगतपुर्व ०५ (पाच वर्षापैकी ०२ (दोन) वर्षे त्या जिल्हयाचे मान्यता प्राप्त खेळाच्या अधिकृत स्पर्धेमध्ये प्रतिनिधीत्व केले असावे.खेळाडूंची मान्यताप्राप्त खेळांच्या अधिकृत राज्य राष्ट्रीय अजिंक्यपद क्रीडा स्पर्धेमधील पुरस्कार वर्षाच्या लगतपूर्व ०५ ( पाच वर्षातील राज्य व राष्ट्रीयस्तरावरील वरिष्ठ, कनिष्ठ राष्ट्रीय स्पर्धा, शालेय व केंद्र शासनामार्फत आयोजित क्रीडा स्पर्धा मधील राष्ट्रीय स्तरावरील कामगिरी लक्षात घेण्यात येईल यापैकी उत्कृष्ट ठरणाऱ्या ०३ वर्षाच्या कामगिरीचा विचार गुणांकण कोष्ठकामध्ये करण्यात येईल. खेळाडूने स्पर्धांच्या मुळ प्रमाणपत्रांच्या साक्षांकीत प्रती सोबत सादर करणे आवश्यक आहे. खेळाडूंचा अर्ज अधिकृत जिल्हा संघटने मार्फत शिफारसीसह सादर करणे आवश्यक आहे.अपवादात्मक परिस्थीतीत खेळाडू वैयक्तीकरित्या अर्ज सादर करू शकतील. एशियन गेम्स्, कॉमनवेल्थ गेम्स्, जागतीक अजिंक्यपद क्रीडा स्पर्धा (वरिष्ठ गट). जागतीक चषक क्रीडा स्पर्धा (वरिष्ठ गट), आशियाई अजिंक्यपद स्पर्धा (वरिष्ठ गट). राष्ट्रकुल अजिंक्यपद स्पर्धा (वरिष्ठ गट), युथ ऑलिंपीक गेम्स्, युथ कॉमनवेल्थ गेम्स्, युथ जागतिक आजिंक्यपद । युथ जागतिक चषक स्पर्धा इत्यादी स्पर्धेत सहभागी खेळाडूस २०२३-२४ करीता जिल्हा क्रीडा पुरस्कार थेट देण्यात येईल.

गुणवंत क्रीडा मार्गदर्शक :- क्रीडा मार्गदर्शक म्हणून सतत दहा वर्ष महाराष्ट्र राज्यात क्रीडा मार्गदर्शनाचे कार्य केलेले असले पाहिजे व त्याने पुरस्कार वितरीत करण्यात येणाऱ्या सन २०२३-२४ वर्षात वयाची ३५ वर्षे पूर्ण केलेली असणे आवश्यक आहे. क्रीडा मार्गदर्शकासाठी गेल्या दहा वर्षात किमान वरीष्ठ गटातील राज्य व राष्ट्रीय पदक विजेते तसेच कनिष्ठ शालेय, ग्रामीण व महिला (खेलो इंडिया) मधील राज्य ते राष्ट्रीयस्तरापर्यंतचे पदकविजेते खेळाडू तयार केले असतील असे क्रीडा मार्गदर्शक अर्ज करण्यास पात्र राहतील.नांघिक अथवा वैयक्तीक मान्यता प्राप्त क्रीडा प्रकारात नॅशनल गेम्स, वरीष्ठ राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेत प्रतिनिधीत्व केलेल खेळाडू अथवा राज्य / जिल्हा अजिंक्यपद स्पर्धेत प्रथम तीन क्रमांकापर्यत यश मिळविणारे किमान तीन खेळाडू घडविणारा मार्गदर्शक पात्र असेल. विहित नमुण्यातील अर्ज मुदतीत सादर करणे आवश्यक राहील. विहीत नमूण्यातील अर्ज कार्यालयाच्या फलकावर लावण्यात आलेला आहे. बीड जिल्हयातील पात्र असलेल्या मार्गदर्शक व क्रीडा पटुंनी उपरोक्त पुरस्कारासाठी परिपुर्ण अर्ज दि. ३० ऑगस्ट २०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बीड येथे सादर करावेत. अधिक माहितीसाठी अनिकेत काळे, क्रीडा अधिकारी, मो. ९६०४९५९६७८ जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बीड येथे कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा क्रीड अधिकारी अरविंद विद्यागर यांनी केले आहे.

# 'आमचा देवाभाऊ' अभियानातून माजलगाव तालुक्यातील लाडक्या बहिणींच्या २८५५ राख्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.२२ ऑगस्ट**

माजलगाव तालुक्यात 'आमचा देवाभाऊ' विशेष अभियान उत्साहात राबविण्यात आले. ना.पंकजाताई मुंडे यांच्या नेतृत्वाखाली व जिल्हाध्यक्ष शंकरराव देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आलेल्या या अभियानात तालुक्यातील हजारो लाडक्या बहिणींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांना आपले प्रेम व आपुलकी व्यक्त केली. या कार्यक्रमाच्या प्रसंगी अनेक महिलांनी पत्राद्वारे देखील देवा भाऊचे लाडक्या बहिणीला असलेले सहकार्य याबद्दल देवा भाऊ विषयी कृतज्ञता व्यक्त केली. खरोखरच महाराष्ट्र राज्यासाठी व महाराष्ट्राच्या प्रगतीसाठी सुरक्षिततेसाठी सन्मानासाठी व आमच्या लाडक्या बहिणीसाठी विविध योजना देत आहेत, त्यामुळे आमचे देवा भाऊ आमच्या सर्व भगिनींसाठी एक आदर्श भाऊ आहेत अशी प्रतिक्रिया तुलसा कुलकर्णी, सारिका





बेद्रेसह विविध भगिर्नीनी पत्राद्वारे दिली.

या उपक्रमांतर्गत लाडक्या बहिणींनीकडून तब्बल २८५५ राख्या संकलित करण्यात आल्या. संकलित राख्या बीड येथील भाजपा कार्यालयात झालेल्या विशेष कार्यक्रमात जिल्हाध्यक्ष शंकरराव देशमुख यांच्या मार्फत मा.मंत्री बबनराव लोणीकर यांच्याकडे सुपूर्त करण्यात आल्या. या कार्यक्रमाच्या प्रसंगी भाजपा युवा नेते अक्षय मुंदडासह जिल्ह्यातून आलेल्या मंडळ अध्यक्ष व पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती.या अभियानासाठी कीट्टी आडगाव मंडळ माजलगाव तालुका अध्यक्षा सौ.रूपाली कचरे, माजलगाव शहर मंडळ अध्यक्ष विनायक रत्नपारखी, पात्रुड मंडळ अध्यक्ष डॉ.अभिजीत सोळंके यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी सक्रिय परिश्रम घेतले. राख्या संकलन मोहिमेत श्वेता ठोसर, अनिता लोखंडे, अमृताताई, गौरीताई देशमुख, पूजा मुंडकर या बहिणींसह गणेश सातपुते, सिद्धेश्वर राठोड,कल्याण शेप, सुधाकर रासवे, मनोज कोरडे, सचिन तौर, संजय पवार, दीपक गरड, मल्हारी ढगे आदींनी विशेष योगदान दिले. हा कार्यक्रम एक वेगळा,स्तुत्य स्नेहसोहळा ठरला. या माध्यमातून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावरील बहिणींचे अपार प्रेम आणि महाराष्ट्रातील जनतेचा विश्वास पुन्हा अधोरेखित झाला.

# ज्येष्ठ पत्रकार सर्वोत्तम गावरस्कर यांचा नागरी सत्कार



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२२ ऑगस्ट**

बीड जिल्ह्याचे सुपुत्र ज्येष्ठ संपादक सर्वोत्तम गावरस्कर अण्णा यांना मराठी पत्रकार परिषदेचा नागोजीराव दुधगावकर स्मृती राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. याबद्दल त्यांचा भव्य नागरी सत्कार रविवार दिनांक २४ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता जालना रोडवरील हॉटेल अन्वीता येथे पद्मश्री डॉ. तात्यासाहेब लहाने यांच्या हस्ते करण्यात येणार आहे.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम. देशमुख हे राहणार असून प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री जयदत्त अण्णा क्षीरसागर यांच्यासह सर्व सन्माननीय संपादक उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन मराठी पत्रकार परिषदेचे माजी विभागीय सचिव दिलीप खिस्ती, विभागीय सचिव रवी उबाळे, विभागीय समन्वयक सुभाष चौरे ,राज्य कार्यकारणी सदस्य विलास डोळसे जिल्हा अध्यक्ष विशाल साळुंके, जिल्हा कार्याध्यक्ष गजानन मुडेगावकर, जिल्हा सरचिटणीस सुभाष सुतार, जिल्हा कोषाध्यक्ष धनंजय आरबुणे ,जिल्हा प्रसिद्धीप्रमुख संजय हंगे, हल्ला विरोधी कृती समितीचे जिल्हा निमंत्रक दत्ता आंबेकर ,जिल्हा समन्वयक अभिमान्यु घरत, जिल्हा उपाध्यक्ष चंद्रकांत राजहंस, सचिन पवार,अविनाश कदम, जुनेद बागवान, दिलीप झगडे, संजय रानभरे, गौतम बचुटे ,कादर मकरानी , तालुका अध्यक्ष दत्ता आजबे, मधुकर तौर, जालिंदर नन्नवरे ,अजय जोशी, हरीश यादव, विजय आरकडे, सतीश सोनवणे, प्रशांत लाटकर आदींनी केले आहे.

# इरा इंटरनॅशनल इंग्लीश स्कुलचे एम.टी.एस. परिक्षेत घवघवीत यश



**तभा वृत्तसेवा**
**केज दि.२२ ऑगस्ट**

केज तालुक्यातील युसुफ वडगाव येथील इरा इंटरनॅशनल इंग्लीश स्कूल च्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. राज्यस्तरीय एम.टी.एस. च्या परिक्षेत बसलेले विद्यार्थी १०० टक्के उत्तीर्ण झाले आहेत.

याविषयी सविस्तर वृत्त असे की तालुक्यातील युसुफ वडगाव सारख्या ग्रामीण भागात उच्च दर्जाचे शिक्षण देणारी संस्था म्हणून नावारूपाला आलेल्या इरा इंटरनॅशनल इंग्लीश स्कूल च्या विद्यार्थ्यांनी एम.टी.एस. च्या परीक्षेत विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले, तालुक्यांतील सर्वात जास्त मेडल प्राप्त करणारी शाळा हि इरा इंटरनॅशनल इंग्लीश स्कूल युसुफ राम वडगांव ही ठरली आहे,शाळेतील एम.टी.एस परीक्षेस बसलेल सर्व विद्यार्थी १००% उत्तीर्ण झाले. यामध्ये ०२ विदयार्थी विशेष प्रावीण्य सह ट्रॉफी साठी पात्र ठरले तर गोल्ड मेडल साठी एकुण २१, सिल्व्हर मेडल १९, तर इतर १५ विदयार्थी पास झाले आहेत,

अशा प्रकारे शैक्षणीक वर्ष २०२४-२५ मध्ये स्पर्धा परीक्षे मध्ये शाळेने घवघवीत यश संपादन केले, तसेच शिष्यवृत्ती परीक्षेतही मागील वर्षी प्रमाणे याही वर्षी यश मिळणे अपेक्षित आहे,त्याबद्दल पालक समाधान व्यक्त करत असून शाळेचे सर्व स्तरातून कौतुक केले जात आहे, की ग्रामीण भागात उच्च प्रतीचे शिक्षण देऊन विद्यार्थ्यां मध्ये स्पर्धा परिक्षे बाबत आवड निर्माण करण्याचे काम शाळा करत आहे,

ग्रामीण भागात सुद्धा शाळा चांगली आसेल तर विदयार्थी घडतो, याचे उत्तम उदाहरण म्हणजे इरा इंटरनॅशनल इंग्लीश स्कूल युसुफ राम वडगांव गुणवत्ता पूर्ण, परिपूर्ण शिक्षण देण्यासाठी नावाजलेली शाळा असून आजच्या स्पर्धेच्या युगात आपला विदयार्थी टिकला तर पाहिजे, पण त्याने यश हि संपादन केले पाहिजे यासाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मेहनत घेत असतात.या सर्व विद्यार्थ्यांना आज ट्रॉफी, मेडल, प्रमाणपत्र व पुष्प गुच्छ देऊन संस्थेच्या वतीने गौरविण्यात आले, यावेळी धनराज चोपणे, व संस्थापक प्रा. बापुसाहेब भुसारी सर व सर्व शिक्षक वृंद उपस्थित होते

# भव्य अमृत मेळाव्याचा तरुणांनी लाभ घेण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२२ ऑगस्ट**

माजलगाव येथे दि. २३ ऑगस्ट रोजी भव्य 'अमृत मेळावा'शिक्षण, कौशल्य आणि व्यवसाय संधींचा अद्वितीय संगम माजलगाव (जि. बीड) -महाराष्ट्र संशोधन उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) संस्थेच्या वतीने शनिवार, २३ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी १० वाजता वैष्णवी मंगल कार्यालय, गजानन मंदिर रोड, माजलगाव येथे भव्य 'अमृत मेळावा व परिसंवाद सत्राचे' आयोजन करण्यात आले आहे.

या मेळाव्यात ब्राह्मण, मारवाडी, आर्य वैश्य (कोमटी), गुजराती, राजपूत, माहेश्वरी, राजपुरोहित, सिंधी, बनिया, बंगाली, पाटीदार आदी खुल्या प्रवर्गातील समाजासाठी अमृत संस्थेच्या विविध शैक्षणिक, कौशल्य विकास आणि उद्योग उभारणीसाठीच्या योजनांची माहिती व मार्गदर्शन दिले जाणार आहे.मेळाव्यात UPSC/ MPSC पूर्व परीक्षा उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी प्रोत्साहन अर्थसहाय्य, IIT, IIM², -IIMS, IIIT सारख्या उच्च शिक्षण संस्थांसाठी सहाय्य, IGTR, CIPET, NIELIT, C-D-C यांसारख्या जागतिक दर्जाच्या संस्थांचे कौशल्य विकास कोर्सेस पूर्णपणे विनामूल्य, व्यक्तिमत्त्व विकासासाठी चघउङ चा अमृत कलश कोर्स व किशोर विकास उपक्रम, तसेच तरुणांसाठी बेकरी, सुर्यमित्र,इम्पोर्ट-एक्सपोर्ट यांसारखी उद्योजकता प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येणार आहेत. याशिवाय व्यवसाय कर्जावर व्याज परतावा या योजनांचा लाभही मिळणार आहे. विशेष म्हणजे, महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र (MCED) मार्फत अमृतच्या लाभार्थ्यांना मोफत स्वयंरोजगार प्रशिक्षण उपलब्ध होणार असून त्यासाठी नोंदणी व मार्गदर्शन या मेळाव्यात केले जाईल. याशिवाय लहानात लहान स्वदेशी उत्पादन व सेवा जगभर पोहोचविण्यासाठी अमृत पेठ या महत्वाकांक्षी उपक्रमाची माहिती व नोंदणीही या मेळाव्यात होणार आहे.या कार्यक्रमास अमृत संस्थेचे विशेष कार्यकारी अधिकारी प्रवीण पांडे, माजलगावचे तहसीलदार संतोष रुईकर व राज्य समन्वयक दीपक जोशी उपस्थित राहणार आहेत. हा मेळावा शिक्षणापासून व्यवसायापर्यंत आत्मनिर्भरतेकडे नेणारे एक भक्कम पाऊल ठरणार असून खुल्या प्रवर्गातील तरुणांसाठी ही सुवर्णसंधी आहे. समाजातील सर्व नागरिक व तरुणांनी या मेळाव्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन अमृतचे जिल्हा व्यवस्थापक विशाल अशोकराव जोशी यांनी केले आहे.

# पोळा सण: बैलांच्या ऋणानुबंधांचा कृतज्ञतेचा महोत्सव

चंद्रकांत सरस्वती प्रकाश शेळके,
तहसीलदार , बीड



**भारतीय संस्कृतीत सण हे केवळ आनंदाचे निमित्त नसतात, तर ते आपल्या जीवनशैलीशी, निसर्गाशी आणि संस्कृतीशी असलेल्या नात्यांची जाणीव करून देतात. अशा अनेक सणांपैकी पोळा हा एक असा सण आहे, जो आपल्या कृषीसंस्कृतीतील बैल या अत्यंत महत्त्वाच्या जीवावर केंद्रित आहे. पोळा म्हणजेच बैलपोळा-श्रावण महिन्यातील पिठोरी अमावास्येला साजरा होणारा सण-हा शेतकरी आणि बैल यांच्यातील ऋणानुबंधाचे प्रतिक आहे. वर्षभर न थकता शेतकऱ्याच्या शेतीसाठी राबणाऱ्या बैलांना कृतज्ञतेने नमविण्याचा आणि त्यांचा सन्मान करण्याचा हा दिवस असतो.**

भारतात पोळा महाराष्ट्र, मध्य प्रदेश, छत्तीसगड, कर्नाटक या राज्यांत साजरा केला जातो. महाराष्ट्रात विशेषतः विदर्भ, मराठवाडा आणि खान्देश भागात या सणाला मोठं महत्त्व आहे. या दिवशी बैलांना आंघोळ घालून, त्यांच्या अंगाला हळद, तेल लावून, रंगीत रंगांनी सजवले जाते. गळ्यात माळा, घंटा, कवड्या, आणि पायात चांदीचे तोडे घातले जातात. शिंगांना रंग लावून ते उठून दिसतील अशी सजावट केली जाते. बैलांना जेवायला गोडधोड अन्न दिलं जात. संध्याकाळी गावातून बैलांची मिरवणूक काढली जाते. शेतकरी पारंपरिक वेशात, ढोल-ताशा, बॅन्ड, लेझीम यांच्या गजरात आपल्या बैलांसह सामील होतात. या मिरवणुकीत बैलांच्या सौंदर्यस्पर्धाही घेतल्या जातात.

पोळ्याच्या आदल्या दिवसापासूनच तयारी सुरू होते. शेतकरी बैलांची साधने जसे की जू, सोंटा, नांगर झाडून-पुसून रंगवतात. महिलावर्ग घरातील सजावट करतो. विशेष पारंपरिक जेवण बनवलं जात, ज्यात पुरणपोळी, कांदाभजी, खिचडी, शेवया इत्यादी पदार्थ असतात. मुलांसाठी हा दिवस खास असतो- कारण अनेक घरांत लहान मुलांना लाकडी बैलाचे खेळणे दिले जाते. 'तन्हा पोळा ' म्हणून दुसऱ्या दिवशी मुले हे खेळणे सजवून गावभर घेऊन फिरतात. पोळा सणाचे पुराणकाळापासून महत्त्व आहे. श्रीकृष्णाच्या गवळणारी जीवनशैलीत गोधनाचे महत्त्व अधोरेखित झाले आहे. बैल हे केवळ शेतीचे सहकारी नव्हे, तर ते जीवनशैलीचे अविभाज्य घटक होते. त्यामुळे पोळा हा फक्त सण नसून, एक प्रकारचा बैलांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा सांस्कृतिक दिन आहे. पूर्वीच्या काळी यंत्रांचा अभाव होता, तेव्हा शेतीतील सर्व कामं बैलांवर अवलंबून होती . नांगरणीपासून वाहतुकीपर्यंत प्रत्येक टप्प्यावर बैलांचे योगदान अमूल्य होते. आजही काही भागांत ते तितक्याच श्रद्धेने वापरले जातात.

सणाच्या दिवशी बैलांची पूजा केली जाते आणि विशेष मंत्र म्हणत बैलाला ओवाळले जाते. 'बैल माझा चांगला, मळ्यात नांगरतो; पोळ्याला येता, माझं मन हरखतो!' अशा ओव्या गात गात बायका त्यांच्या कृतज्ञतेचे शब्द व्यक्त करतात. बैलांच्या गळ्यात लावलेल्या घंटा, पायातील तोडे, आणि मिरवणुकीतील ढोल-ताशांचे आवाज संपूर्ण गावात सणाचा आनंद निर्माण करतात. लोक एकमेकांच्या घरी जातात, एकत्र जेवतात, आणि बैलांच्या गोष्टी सांगतात. पोळा सण गावकरी, शेतकरी, महिला, आणि लहानग्यांना एकत्र आणणारा सण आहे.

आधी बैलांना स्नान घालणे, नैसर्गिक रंगांनी सजवणे, त्यांना विश्रांती व चांगले जेवण देणे यावर भर होता. पण आता काही ठिकाणी डीजे, लाऊडस्पीकर, नाच-गाणी, रासायनिक रंग, प्लास्टिक सजावट यामुळे सणाचा मूळ हेतू हरवतो आहे. तसेच शेतीत ट्रॅक्टर , यंत्रसामग्री वाढल्यामुळे बैलांचे महत्त्व कमी झाले आहे . त्यासाठी आपण प्रयत्न व उपाययोजना करायला हव्या जसे की बैलपोळा सण पारंपरिक व पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा करावा. बैलांच्या सजावटीसाठी नैसर्गिक रंग व साहित्य वापरावे.

मुलांना व तरुण पिढीला सणाचे खरे महत्त्व समजावून सांगावे. गावात सांस्कृतिक कार्यक्रम, पोवाडे, शेतकऱ्यांच्या कथा सांगून परंपरा जपावी. बैलपोळा सणाचा ऱ्हास थांबवण्यासाठी परंपरा, पर्यावरण आणि संस्कृती यांचा सन्मान राखून सण साजरा करणे गरजेचे आहे.

आजच्या यांत्रिकीकरणाच्या युगात पोळ्याचे महत्त्व काहीसे बदलले असले तरीही या सणाचे संस्कृतीशील मूल्य टिकवले गेले आहे. शहरी भागातही शाळांमधून लाकडी बैल, चित्रकला स्पर्धा, ओवी गायन, प्रात्यक्षिके , आणि पर्यावरणपूरक बैल बनवण्याचे उपक्रम राबवले जातात. सोशल मिडियावरून माहिती दिली जाते . काही ठिकाणी 'इको-फ्रेंडली पोळा' साजरा केला जातो. या सणाद्वारे आपण निसर्ग , प्राणी , आणि शेती या तीनही घटकांना एकत्र बांधून ठेवणारा धागा जपतो . पोळा सण म्हणजे शेतकऱ्याचे आपल्या कामाच्या जोडीदाराबद्दलची कृतज्ञता, प्रेम, आणि आपुलकी व्यक्त करण्याचा दिवस. तो केवळ बैलांचा सण नाही, तर आपल्या संस्कृतीचा अभिमान आहे. म्हणूनच हा सण साजरा करताना प्रत्येकाने बैलांप्रती प्रेम, जपणूक आणि सन्मान जपावा. आजच्या पिढीनेही या सणाचे महत्त्व समजून घेतले पाहिजे, कारण ही आपली माती , आपली संस्कृती आणि आपली ओळख आहे.

## आपल्या बैलपोळा सणाची संस्कृती जतन करण्यासाठी काही गोष्टी करणे आवश्यक आहे

१. पारंपरिक पद्धती जपणे : बैलांना रंग , फुले , गोंडे लावताना नैसर्गिक व सुरक्षित वस्तूंचा वापर करावा. बैलांना सजवताना त्रास होणार नाही याची काळजी घ्यावी.

२. पिढ्यान् पिढ्या संस्कार देणे : लहान मुलांना बैलाचे महत्व , शेतकऱ्याचे श्रम व बैलपोळ्याची परंपरा याबद्दल सांगावे. शाळा, महाविद्यालयांमध्ये बैलपोळा विषयावर निबंध, नाटिका, चित्रकला स्पर्धा घेता येतात.

३. समाजातील सहभाग वाढवणे : गावागावांत बैलांची मिरवणूक , पारंपरिक खेळ व पोवाडे आयोजित करावेत . गावातील सर्वजण मिळून सण साजरा केल्यास एकतेची भावना वाढते .

४. आधुनिकतेसोबत जोडणे : मोबाईल , सोशल मीडियावरून बैलपोळ्याचे महत्व लोकांपर्यंत पोहोचवावे. गावाची परंपरा दाखवणारे व्हिडिओ, माहितीपट तयार करून जतन करावेत.

बैलपोळा संस्कृती जतन करण्यासाठी परंपरा, शिक्षण, समाजसहभाग, आधुनिक माध्यमे आणि पर्यावरणपूरक दृष्टिकोन यांचा योग्य संगम करणे गरजेचे आहे.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# शेतकऱ्यांना सरसकट नुकसान भरपाई तातडीने द्यावी- आंबादास दानवे

## अतिवृष्टीमुळे झालेल्या पिकांच्या नुकसानीची केली पाहणी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २२ ऑगस्ट**

उबाठा शिवसेनचे नेते आंबादास दानवे यांनी शुक्रवारी कळमनुरी तालुक्यातील गंगापूर येथील अतिवृष्टीमुळे झालेल्या पिकांच्या नुकसानीची पाहणी केली. यानंतर पत्रकारांशी संवाद साधतांना ते म्हणाले की, शेतकऱ्यांच्या हळद, सोयाबीन, केळी आदीं पिकांचे आतोनात नुकसान झाले असून शेतकरी प्रचंड अडचणीत आहेत. शासनाने तातडीने पंचनामे करून नुकसान भरपाई द्यावी.

कळमनुरी तालुक्यात अतिवृष्टीमुळे पिकांचे प्रचंड नुकसान झाले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी काही ठिकाणी त्यांचा आवडता आणि आनंदाचा सण बैलपोळा देखील साजरा केला नाही. या पार्श्वभूमीवर विधान परिषदेचे विरोधी पक्ष-नेते आंबादास दानवे यांनी दि २२ ऑगस्ट रोजी कळमनुरी तालुक्यातील अतिवृष्टीमुळे झालेल्या पिकांची पाहणी केली. यावेळी जिल्हा प्रमुख गोपू पाटील, संदेश देशमुख, शेतकरी नेते वसीम देशमुख, उपजिल्हा प्रमुख परमेश्वर मांडगे, गणेश शिंदे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते यांची उपस्थिती होती.

अतिवृष्टीमुळे झालेल्या पिकांच्या नुकसानीची पाहणी केल्यानंतर पत्रकारांशी संवाद साधतांना आंबादास दानवे म्हणाले की, पीक विम्याचे तीन निकष शासनाने रद्द केल्याने विमा अंतर्गत या नुकसानीची भरपाई मिळणार नाही. बैलपोळा हा सण शेतकऱ्यांचा उत्सवाचा आणि आनंदाचा क्षण असतो. मात्र शेतकऱ्यांचे पीक वाया गेल्याने शेतकऱ्यांच्या आनंदावर विर्जन पडले आहे. शासनाने शेतकऱ्यांना नुकसान भरपाई घोषीत करून शेतकऱ्यांचा बैलपोळा सणाचा आनंद गोड करावा. शासनाने नुकसान झालेल्या भागाचा अभ्यास करावा, शेतकऱ्यांचे पीक शिल्लक राहीले नाही. अस्मानी संकटामुळे शेतकरी संकटात आला आहे. या नुकसानीमुळे शेतकऱ्याला वर्षभराचे गणित पार बिघडले असून मुलांचे शिक्षण, विवाह, उदरनिर्वाह आणि बँकांचे कर्ज कसे फेडायचे असा प्रश्न शेतकरी विचारत आहेत. शेतकरी हवालदिल झाला असल्याचे पहायला मिळत आहे. शेतकऱ्यांची सरसकट कर्जमाफी झाली पाहीजे तसेच अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करून आर्थिक मदत मिळाली पाहीजे, राज्य शासनाने शेतकऱ्यांना आधार देणे अत्यंत गरजेचे आहे, असे मतही त्यांनी यावेळी व्यक्त केले. यावेळी गंगापूर येथे पुरात अडकलेल्या ८ लोकांची आंबादास दानवे यांनी भेट घेतली.

हिंगोली येथील प्राचीन जलेश्वर तलावाच्या विकास कामाचीही आंबादास दानवे यांनी पाहणी केली. यावेळी तहसीलदार श्रीकांत भुजबळ, उपमुख्याधिकारी श्याम माळवटकर, गटविकास अधिकारी विष्णू भोजे, माजी आमदार डॉ. संतोष टारफे, जिल्हा संपर्कप्रमुख बबन थोरात, शिवसेना जिल्हाप्रमुख गोपू पाटील, विनायक भिसे, परमेश्वर मांडगे, गणेश शिंदे आदी उपस्थित होते.

# मराठा आरक्षण रथयात्रेचे हिंगोली, औंढा नागनाथ येथे स्वागत

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २२ ऑगस्ट**



मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी मराठा समन्वयक रामभाऊ गायकवाड यांनी पंढरपुरपासून रथयात्रेची सुरुवात केली आहे. या रथयात्रेचे गुरुवारी हिंगोली आणि औंढा नागनाथ शहरात आगमन झाल्यानंतर सकल मराठा समाजाच्या त्यांचे भव्य स्वागत करण्यात आले.

सकल मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी महाराष्ट्र सरकारला सद्बुद्धी देण्यासाठी २०१८ मध्ये आषाढी वारीमध्ये मराठा आरक्षणासाठी मुख्यमंत्र्यांना आडवणारे मराठा सेवक रामभाऊ गायकवाड यांनी पुन्हा एकदा मराठा आरक्षणासाठी मैदानात उतरले असुन त्यांनी मराठा आरक्षण जनजागृतीसाठी पंढरपुर येथील विठ्ठल-रुक्मिणीच्या चरणी साकडे घालुन रथयात्रेची सुरुवात केली आहे. हि रथ यात्रा बुधवार दि.२० ऑगस्ट रोजी पासुन पंढरपुर ते मोहोळ, सोलापुर श्री क्षेत्र तुळजापुर, औसा, लातुर, आंबाजोगाई मार्ग गुरुवार दि.२१ ऑगस्ट रोजी परळी वैजनाथ येथुन वैजनाथाचे दर्शन घेऊन औंढा नागनाथ येथील नागनाथ दर्शन घेऊन श्री नागनाथला सरकारला मराठा आरक्षण देण्यासाठी सद्बुद्धी देण्यासाठी साकडे घातले. त्यानंतर हि रथयात्रा गुरूवार दि. २१ ऑगस्ट रोजी हिंगोली शहरातील छत्रपती शिवाजी महाराज पुर्णाकृती पुतळा परिसरात आल्यानंतर सकल मराठा समाजाच्या त्यांचे भव्य स्वागत करण्यात आले. हि रथयात्रा पंढरपुर विठ्ठल-रुक्मिणी चरणी साकडे घालुन करण्यात येईल. त्यानंतर कुलस्वामीनी आई तुळजाभवानी मातेची अभिषेक पुजा दर्शन करुन तसेच परळी वैजनाथ, घृणेश्वर ज्योतिर्लिंग, औंढा नागनाथ, त्र्यंबकेश्वर, छत्रपती शिवाजी महाराज-रायगड, राष्ट्रमाता जिजाऊ माँसाहेब-पाचाड, या तिर्थक्षेत्र ठिकाणी अभिषेक करण्यात येणार आहे. या रथयात्रेची सुरुवात दि.२० ऑगस्ट रोजी पंढरपुर येथुन होवुन आठ दिवसाचा प्रवास करुन गुरुवार दि.२८ ऑगस्ट रोजी पंढरपुर येथे सभा घेऊन यात्रेचा समारोप होणार आहे. त्यानंतर दि.२९ ऑगस्ट रोजी मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या समवेत मुंबई आझाद मैदानावर उपस्थित राहुन लढयात सहभागी होणार आहे असे राज्य समन्वयक रामभाऊ गायकवाड यांनी सांगितले. या रथयात्रेत शेकडो मराठा बांधव सहभागी असून हिंगोली येथे त्यांच्या स्वागताला शिवाजीराव ढोकर पाटील, कृष्णा पवार पाटील, ज्ञानेश्वर जाधव, राम जाधव, संजय जाधव, श्रीराम जाधव, शिवाजी जाधव, पांडुरंग जगताप यांच्यासह सकल मराठा समाजाचे बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मंडल आयोगाची अंमलबजावणी शरद पवार यांनी केली- राजापूरकर

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २२ ऑगस्ट**



राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) पक्षाच्या वतीने ९ ऑगस्ट २०२५ रोजी नागपूर येथून मंडल यात्रा काढण्यात आली. दि. २२ ऑगस्ट २०२५ रोजी हिंगोली जिल्ह्यात वसमत शहरात मंडल यात्रा आली असता ओबीसी बांधवांनी त्याचे जल्लोषात स्वागत केले. त्यानंतर शासकीय विश्रामगृह वसमत येथे ओबीसी बांधवांची बैठक संपन्न झाली. मंडल आयोगाची आमल बजावनी शरद पवार मुख्यमंत्री आसता भारतात सर्व प्रथम महाराष्ट्रात लागु केली मंडल यात्रेचे संयोजक ओबीसी सेलचे महाराष्ट्र अध्यक्ष राज राजापूरकर म्हणाले की, महाराष्ट्रातील ओबीसींना शरदचंद्र पवार यांनी मंडल आयोगाची २३ मार्च १९९४ रोजी अंमलबजावणी करून शिक्षण नोकरी आणि राजकारणामध्ये २७% आरक्षण दिल्यामुळे राज्यातील ओबीसींचा सामाजिक राजकीय शैक्षणिक सांस्कृतिक विकास झाला आहे.

याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) पक्षाचे जिल्हाध्यक्ष दिलीप चव्हाण, युवानेते अतीश दांडेगावकर ॲड. रवि शिंदे, विजय कदम, आयुब पॉपूलर, विजय कडतन, डॉ नागोराव जांबुतकर, सुभाष लालपोतु, करमोदिन्न शेख, नानेश्वर आंभोरे, काळुराम कुरवडे, प्रभाकर गोरे गजानन गव्हाणे, स्वप्नील मुळे यांनी मार्गदर्शन केले.

यावेळी गणेश कमलु, बंडू मुटकुळे, रमेश दौलत, सानप, प्रा.गुलाब भोयर, रामचंद्र बागल, प्रकाश इंगळे, दिवाकर पुंडगे भोयर, गवारे मामा, पांडुरंग काकडे, सुदर्शन वायकुळे, संजय पाईकराव यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे पदाधिकारी कार्यकर्ते आणि ओबीसी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**हिंगोली- कळमनुरी तालुक्यातील मसोड येथील मंडळ अधिकारी मिनाक्षी खंदारे यांच्या आरओआर प्रकरणाच्या सुनावणी दरम्यान पक्षकाराने अर्धनग्न होवून अश्लील वर्तन केल्याचा निषेध ग्राम महसूल अधिकारी संघाच्यावतीने करण्यात आला. यावेळी प्रशासनाला निवेदन सादर करण्यात आले. छाया- विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### १३ सप्टेंबरला राष्ट्रीय लोक अदालत

हिंगोली- येथील जिल्हा व सत्र न्यायालयात तालुका विधी सेवा समिती व वकील संघाच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १३ सप्टेंबर रोजी सकाळी १०.३० वाजता जिल्हा न्यायालयाच्या प्रांगणात राष्ट्रीय लोकन्यायालयाचे आयोजन करण्यात आले आहे. या राष्ट्रीय लोकन्यायालयामध्ये बँक, ग्रामपंचायत, नगर परिषद यांचे वाद दाखलपूर्व प्रकरणे हे तडजोडीच्या आधारे निकाली काढण्यात येणार आहे. या राष्ट्रीय लोकन्यायालयामध्ये सर्व विधिज्ञांनी जास्तीत जास्त प्रकरणे ठेवून तडजोड करुन निकाली काढावीत, असे आवाहन तालुका विधी सेवा समितीचे अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा न्यायाधीश टी. एस. अकाली, वकील संघाचे अध्यक्ष ड. एस. आर. भुक्तार यांनी केले आहे.

### आंतरराष्ट्रीय युवा दिनानिमित्त रॅली



हिंगोली- जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण विभाग जिल्हा रुग्णालय हिंगोली यांच्यामार्फत आंतरराष्ट्रीय युवा दिनानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, त्याच अनुषंगाने आज कै. बाबुराव पाटील महाविद्यालय हिंगोली येथून मोटारसायकल रॅली काढण्यात आली. या रॅलीला प्राचार्य डॉ. जयवंत भोयर यांनी हिरवी झेंडी दाखवून सुरुवात केली. ही रॅली शहरातील प्रमुख मार्गावरून निघून सामान्य रुग्णालयात समारोप करण्यात आला. या रॅलीमध्ये हिंगोली शहरातील महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक, राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक व विद्यार्थी मोठ्या प्रमाणात सहभागी होते. यावेळी जिल्हा सामान्य रुग्णालयाचे जिल्हा कार्यक्रम अधिकारी डी. एस. चौधरी यांनी प्रास्ताविक करून उपस्थितांना युवा दिनानिमित्त शपथ दिली. यावेळी प्रशासकीय अधिकारी डॉ. विशाल पवार, डॉ. डूडूले, गणेश साळुंके व इतर अधिकारी, महाविद्यालयाचे प्रा. डॉ. बलखंडे, प्रा. संभाजी पाटील , प्रा.डॉ. सोनकांबळे, प्रा. भागवत सावके, प्रा. माणिक डोखळे, प्रा.नागनाथ फड, प्रा.कृष्णा इंगळे व इतर प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी संजय पवार, टिना कुंदनानी, आशिष पाटील, बालाजी चाफाकानडे, अब्दुल मुजीब, महानंदा साबळे, स्वाती चोपडे, सुनीता गायकवाड, विनीत उबाळे, बालाजी कदम, रेखा बलखंडे, नम्रता भगत व इतर आरोग्य विभागातील कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

### १५ वाहन चालकांविरूध्द कारवाई

हिंगोली-अवैध वाहतुक करणारे तसेच वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या १५ वाहन चालकांविरूध्द कार्यवाही करत ११ हजार ५०० रूपयांचा दंड वसूल करण्यात आला.

# जिल्हाधिकाऱ्यांची हट्टा येथील प्रकल्पाला भेट

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली २२ ऑगस्ट**

मा. बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्पांतर्गत जिल्ह्यात मंजुरी मिळालेल्या विविध समुदाय आधारित संस्थांच्या प्रगतीचा आढावा घेण्यासाठी जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी आज वसमत तालुक्यातील हट्टा येथील हट्टावाला फार्मर प्रोड्युसर कंपनी लि.ला प्रक्षेत्र भेट दिली.

यावेळी जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी तथा प्रकल्प संचालक (आत्मा) राजेंद्र कदम, जिल्हा अंमलबजावणी कक्षाचे स्मार्ट नोडल अधिकारी गोविंद बंटेवाड, पुरवठा व मूल्यसाखळी तज्ञ तथा कृषि व्यवसाय सल्लागार जी. एच. कच्छवे, तसेच कंपनीचे संचालक फहिमोद्दीन सिद्दिकी आदी मान्यवर उपस्थित होते.

जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी कंपनीच्या गोदाम बांधकाम व मशिनरी शेड बांधकामाची पाहणी केली. ही कामे मानकानुसार व नियोजित कालावधीत पूर्ण होण्यासाठी आवश्यक सूचना त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या. त्यानंतर त्यांनी मंजूर उपप्रकल्पांतर्गत स्थापन होणाऱ्या अत्याधुनिक यंत्रणांची माहिती घेतली. यात दाल मिल (२ टीपीएच) रंगीत सॉर्टरसह स्वयंचलित आणि बेसन मिल पीन मिल १ टीपीएच यंत्रणांचा समावेश असून, या यंत्रणा कार्यान्वित झाल्यानंतर शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनावर मूल्यवृद्धी करण्याची मोठी संधी उपलब्ध होणार असल्याचे सांगितले.

या यंत्रणांची कार्यप्रणाली, क्षमता, तसेच शेतकरी उत्पादक कंपनीमार्फत स्थानिक शेतकऱ्यांना मिळणारे लाभ याबाबत संचालक मंडळाशी जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी चर्चा केली. त्यांनी प्रकल्प शक्य तितक्या लवकर कार्यान्वित व्हावा यावर भर देत कंपनी संचालकांना यंत्रणा स्थापनेसाठी आणि व्यापारी व्यवहारिकदृष्ट्या आवश्यक बाबींच्या गतीमान अंमलबजावणीसाठी मार्गदर्शन केले. या भेटीदरम्यान त्यांनी संस्थेकडून उभारण्यात येत असलेल्या मूलभूत सुविधा व आधुनिक प्रक्रिया यंत्रणेची सविस्तर पाहणी करून शेतकरी हिताच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले.

या प्रक्षेत्र भेटीदरम्यान कंपनीसमोरील वीजपुरवठा समस्येचीही जिल्हाधिकाऱ्यांनी दखल घेतली. त्यांनी महावितरण यंत्रणेचे अभियंता श्री. चाकूरकर यांच्याशी भ्रमणध्वनीवरून संवाद साधून, कंपनीसाठी आवश्यक असलेला एक्सप्रेस फिडर त्वरीत उपलब्ध करून देण्याच्या स्पष्ट सूचना दिल्या. यामुळे प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक असलेली ऊर्जा उपलब्ध होणार असून, उत्पादन प्रक्रियेतील अडचणी दूर होण्यास मदत होईल.

भेटीनंतर जिल्हाधिकाऱ्यांनी उपस्थित संचालकांशी संवाद साधत शेतकऱ्यांना उत्पादक संस्थांद्वारे थेट बाजारपेठेशी जोडून, त्यांचा आर्थिक स्तर उंचावण्याचे उद्दिष्ट साध्य करण्याबाबत भर दिला. त्यांनी कंपनीचे संचालक मंडळ व शेतकरी यांना गुणवत्तापूर्ण उत्पादन, बाजारपेठेत स्पर्धात्मक दर, तसेच ब्रँडिंग व पॅकेजिंगवर भर देण्याचे आवाहन केले. या भेटीमुळे हट्टा येथील स्मार्ट प्रकल्पाच्या कामांना गती मिळणार असून, शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या माध्यमातून जिल्ह्यातील शेतकऱ्यांना कृषि उत्पादनात मूल्यवर्धन, रोजगारनिर्मिती व आर्थिक सबलीकरणाचा मोठा फायदा होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

# महिला मंडळ अधिकाऱ्यांसमोर अर्धनग्न होऊन अश्लील वर्तन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली २२ ऑगस्ट**

कळमनुरी तालुक्यातील मसोड येथील महिला मंडळ अधिकारी यांच्या कार्यालयात आरओआर प्रकरणाची सुनावणी सुरू असतांना पक्षकाराचा मुलांसह एकाने विनाकारण वाद घालीत अर्धनग्न होऊन अश्लील वर्तन केल्याची घटना घडली असून या घटनेचा निषेध ग्राम महसुल अधिकारी संधटनेच्यावतीने करण्यात आला असून महिला मंडळ अधिकारी यांच्या सुरक्षेच्या दृष्टीकोनातून त्यांची इतर मंडळात बदली करण्याची मागणी निवेदनाद्वारे जिल्हाधिकारी यांचेकडे करण्यात आली आहे.

मसोड येथील मंडळ अधिकारी मिनाक्षी खंदारे या त्यांच्या कार्यालयात आरओआर प्रकरणाची सुनावणी घेत असतांना पक्षकाराचा मुलगा नागेश भारत सातव व त्याचा सहकारी आनंद मनोहर उन्हाळे यांनी विनाकारण वाद घालून न्याय दानाच्या प्रक्रीयेवर दबाव आणण्याचा प्रयत्न केला. नागेश सातव याने अर्धनग्न होऊन दमदाटी करून शिवीगाळ करीत अश्लील वर्तन केले. तसेच चित्रीकरण समाजमाध्यमावर पसरविण्याची धमकी दिली. याप्रकरणातील दोषींना तत्काळ अटक करून मंडळ अधिकारी खंदारे यांची इतरत्र बदली करावी अशी मागणी करण्यात आली आहे. निवेदनावर अध्यक्ष गजानन रणखांब, सचिव विनोद ठाकरे, एम एस खंदारे, शेवाळकर, ए टी काकडे, के बी पावडे, जयश्री अंभोरे, जे डी कुलकर्णी आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# रूग्णांना उपचारासाठी मिळतोय मुख्यमंत्री सहाय्यता निधीचा भक्कम आधार

## ३० रूग्णांना उपचारासाठी २३ लक्ष रूपयांचा निधी वितरीत

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २२ ऑगस्ट**

राज्यातील सर्वसामान्य नागरिकांना आरोग्यपूर्ण जीवन जगता यावे, यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मागर्दशनाखाली मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्ष स्थापन करण्यात आला आहे. हा कक्ष प्रत्येक जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी कार्यालयात स्थापन करण्यात आला असून, या कक्षामार्फत गरीब, गरजू रुग्णांवर उपचार करण्यासाठी पैशाची चणचण भासते. त्यामुळे बरेचदा रुग्ण अथवा त्यांचे नातेवाईक वेळेत उपचार घेऊ शकत नाहीत. अशावेळी कोणताही रुग्ण पैशाअभावी उपचार न घेता परत जाता कामा नये. त्याच्यावर वेळेत उपचार व्हावेत आणि त्याचा जीव वाचावा, यासाठी मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी या कक्षाची स्थापना केली आहे.

मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता योजनेच्या माध्यमातून गरीब व गरजू रुग्णांना आणि पर्यायाने त्यांच्या नातेवाईकांना मोठा आधार मिळाला आहे. रुग्णासह संपूर्ण कुटुंबाचा धीर खचून जातो. अशावेळी मुख्यमंत्री सहायता निधीतून रुग्ण व त्यांच्या कुटुंबियांना मोठा दिलासा मिळताना दिसत आहे.राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्यमंत्री सहाय्यता निधी हा उपक्रम राबवण्यात येत आहे. या माध्यमातून समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना दुर्धर आजारांवर उपचाराकरिता अर्थसहाय्य करण्यात येत आहे. मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून मदत मिळण्यासाठी रुग्णांना आता मुंबईला जाण्याची गरज राहिली नसून प्रत्येक जिल्हास्तरावर मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय कक्षाची स्थापना १ मे २०२५ पासून करण्यात आली आहे. रुग्णांना आता त्यांच्या स्वत:च्या जिल्ह्यात उपचारासाठी मदतीसाठी अर्ज करता येणार असून, अर्जावर झालेल्या कार्यवाहीची माहितीसुद्धा त्यांच्या जिल्ह्याच्या कक्षात मिळणार आहे. हिंगोली येथे जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारात मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष कार्यरत आहे. येथे डॉ.नामदेव कोरडे हे कार्यरत असून, या कक्षामार्फत जिल्ह्यात आतापर्यंत या निधीच्या माध्यमातून ३० रुग्णांना मदत केली आहे. यासाठी २३ लक्ष रुपयांचा निधी गेल्या ३ महिन्यात वितरीत करण्यात आला असल्याची माहिती मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय हिंगोली कक्षाच्यावतीने दिली आहे.

शामराव किशनराव सूर्यवंशी हे हिंगोली जिल्ह्यातील शेवाळा (ता.कळमनुरी) येथील रहिवाशी आहेत. ते व्यवसायाने शेतकरी असून, नेहमीप्रमाणे ते, त्यांचा भाऊ आणि मुलगा असे तिघेजण २३ जून २०२५ रोजी सायंकाळी ६.३० वाजता शेतीकाम करून घराकडे परतत असताना, पाठीमागून भरधाव वेगाने एका दुचाकीस्वाराने धडक दिल्याने त्यांच्या डोक्याला व पायाला मार लागला. घरची आर्थिक परिस्थिती जेमतेम असल्यामुळे त्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागला. शामराव सूर्यवंशी यांना पुढील उपचारासाठी नांदेड येथील तुकामाई हॉस्पिटल येथे उपचारार्थ दाखल करण्यात आले.

त्यांच्या पायावर शस्त्रक्रिया करण्यात आली. मात्र दुसऱ्या दिवशी ते एकसारखी बडबड करत असल्याचे डॉक्टरांच्या निदर्शनास आल्यानंतर त्यांनी पुढील तपासणी केली असता, त्यांच्या डोक्याला गंभीर इजा झाल्याचे निदान झाले. पुढील उपचाराठी यशोसाई रुग्णालयात दाखल केले असता, त्यांना उपचारासाठी मुख्यमंत्री सहायता निधी कक्षाबाबत माहिती मिळाली. त्यानुसार त्यांचा मुलगा अविनाश याने हिंगोली येथील मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्षाकडे अर्ज दाखल केला.त्यामुळे त्यांना ७० हजार रुपयांची मदत झाल्याचे सांगत त्यांचा मुलगा अविनाश सूर्यवंशी यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आणि राज्य शासनाने आभार मानले आहेत. केवळ २ एकर शेतीवर कुटुंबाचा उदरनिर्वाह करताना नाकीनऊ येत असल्याचे सांगून महाराष्ट्र शासनाच्या या उपक्रमामुळे माझ्या वडिलाचा जीव वाचला असल्याचा आनंद अविनाश सूर्यवंशी यांच्या चेहऱ्यावर दिसून येत आहे.

सध्या वडील शामराव सूर्यवंशी यांच्यावर घरी औषधोपचार सुरु असून, लवकरच ते पूर्ववत आपले दैनंदिन जीवन जगण्याचा आनंद घेतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला आहे. अविनाश याने महाराष्ट्र शासनाच्या या उपक्रमाच्या माध्यमातून मदत मिळाल्यामुळे त्यांच्या वडिलांचा जीव वाचला, याबाबत त्यांनी मनापासून आभार मानले. गरजू व पात्र लाभार्थ्यांना या मदतीमुळे खूप मोठा आधार मिळत असून ही मदत गरजू रुग्णांच्या आयुष्यात एक आशेचा किरण ठरत आहे.

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## बोरगाव, धडकनाळचा वीजपुरवठा पुर्ववत सुरू

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२२ ऑगस्ट -** रविवारी रात्री झालेल्या मुसळधार पावसामुळे उदगीर तालुक्यातील बोरगाव आणि धडकनाळ गावांमध्ये मोठं नुकसान झालं आहे. जनजीवन विस्कळीत झालं असून,महावितरणच्या वीजयंत्रणेलाही मोठा फटका बसला. महावितरणकडून परिस्थिती पूर्ववत आणण्यासाठी पडत्या पावसातही युद्धपातळीवर प्रयत्न करून अखेर दुपारी साडेचार वाजता दोन्ही गावांचा वीजपुरवठा पुर्ववत करण्यास यश मिळाले आहे.

रविवारी रात्री झालेल्या अतिवृष्टीमुळे बोरगाव आणि धडकनाळ गावात लेंडी नदीला पूर आला होता. त्यामुळे अनेक घरांमध्ये पाणी शिरलं सोबतच महावितरणचे वीज खांब, डीपी (रोहीत्र) कोसळले. यामुळे रविवारपासूनच ही दोन्ही गावं अंधारात होती. गेल्या तीन दिवसांपासून महावितरणच्या उदगीर विभागाचे कार्यकारी अभियंता श्री महाद्वार यांच्यासह सर्व कर्मचारी वीज खांब आणि डीपी पुन्हा उभा करण्याचं काम अहोरात्र करत होते. मात्र, या दोन गावांना नांदेड जिल्हयातील मुक्रमाबाद उपकेंद्रातून वीजपुरवठा होतो. मुक्रमाबाद आणि परिसरातही जोरदार पाऊस झाल्यामुळे तिथेही विजेचे खांब कोसळले होते.

त्यामुळे वीज जोडणीमध्ये अडथळे येत होते. महावितरणच्या लातूर परिमंडळाचे मुख्य अभियंता अरविंद बुलबुले, अधीक्षक अभियंता प्रशांत दाणी हे जातीने सर्व कामावर लक्ष ठेवून होते.

वीजपुरवठा लवकर पुर्ववत व्हावा यासाठी नांदेड जिल्हयातील महावितरणच्या अधिकाऱ्यांशी सतत संपर्कात होते. गुरुवारी अखेर दुपारी या परिश्रमाला यश प्राप्त झाले असून बोरगाव व धडकनाळ गावांचा विभाग वीजपुरवठा सुरू करण्यात आला आहे.




### संक्षिप्त वृत्त...

## लेखिका ज्योती भारती यांना राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२२ ऑगस्ट -** येथील गोसावी समाज प्रतिष्ठानच्यावतीने देण्यात येणारा राज्यस्तरिय



समाजभूषण पुरस्कार प्रसिध्द लेखिका ज्योती हनुमंत भारती यांना जाहीर झाला आहे. येत्या २३ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता गांधी मैदान येथील भालचंद्र रक्तपेढीच्या सभागृहात मान्यवरांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे, अशी माहिती संयोजक अनिल पुरी यांनी दिली.

शैक्षणिक तसेच साहित्य क्षेत्रात केलेल्या भरीव कामगिरीची दखल घेऊन ज्योती भारती यांना हा पुरस्कार देण्यात येणार आहे. गोसावी समाजाच्या प्रगतीसाठी महत्त्वाचे योगदान दिलेल्या विविध क्षेत्रातील व्यक्तींना दरवर्षी हा पुरस्कार दिला जातो. ज्योती भारती मुंबईतील के. पी. बी. हिंदुजा वाणिज्य कनिष्ठ महाविद्यालयात प्राध्यापिका म्हणून कार्यरत आहेत. गेल्या अनेक वर्षांपासून त्या समाजिक विषयांवर लेखन करतात. दैनिक संचारच्या रविवार पुरवणीत त्यांची लेखमाला विचकप्रिय झाली होती. यापूर्वी ज्योती भारती यांना विविध संस्थांच्या पुरस्कारांनी सन्मानीत करण्यात आले आहे.

## लॉर्ड श्रीकृष्ण इंग्लिश स्कुल मध्ये पोळा सण उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२२ ऑगस्ट -** मातोश्री कलावती प्रतिष्ठान संचालित लातूर येथील लॉर्ड श्रीकृष्ण् इंग्लिश स्कुल मध्ये विद्यार्थ्यांनी बैल पोळा सण उत्साहात साजरा केला.

याप्रसंगी बैलांची पूजा करून कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. यावेळी प्राचार्या रुपाली कुलकर्णी यांच्या हस्ते बैलांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. विद्यार्थ्यांना भारतीय संस्कृतीतील सणांची ओळख व्हावी या दृष्टीने लॉर्ड श्रीकृष्ण इंग्लिश स्कुल मध्ये आज बैल पोळा सण साजरा केला. शाळेच्या शिक्षिका विद्या पाटील यांनी बैलपोळा सणा विषयी सविस्तर माहिती विद्यार्थ्यांना दिली. बैल पोळा सण शेतकऱ्यांसाठी अंत्यत उत्साहाचा असतो. शेती हा व्यवसाय मोठ्या प्रमाणात बैलांवर अवलंबून आहे. त्यामुळे बैलांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी ग्रामीण भागातील लोक पोळा सण साजरा करतात. या दिवशी बैलाचीपूजा करून त्याची वाजत गाजत मिरवणूक काढली जाते. महिला घरामध्ये मातीच्या बैलांचीपूजा करून पूजा करतात.

## मराठा आरक्षण रथयात्रेचे स्वागत

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२२ ऑगस्ट -** मराठा आरक्षणासाठी राज्यभर जनजागृती करण्यासाठी रामभाऊ गायकवाड यांनी २० ऑगस्टपासून मराठा आरक्षण रथयात्रा आयोजिली आहे. ही रथयात्रा बुधवारी सायंकाळी लातुरात आली. या रथयात्रेचे लातूरच्या छत्रपती शिवाजी महाराज चौकात जोरदार स्वागत करण्यात आले.

२० ऑगस्ट ते २८ ऑगस्ट दरम्यान, ही रथयात्रा आयोजिली असून, २९ ऑगस्ट रोजी आरक्षण योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या सोबत मुंबईतील आझाद मैदानावर उपस्थित राहणार असल्याचे गायकवाड यांनी सांगितले. राज्यभरातील जिल्ह्यांत फिरून आरक्षण यात्रेसंबंधी जनजागृती केली जात आहे. मराठा समाजातील प्रत्येक नागरिकाने जरांगे पाटील यांच्या मुंबई यात्रेत सहभागी व्हावे, असे आवाहन मराठा क्रांती मोर्चा राज्य समन्वयक रामभाऊ गायकवाड यांनी केले आहे. लातुरात बुधवारी सायंकाळी छत्रपती शिवाजी महाराज चौकात मराठा महासंग्रामचे संस्थापक अध्यक्ष राजकुमार सूर्यवंशी-पाटील यांनी गायकवाड यांचे स्वागत केले.

## प्रदूषण नियंत्रण; मनपा शाळेत वृक्षारोपण उपक्रम

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२२ ऑगस्ट -** राष्ट्रीय शुद्ध हवा कार्यक्रम अंतर्गत लातूर महानगरपालिकेने शहरातील वायू आणि धूळ प्रदूषण नियंत्रणात आणण्यासाठी उपाययोजना सुरू केल्या आहेत. याचाच एक भाग म्हणून, २१ ऑगस्ट रोजी राजमाता जिजाऊ मनपा शाळा क्र. ११ येथे पर्यावरण संवर्धन आणि प्रदूषण या विषयांवर मार्गदर्शन व वृक्षारोपण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात विद्यार्थी, पालक आणि नागरिकांना वायू व धूळ प्रदूषणाबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

# शहरातील गणेश मंडळांना सीसीटीव्ही कॅमेरे लावणे बंधनकारक

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२२ ऑगस्ट -** जिल्हा पोलीस दलाच्या 'आपले लातूर, सुरक्षित लातूर' उपक्रम अंतर्गत सार्वजनिक गणेश मंडळांना पेंडाल व परिसरामध्ये सीसीटीव्ही कॅमेरे लावणे बंधनकारक करण्यात आले असून, गणेशोत्सव काळात कोणतीही अनुचित घटना टाळण्यासाठी आणि महिलांच्या सुरक्षेसाठी प्रत्येक गणेश मंडळाने सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत, असे आवाहन लातूर पोलिसांच्यावतीने करण्यात आले आहे.

पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या संकल्पनेतून लातूर जिल्हा पोलीस दलामार्फत 'आपले लातूर, सुरक्षित लातूर' उपक्रम राबविण्यात येत आहे. या अंतर्गत जिल्हाभरात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यासाठी विविध उपाययोजना करण्यात येणार आहेत. काही दिवसांतच गणेशोत्सवाला सुरुवात होणार असून, महाराष्ट्रात मोठ्या उत्साहात गणेशोत्सव साजरा करण्यात येतो. सदरचा गणेशोत्सव निर्विघ्नपणे पार पडावा यासाठी लातूर पोलिसांच्यावतीने जय्यत तयारी करण्यात आली आहे.



गणेशोत्सव काळात कोणतीही अनुचित घटना टाळण्यासाठी आणि महिलांच्या सुरक्षेसाठी प्रत्येक गणेश मंडळांनी सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत, असे आवाहन लातूर पोलिसांकडून करण्यात येत आहे. गणेश मंडळानी पेंडाल व परिसरामध्ये कमीत कमी ४ सीसीटीव्ही कॅमेरे लावावेत, असे बंधन गणेश मंडळांना करण्यात येणार आहे.

जे गणेश मंडळ ४ सीसीटीव्ही कॅमेरे लावतील त्या गणेश मंडळाचा संबंधित पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सत्कार करून प्रशस्तीपत्र देणार आहेत.

जे गणेश मंडळ हे ८ सीसीटीव्ही कॅमेरे लावतील त्यांना उपविभागीय पोलीस अधिकारी हे सत्कार करून प्रशस्तीपत्र देतील. तसेच जे गणेश मंडळ १६ सीसीटीव्ही कॅमेरे लावतील त्यांचा जिल्हा स्तरावर पोलीस अधीक्षक यांच्यामार्फत सत्कार करून प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात येणार आहे.

### नियमांचे पालन करावे

**गणेशोत्सव संपल्यानंतर गणेश मंडळाने लावलेले हे कॅमेरे हे त्यांच्या गावातील किंवा चौकातील महत्त्वाच्या ठिकाणी कायमस्वरूपी लावण्यात यावेत. जेणेकरुन लोकसहभागातून 'आपले लातूर, सुरक्षित लातूर' ही संकल्पना यशस्वी होण्यास मदत होईल. गणेश मंडळांनी सीसीटीव्ही बसवल्यास महिला आणि युवतींच्या सुरक्षेला मदत तसेच प्रोत्साहन मिळेल. गणेश मंडळांनी आपल्या वर्गणीचा सदुपयोग करून लोकसहभागातून सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत, पोलिसांनी घालून दिलेल्या नियमांचे पालन करावे, वेळेचे बंधन पाळावे, ध्वनिप्रदूषण टाळावे आणि पर्यावरणपूरक उत्सव साजरा करावा, असे आवाहन लातूर पोलिसांकडून करण्यात आले आहे.**

## वाहतूक कोंडी भोवली; सुकाळे यांची बदली

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२२ ऑगस्ट -** शहरात सातत्याने होणाऱ्या वाहतूक कोंडीने लातूरकर बेजार झाले आहेत. ही वाहतूक कोंडी फोडण्यासाठी महिनाभरापूर्वीच शहर वाहतूक नियंत्रण शाखेचे पोलीस निरीक्षक म्हणून बुध्दीराज सुकाळे यांची नेमणूक करण्यात आली होती. मात्र, या कालावधीत सुकाळे यांनी वाहतुकीला शिस्त न लावल्यामुळे त्यांची बदली आता लातूरच्या पोलीस कल्याण विभागात करण्यात आली आहे.



लातूर शहरामध्ये वाहतुकीची कोंडी ही मोठी समस्या निर्माण झाली आहे. चारचाकी, पीकअप वाहन, ऑटोरिक्षा, दुचाकी तसेच मालवाहू वाहने, खासगी ट्रॅव्हल्स, बसेस, अवजड वाहने यांना शिस्त कधी लागलीच नाही.

कोणताही माणूस घराबाहेर पडला की, त्याला रस्त्याने चालणेही जिकीरीचे बनले आहे. सततच्या वाहतूक कोंडीने अपघातांचे प्रमाणही वाढले आहे. गणेश कदम हे शहर वाहतूक नियंत्रण शाखेचे पोलीस निरीक्षक असताना त्यांच्या कार्यकाळात वाहतुकीला काही प्रमाणात शिस्त लागली होती. मात्र, त्यांची नुकतीच कार्यकाळ पूर्ण झाल्याने परभणी येथे बदली करण्यात आली आहे.

एक महिनाभरापूर्वीच शहरातील अनियंत्रीत वाहतुकीला शिस्त लावण्यासाठी बुध्दीराज सुकाळे यांची शहर वाहतूक नियंत्रण शाखेच्या पोलीस निरीक्षकपदी नेमणूक करण्यात आली होती. तेही या महिनाभरात वाहतुकीला शिस्त लावू शकले नाहीत. त्यामुळे महिनाभरातच त्यांची बदली पोलीस कल्याण विभागात करण्यात आली आहे. गुरुवारी त्यांच्या बदलीचे आदेश पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी पारीत केले आहेत. आता शहर वाहतूक नियंत्रण शाखेच्या पोलीस निरीक्षकपदाची जबाबदारी कोणत्या अधिकाऱ्यावर येणार आणि त्यांच्याकडून शहरातील वाहतूक कोंडी फोडली जाईल, का याची लातूरकरांना उत्सुकता लागली आहे.

## पूर्णवादी परिवाराने गौरव केलेल्या सर्वच महिला उपक्रमशील

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२२ ऑगस्ट -** जगात आपण समाजाचे काही तरी देणे लागतो. आपल्या आयुष्यात कोणत्याही कामाच्या माध्यमातून मदत केली तर त्या मदतीचा समाजाकडून गौरव होत असतो. पुर्णवादी परिवाराने गौरव केलेल्या सर्वच महिलांनी आपापल्या क्षेत्रात चांगली कामे केली आहेत. त्याचा समाजाला भविष्यात निश्चित फायदा होईल, असे प्रतिपादन विलास सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमन वैशाली देशमुख यांनी केले.

पुर्णवादी नारी फोरमच्या वतीने सति सौभाग्यवती मनकर्णिका माता यांच्या मंदीराच्या वर्धापन दिनानिमित्त दि. २० ऑगस्ट रोजी औसा रोडवरील गायत्री उत्सव हॉलमध्ये आयोजित 'गौरव कर्तृत्वाचा' या कार्यकमात विलास सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमन श्रीमती वैशालीताई विलासराव देशमुख बोलत होत्या. यावेळी पूर्णवादी नारी फोरमच्या प्रमुख विभावरीताई कुलकर्णी, लातूर मनपा आयुक्त श्रीमत्ती मानसी मीना, लातूर पूर्णवादी नारी फोरमच्या अध्यक्षा अमिता अशोक गोविंदपूरकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

पुर्णवादी परिवाराच्या वतीने समाजातील वंचितांसाठी काम करणाऱ्या महिलांचा सन्मान आयोजीत करण्यात आला होता. प्रारंभी प. पू. पारनेरकर महाराज यांच्या स्मृतीला अभिवादन करून पूजनाने कार्यक्रमाची सुरूवात झाली. यावेळी शशीकांत देशमुख व वैशालीताई देशमुख यांनी अभंग गाऊन भक्तीमय वातावरण निर्माण केले. या कार्यक्रमाचे प्रास्तावीक अशोक गोविंदपूरकर यांनी करून पुर्णवादी नारी मंचच्या वतीने आयोजीत सन्मानाबाबतची भूमिका विषद केली. प. पू. पारनेरकर महाराज यांनी सामाजीक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा सन्मान करण्याची सूचना केली होती. त्यांच्या सूचनेवरूनच हा सन्मान सोहळा आयोजीत करण्यात आल्याचे गोविंदपूरकर यांनी सांगितले.

यावेळी सौ. स्मिताताई परचुरे, संध्याताई बारगजे व महापालिका आयुक्त मानसी मीना यांचा सन्मान पुर्णवादी परिवाराच्या वतीने सन्मानचिन्ह करण्यात आला. यावेळी महापालिका आयुक्त मानसी मीना, स्मिताताई परचुरे व संध्याताई बारगजे यांनी मनोगत व्यक्त केले.

यावेळी पुर्णवादी परिवाराला प. पू. पारनेरकर महाराज यांच्या भगिनी विभावरी कुलकर्णी यांनीही मार्गदर्शन केले. यावेळी अनेक महिलांची उपस्थिती होती.

## मांजरा कारखान्यातर्फे जलपूजन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२२ ऑगस्ट -** मांजरा परिवाराचे मार्गदर्शक माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांच्या सूचनेनुसार, विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा शेतकरी सहकारी साखर कारखान्याच्यावतीने मांजरा धरण येथे व्हाईस चेअरमन अशोक काळे व संचालकांच्या हस्ते गुरुवारी जलपूजन करण्यात आले.

लोकनेते विलासराव देशमुख यांनी उभारलेल्या बॅरेजेसमुळे शेतकऱ्यांच्या जीवनात आमूलाग्र बदल घडून आला आहे. शेतीला आवश्यकतेनुसार पाणी मिळत असल्याने ऊस व अन्य पिकांच्या माध्यमातून आपल्या भागात



आर्थिक परिवर्तन घडून आले आहे. मांजरा परिवाराचे मार्गदर्शक दिलीपराव देशमुख हे साखर कारखानदारीला योग्य दिशा आणि मार्गदर्शन करीत असल्याने आणि माजी मंत्री आमदार अमित देशमुख, जिल्हा बँकेचे चेअरमन माजी आमदार धीरज देशमुख यांच्या पुढाकाराने साखर उद्योगात होत असलेले कार्य देशभरात गौरवले जात आहे. मुबलक पाणी, वेळेवर उसाचे गाळप व गरजेनुसार तत्परतेने कर्ज मिळत असल्याने सहकार क्षेत्र मजबूत स्थितीत आहे. सिंचनाची व्यवस्था सक्षम झाल्याने कृतज्ञता व्यक्त करत मांजरा कारखान्याकडून मांजरा धरण येथे जलपूजन करण्यात आले.

यावेळी संचालक कैलास पाटील, तात्यासाहेब देशमुख, सदाशिव कदम, दयानंद बिडवे, सचिन शिंदे, श्रीकृष्ण काळे, अनिल दरकसे, बाळासाहेब पांढरे, वसंत उफाडे, मदन भिसे, ज्ञानेश्वर पवार, नीळकंठ बचाटे, शंकर बोळंगे, अरुण कापरे, एस. आर. पाटील आदी उपस्थित होते.

## जातीवाचक उल्लेख; एकावर ॲट्रॉसिटीचा गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२२ ऑगस्ट -** महापुरूषांच्या जातीचा उल्लेख करून एकाला अपमानास्पद वागणूक दिल्याप्रकरणी एका शोरूमच्या वरिष्ठ अधिकाऱ्याविरोधात ॲट्रॉसिटीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणी पुढील तपास पोलीस करीत आहेत. येथील सारोळा रस्त्यावरील सुझुकी शोरूममधील एक वरिष्ठ अधिकारी आरोपी सचिन सुग्रीव भोसले (रा. वैभव नगर, लातूर) याने दि.१२ ऑगस्ट रोजी या कार्यालयातील सहकारी कर्मचारी प्रवीण युवराज उपाडे (रा. आर्वी, साई रोड, लातूर) याला महापुरूषाचा अवमान होईल, असे वक्तव्य केले. प्रवीण उपाडे याला अपमानास्पद वागणूक दिली. यामुळे फिर्यादीने विवेकानंद चौक पोलीस ठाण्यात आरोपी सचिन भोसले याच्याविरोधात तक्रार दिली. त्यावरून त्याच्याविरोधात गुरनं. ५५७/२५ कलम ३ (१) (आर.), ३ (१) (व्ही.) अ.जा.ज. प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अधिक तपास शहरचे उपविभागीय पोलीस अधिकारी एस. डी. साळवे यांच्या मार्गदर्शनात विवेकानंद चौक पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संतोष पाटील, उपनिरीक्षक मनीष आंधळे करीत आहेत.

## शेतकरी कर्जमाफी व मराठा आरक्षणासाठी संभाजी ब्रिगेडचे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लक्षवेधी आंदोलन



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२२ ऑगस्ट -** सरकारला जागे करण्यासाठी संभाजी ब्रिगेडचे लातूर जिल्हा अध्यक्ष प्रमोद कदम, राजकुमार माने यांच्या नेतृत्वामध्ये लक्षवेधी आंदोलन करण्यात आले व सरकार कडे कांही प्रमुख मागण्या करण्यात आल्या.

या सरकारने शेतकऱ्याची दिशाभूल केली आहे. महाराष्ट्रातील शेतकरी सध्या अडचणीत सापडला आहे. शेतकऱ्याच्या शेतीमालाला योग्य भाव मिळत नाही.सोयाबीनचा भाव साडेतीन हजाराच्या पुढे जात नाही. निवडणुकीच्या तोंडावर शेतकऱ्याची कर्जमाफी करतो म्हणणारे मुख्यमंत्री सध्या गप्प बसले यामुळे महागाईने उच्चांक गाठला आहे.

बळीराजा होरपळला जात आहे, मराठा आरक्षणाची धग संपूर्ण महाराष्ट्रामध्ये पसरली असून सुद्धा या शेतकऱ्याला सरसकट कर्जमाफी द्या, मराठा व इतर समाज बांधवांचा आरक्षणाचा मार्ग मोकळा करा, दुधाला प्रति लिटर ७० रुपये प्रमाणे भाव द्या, ऊसाला एफ आर पी प्रमाणे सात दिवसात रक्कम द्या.साखर कारखान्यावर दोष विरहित पारदर्शक दोषविरहित वजनकाटे बंधनकारक करा,अतिवृष्टी झाल्याने दुष्काळ जाहीर करा,हेक्टरी ५० हजार रुपये प्रमाणे नुकसान भरपाई द्या, व ईव्हीएम बंद करून बॅलेट पेपरवर देशाच्या निवडणुका घ्या या प्रमुख मागण्यासमोर करत आजही एक दिवसीय लक्षवेधी आंदोलन करून लातूर जिल्हाधिकारी कार्यालयात या मागणीचे निवेदन देण्यात आले.

मुख्यमंत्र्यांनी या विषयाकडे सकारात्मक बघून तात्काळ आमच्या मागण्या मान्य कराव्या असे नमूद करण्यात आले.

यावेळी संभाजी ब्रिगेड जिल्हा सचिव इर्शाद शेख, महानगराध्यक्ष गजानन जाधव, उद्योजक कक्षाचे जिल्हाध्यक्ष मिथुन दिवे, उत्तम फड, रमेश लाबोटे, सलीम पठाण सिद्धेश्वर तेलंगे, जिल्हा संघटक मेहबूब सय्यद, मोहनेश्वर विश्वकर्मा,राजकुमार भालेराव या पदाधिकाऱ्यांचे स्वाक्षरी निवेदन देण्यात आले.

## लातुरात केंद्रीय विद्यापीठ स्थापन करा : खा.काळगे

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२२ ऑगस्ट -** शैक्षणिक क्षेत्रात स्वतःचा 'पॅटर्न' निर्माण करणाऱ्या लातूरमध्ये आयआयटी, आयआयएम या शैक्षणिक संस्था व केंद्रीय विद्यापीठ स्थापन करावे, अशी मागणी खासदार डॉ. शिवाजी काळगे यांनी केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्याकडे केली आहे. या प्रस्तावाला शिक्षणमंत्र्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला असून, लवकरच याबाबत निर्णय घेऊ, असे आश्वासनही त्यांनी दिले.

शैक्षणिक केंद्र म्हणून लातूर वेगाने विकसित होत असून, येथे उच्च शैक्षणिक संस्था स्थापन करण्याची मागणी होत आहे. त्या अनुषंगाने खासदार डॉ. काळगे यांनी मंगळवारी दिल्ली येथे केंद्रीय शिक्षणमंत्र्यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी लातुरात इंडियन इन्स्टिट्यूट



ऑफ टेक्नॉलॉजी (आयआयटी), इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट (आयआयएम) अथवा केंद्रीय विद्यापीठ स्थापन करावे. याबरोबरच लातूर येथील नवोदय विद्यालयासाठी कायमस्वरूपी प्राचार्य द्यावा, अशी मागणी निवेदनाद्वारे खासदार डॉ. काळगे यांनी केली. यावेळी खासदार डॉ. कल्याण काळे, खासदार बळवंत वानखेडे हेही उपस्थित होते.

या संस्था उभारण्यासाठी केंद्र सरकारने फिजिबिलिटी अहवाल तयार करून लातूरकरांच्या मागणीचा सकारात्मकपणे विचार करावा, अशी विनंती केली. त्याला सकारात्मक शिक्षणमंत्र्यांनी प्रतिसाद दिला असल्याचे खासदार डॉ. शिवाजी काळगे यांनी सांगितले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# खराब धावपट्टीमुळे नांदेड विमानतळ राहणार बंद !

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड दि.२२ ऑगस्ट**

अति पावसामुळे विमानतळाची धावपट्टी खराब झाल्याने, आजपासून (२२ ऑगस्ट) विमानतळ तात्पुरता बंद करण्यात आला आहे. त्यामुळे पुढील किमान एक महिन्यापर्यंत नांदेडहून कोणतीही विमान सेवा सुरू होणार नाही, तसेच कोणतेही विमान नांदेडमध्ये उतरणार नाही, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.



धावपट्टीची अवस्था अत्यंत खराब झाल्याने, विमान नियंत्रण प्राधिकरणाने काही दिवसांपूर्वी तपासणी करून तात्काळ विमानतळ बंद करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार, आता विमानसेवा पूर्णपणे थांबवण्यात आली आहे. नांदेड विमानतळ २००९ पासून रिलायन्स कंपनीकडे देखभाल व व्यवस्थापनासाठी देण्यात आले होते. मात्र, कंपनीकडून योग्य देखभाल व दुरुस्ती न झाल्यामुळे हे अधिकार परस्पर काढून घेण्यात आले व विमानतळाचे संचालन महाराष्ट्र शासनाच्या 'महाराष्ट्र एअरपोर्ट डेव्हलपमेंट कंपनी लिमिटेड ' या संस्थेकडे सोपवण्यात आले. प्रत्येक पाच वर्षांनी धावपट्टीची दुरुस्ती आवश्यक असते. रिलायन्सने शेवटची दुरुस्ती २०१७ मध्ये केली होती. त्यानंतर नियोजित वेळेत दुरुस्ती न झाल्यामुळे धावपट्टीची स्थिती खालावली. अलीकडील दिवसांत झालेल्या मुसळधार पावसामुळे स्थिती अधिकच बिघडली आहे. सध्याच्या अंदाजानुसार, नांदेड विमानतळ किमान पुढील एक महिना तरी पूर्णपणे बंद राहण्याची शक्यता आहे. दरम्यान, प्रवाशांनी पर्यायी वाहतूक व्यवस्थेचा विचार करावा, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

# महावितरणला होटाळा ग्रामस्थांचा दणका; घेराव घालताच मिळाले नवे रोहित्र!

**तभा वृत्तसेवा**
**नायगाव , दि. २२ ऑगस्ट -**

नायगाव तालुक्यातील होटाळा या गावात गेले पंधरा ते वीस दिवस अंधाराचे साम्राज्य होते. कारण काय तर गावातील विद्यूत रोहित्र जळाल्याने संपूर्ण वीजपुरवठा ठप्प झाला होता. अनेक वेळा सरपंच प्रतिनिधी ग्रामस्थांनी महावितरणकडे अर्ज विनंत्या केल्या. पण महावितरणचे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी गावकऱ्यांच्या तक्रारींकडे सरळ दुर्लक्ष केले. शेवटी नायगांव येथील महा वितरण उपविभाग कार्यालयाला घेराव घातल्याने नवीन रोहीत्र मिळाले.



होटाळा ग्रामपंचायतीचा मुख्य डीपी बंद, लाईनमन गायब, आणि महावितरणचे अधिकारी शांत या सर्व प्रकारांमुळे गावकरी अक्षरशः अंधारात राहायला भाग पडले होते. होटाळा येथील सरपंच प्रतिनिधीच्या नेतृत्वा खाली माजी सरपंच दत्तात्रय पवार होटाळकर, माजी.उपसरपंच शिवाजी पवार,बाजीराव पवार, दिगांबर पवार, रमेश पवार, संजय बन महाराज, संभाजी जाधव, नाना पाटील,आनंद ताटे,खन्ना पवार, आदि तब्बल शंभर ते दीडशे ग्रामस्थांनी एकत्र येत दि. १८ रोज रोज सोमवारी सकाळी नायगांव येथील महा वितरण उपविभाग कार्यालयाला घेराव घातला. संतप्त नागरिकांचा रोषपाहताच येथील महावितरण उपविभागातील प्रभारी अधिकाऱ्यांचे डोळे उघडले आणि तातडीने होटाळा येथे जाऊन.होट्याळ्यातील सर्वजुने सिंगल डिपीचे रोहित्र काढून. त्या ठिकाण णी नव्यारोहित्राची व्यवस्था करण्यात आली. त्यामुळे अखेर होटाळा गावातील वीजपुरवठा या वेळी सुरळीत करण्यात आला.ही घटना महावितरण च्या नियोजनशून्य आणि बेपर्वा कामकाजावर जोरदार प्रश्नचिन्ह निर्माण करणारी आहे. जनतेने रस्त्यावर उतरल्याशिवाय प्रशासन हलत नाही, ही दुर्दैवी बाब पुन्हा एकदा समोर आली आहे. प्रशासनाला जागे करणारा होटाळ्याचा एल्गार अंधारात टाकून अधिकारी गेले कुठे? महावितरण च्या हलगर्जी कारभारावर आता जाहीरपणे ताशेरे ओढले जात आहेत.

# स्वारातीम विद्यापीठात व्याख्यान

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. २२ ऑगस्ट -**

'महाराष्ट्रातील आधुनिक शाहिरी' या विषयावर प्रा. हंसराज जाधव यांचे व्याख्यान शुक्रवार, दि. २२ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ११ वाजता, भाषा संकुलात आयोजित करण्यात आले आहे. या व्याख्यानाचा लाभ घ्यावा, असे आवाहन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या भाषा, वाङ्मय व संस्कृती अभ्यास संकुलाचे संचालक प्रा. दिलीप चव्हाण यांनी केले आहे.

# हिंदू देवस्थानच्या मालकी जागेची गुंठेवारी रद्द करा

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड , दि. २२ ऑगस्ट -**

मनपा हद्दीतील हिंदू देवस्थानच्या मालकी जागेची करण्यात आलेली बोगस गुंठेवारी रद्द करून मनपा दोशी अधिकाऱ्यावर तात्काळ निलंबनाची कारवाई करण्याची मागणी मनसे जिल्हाध्यक्ष मॉन्टीसिंग जहागीरदार यांनी निवेदनाद्वारे जिल्हाधिकारी यांच्याकडे केली आहे.

नांदेड मनपा हद्दीतील वजीराबाद भागातील सर्वे नंबर ३९ अ मधील १२०० स्क्वेअर फिट जागा ही महादेव मंदिर करिता कामाजी रुखमाजी हळदे यांनी दिनांक २२/ १२ /२००४ रोजी बालाजी कामाजी हळदे यांना बक्षीस पत्र आधारे करून देण्यात आली असल्याचेही जहागीरदार यांनी निवेदनात नमूद केले आहे

सदरील जागेमध्ये वडिलोपार्जित महादेव मंदिर असताना काही विघ्न संतोषी व्यक्ती यांनी बनावट कागदपत्र आधारे नांदेड मनपा अधिकारी यांना हाताशी धरून सदरील जागेची गुंठेवारी विकास नियमितीकरण प्रमाणपत्र जा. क्रमांक १/ ३४७ दिनांक १२/ ६/ २०२४ रोजी नियमबाह्य बनावट गुंठेवारी प्रमाणपत्र काढण्यात आले महादेव मंदिराच्या जागेची करण्यात आलेली बोगस गुंठेवारी प्रमाणपत्र काढून एक प्रकारे हिंदू देवतांची विटंबना करीत करीत असल्याचाही आरोप जहागीरदार यांनी केला. या कृत्यामुळे हिंदू धर्मियांच्या भावना दुखावल्या जाऊन जातीय तेढ निर्माण होऊन जातीय दंगल घडवण्याचा घाट समाजकंटकाकडून करण्यात येत असल्याचेही जहागीरदार यांनी निवेदनात नमूद केले आहे.


महादेव मंदिराच्या जागेची करण्यात आलेल्या गुंठेवारी प्रकरणाची तात्काळ चौकशी करून बोगस गुंठेवारी प्रमाणपत्र रद्द करून नांदेड मनपातील दोशी अधिकारी यांच्यावर तात्काळ निलंबनाची कारवाई करण्यात यावी अन्यथा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने प्रशासनाच्या विरोधात तीव्र आंदोलन छेडण्यात येईलक असा इशारा मनसे जिल्हा अध्यक्ष मॉन्टीसिंघ जहागीरदार यांनी निवेदनाद्वारे दिला आहे

यावेळी मनसे शहराध्यक्ष अब्दुल शफिक मनसे शेतकरी सेना अध्यक्ष सदाशिव पाटील आरसुळे, मनसे विद्यार्थी सेना जिल्हाध्यक्ष अनिकेत परदेशी, मनसे तालुका अध्यक्ष दिलीप राठोड, मनसे सेना उपाध्यक्ष सुभाष भंडारे, राम जाधव, संघरत्न जाधव, शिवराज पाटील, किरण पाटील, ईश्वर पाटील हनुमंत, पाटील आदी मनसे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते

## संक्षिप्त वृत्त

### हसनाळ येथील पुरात बचावलेल्या मारोती मादाळेचे अखेर निधन

**मुखेड** -तालुक्यातील लेंडी प्रधान प्रकल्पातील बांधीत गावांमध्ये अतिवृष्टी पावसामुळे आलेल्या पुरामुळे ६ लोकांचा मृत्यू झाला आहे. हसणाळ येथील रहिवासी मारोती विठ्ठल मादाळे हे दि.१७ च्या ऑगस्ट



च्या मध्यरात्री हसनाळ येथे पुरात होते त्याना हसनाळ येथुन पुरातुन यादव मादाळे या तरूणान बाहेर काढले मात्र पावसामध्ये भिजल्याने अंगात हुडहुडी भरली होती यानंतर त्यांना सर्दी - ताप (निमोनिया), अस्थमा (दमा) झाल्याने देगलुर येथील खासगी रुग्णालयात उपचार करून परतलेल्या मारुती मादाळे ईटग्याळ (प.दे) आकस्मितपणे दुःखद पणे दि.२२ ऑगस्ट रोजी सकाळी ८.३४ वाजता मृत्यू झाल्याने लेंडी नदीच्या पुरामुळे ६ वा बळी गेल्याने लेंडी प्रकल्प ग्रस्त भागासह तालुक्यात सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे. स्व. मारोती मादाळे हे दैनिक लोकप्रश्न चे मुखेड तालुका प्रतिनिधी पत्रकार दिलीप मादाळे व गुजरात राज्यातील सुरत येथील व्यवसाईक खंडेराव मादाळे यांचे ते वडील होते.स्व.मारोती मादाळे यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले,मुली सुना नातवंडे असा मोठा परिवार आहे.

### किनवट येथे शांतता समितीची बैठक

**किनवट** -आगामी पोळा, गणेशोत्सव, ईद-ए-मिलाद व इतर सण-उत्सव शांततेत, सौहार्दात व कायद्याच्या अधीन राहून पार पडावेत यासाठी तहसील कार्यालय किनवट येथे (दि.२१) रोजी सकाळी



११ वाजता शांतता समितीची बैठक पार पडली. बैठकीस उपविभागीय पोलीस अधिकारी रामकृष्ण मळघणे, तहसीलदार डॉ. शारदा चौंडेकर, नगर परिषद मुख्याधिकारी डॉ. अजय कुरवाडे, नायब तहसीलदार शेख रफिक, पोलिस निरीक्षक देविदास चोपडे, सा. बां. विभागाचे अभियंता झरीकर, महावितरण चे सहाय्यक अभियंता आकाश क्षिरसागर यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी सणांच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी शांतता, सामाजिक ऐक्य आणि नियमांचे पालन करून उत्सव साजरे करावेत, तसेच कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले. बैठकीला पत्रकार बांधव, सर्व पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते, पोलीस पाटील, सामाजिक कार्यकर्ते, शांतता समिती सदस्य, गणेशोत्सव समितीचे कार्यकर्ते, प्रतिष्ठित नागरिक व ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. बैठक सौहार्दपूर्ण आणि उत्साहाच्या वातावरणात संपन्न झाली.

### आकाश नॅशनल टॅलेंट हंट एक्झाम उपक्रम

**नांदेड, दि. २२ ऑगस्ट** - मागील १६ वर्षांपासून विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना यशात रुपांतरित करत आलेल्या 'आकाश एज्युकेशनल सर्व्हिसेस लिमिटेड' (एईएसएल) देशातील अग्रगण्य टेस्ट प्रिपरेटरी



संस्थेने आपल्या प्रतिष्ठित उपक्रमाची 'अँथे २०२५' (आकाश नॅशनल टॅलेंट हंट एक्झाम) घोषणा केली आहे. भारतीय शैक्षणिक क्षेत्रातील एक अत्यंत महत्त्वाची ही परीक्षा असून, इयत्ता पाचवी ते १२वीच्या विद्यार्थ्यांना आत्मविश्वासाने आव्हानांना सामोरे जाण्यासाठी सक्षम करणे हा या परीक्षेचा मुख्य उद्देश असल्याचे 'आकाश'चे सीईओ दीपक मेहरोत्रा यांनी सांगितले. 'अँथ २०२५' ही परीक्षा ऑनलाइन आणि ऑफलाइन अशा दोन्ही माध्यमांतून घेतली जाईल. जेणेकरून देशभरातील विद्यार्थ्यांना सोयीस्कर पर्याय मिळेल. 'अँथे' ची ऑनलाइन परीक्षा ४ ते १२ ऑक्टोबर दरम्यान होईल. 'अंथे' साठी नोंदणी सुरु झाली आहे. विद्यार्थ्यांनी https://anthe.aakash.ac.in/home या वेबसाईटवर जाऊन ऑनलाइन नोंदणी करु शकतात किंवा जवळच्या आकाश सेंटरला भेट देऊ शकतात. प्रवेशपत्र परीक्षा तारखेच्या पाच दिवस अगोदर मिळेल, असेही मेहरोत्रा यांनी सांगितले आहे.

### पूरग्रस्तांच्या मृत्यूप्रकरणी अभियंत्यावर गुन्हे दाखल करा : रावणगावकर

**नांदेड** - मुखेड तालुक्यात निर्माण झालेल्या पूर परिस्थितीने पाच जणांचे बळी घेतले आहेत. शेकडो जनावरे दगावली आहेत. त्यामुळे



या मृत्यूला जलसंपदा विभागाचे कार्यकारी अभियंता तिडके हे जबाबदार आहेत. पाच जणांच्या मृत्यूला आणि शेकडो पशुंच्या बळींना जबाबदार असणाऱ्या तिडके यांच्यावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा, अशी मागणी रिपब्लिकन सेनेचे जिल्हा उपाध्यक्ष प्रवीण रावणगावकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. दि. १७ ऑगस्ट रोजी मध्यरात्री मुखेड तालुक्यातील लेंडी प्रकल्पात अचानक आलेल्या पाण्याने रौद्ररूप धारण केले. धरणाच्या बुडीत क्षेत्रातील गावांचे पुनर्वसन झाले नसतांनाही धरणाची घळभरणी करण्यात आली. परिणामी रावणगाव, हसनाळ, भिंगोली आदी गावांत पुराचे पाणी शिरले. हसनाळमधील पाच जणांचा या पाण्यात बुडून मृत्यू झाला, तर शेकडो नागरिक बेघर झाले आहेत. कारवाई न झाल्यास रिपब्लिकन सेनेच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा रिपब्लिकन सेनेचे जिल्हा उपाध्यक्ष प्रवीण रावणगावकर यांनी दिला आहे.

# आमदार भीमराव केराम थेट पूरग्रस्त शेतकऱ्यांच्या बांधावर

**तभा वृत्तसेवा**
**माहुर , दि. २२ ऑगस्ट -**

तालुक्यासह परिसरात गेल्या काही दिवसांपासून सतत कोसळणाऱ्या पावसामुळे नद्या-नाले तुडुंब भरून वाहत आहेत. त्यामुळे अनेक गावे पाण्याखाली गेली असून शेतजमिनीवर थेट पूरपाणी शिरल्याने मोठ्या प्रमाणावर पिकांचे नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांचे खरीप हंगामातील सोयाबीन, कापूस, तुरी, भाजीपाला यांसह इतर पिके पूर्णतः पाण्याखाली गेल्याने शेतकरी वर्गावर मोठे आर्थिक संकट ओढावले आहे.



या पार्श्वभूमीवर आमदार भीमराव केराम यांनी आज पूरग्रस्त अंजनखेड,बोंड गव्हाण, मदनापूर, सायफळ, वडसा, पडसा,टाकळी, रुई,हडसणी,या गावांना भेट देत शेतशिवारातील नुकसानीची पाहणी केली. त्यांनी शेतकऱ्यांशी थेट संवाद साधून त्यांच्या अडचणी, नुकसानाची व्याप्ती व तातडीच्या गरजा जाणून घेतल्या. यावेळी शेतकऱ्यांनी पिकांचे झालेले नुकसान, बुडालेल्या जनावरांचे प्रश्न, तरतुदींचा अभाव आणि मदतीची निकड याविषयी आपल्या व्यथा आमदारांसमोर मांडल्या.

या भेटीदरम्यान आमदार केराम यांनी महसूल आणि कृषी विभागातील अधिकाऱ्यांना अद्याप पर्यंत जिथे पाहणी व पंचनामे झाली नाही अशा ठिकाणी तत्काळ पंचनामे करून अहवाल शासनाकडे सादर करण्याचे आदेश दिले. पूरामुळे झालेल्या नुकसानीचे खरे आकलन होऊन शेतकऱ्यांना योग्य ती मदत मिळणे गरजेचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.


यावेळी माहूरचे तहसीलदार अभिजीत जगताप, सिंदखेड पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक रमेश जाधवर, माहूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक गणेश कराड,, , पंचायत समितीचे गटविकास अधिकारी ज्ञानेश्वर टाकरस, महसूल विभागाचे अधिकारी,कृषी विभागाचे अधिकारी, स्थानिक कार्यकर्ते व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सण उत्सव शांततेच्या वातावरणात साजरे करुन नवा आदर्श निर्माण करावा: पो.नि.धीरज चव्हाण

**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड, दि. २२ ऑगस्ट -**

आगामी सण उत्सव साजरे करीत असताना प्रत्येक नागरिकांनी आपापले सण, उत्सव शांततेच्या वातावरणामध्ये साजरे करून एक नवा आदर्श निर्माण करावा व तसेच तालुक्यातील व शहरातील प्रत्येक गणेश मंडळानी कायदा सुव्यवस्थेचे पालन करावे असे आवाहन मुदखेड पोलिस ठाण्याचे पोलीस निरिक्षक धीरज चव्हाण यांनी दि.२१ ऑगस्ट रोजी तहसील कार्यालयाच्या सभाग्रहात शांतता समितीच्या बैठकी प्रसंगी केले.

या बैठकीत नागरिकांनी आपल्या समस्या मांडल्या आहेत यामध्ये रस्त्यावर खड्डे झाले त्या ठिकाणी चुरी टाकून रस्ता दुरुस्ती करून द्यावे व विज पुरवठा खंडीत न करता सुरळीत सुरू ठेवण्यात यावा तसेच शहरातील विसर्जन मिरवणूकीच्या मार्गातील पथदिवे दुरुस्त करून द्यावेत आणि विसर्जनाच्या ठिकाणी झाडाझुडपाची साफ सफाई करून देण्यात यावी असे संबधीत अधिकाऱ्यांसमोर समस्या व्यक्त केल्या आहेत. उपस्थित असलेले संबंधित अधिकारी यांनी गणेश मंडळांना



आपल्या समस्या पूर्ण करण्यात येईल असे आश्वासन दिले. व तसेच दरवर्षी प्रमाणे याही वर्षी उत्कृष्ट गणेश मंडळास पारितोषिक देण्यात येईल असे काँग्रेस कमिटीचे शहरध्यक्ष कैलास गोडसे यांनी शांतता बैठकीत सांगीतले.

यावेळी मुदखेड पोलिस ठाण्याचे पोलिस निरिक्षक धीरज चव्हाण, नायब तहसीलदार विजयकुमार पाटे, नायब तहसीलदार संतोष कामठेकर, नगरपरिषदेचे अभियंता जमदाडे, महावितरणचे अभियंता उभाड, पोलीस विशेष शाखेचे किशोर पाटील, तालुक्यातील पोलिस पाटील महिला पोलीस पाटील, विविध पक्षाचे पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते जेष्ठ नागरिक व शहरातील गणेश मंडळाचे अध्यक्ष, पदाधिकारी व पत्रकार बांधव व सर्व समाज बांधवांची या बैठकीला उपस्थिती होती.



**माहूर- हरित महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र अभियान उपक्रमांतर्गत नगर पंचायत माहूरच्या वतीने शहरातील मातृतीर्थ तलाव या परिसरात मोठ्या प्रमाणात म्हणजेच तब्बल ४ हजार वृक्षांचे वृक्षारोपण करण्यात आले.यावेळी नगरअध्यक्ष फिरोज दोसानी, नगरसेवक इरफान सय्यद, विजय कामटकर, शेख अफसर अली,सुमित खडसे,स.कार्यालय अधीक्षक संदीप गजलवाड, लेखापाल विशाल मरेवाड, का.अधिक्षक स्वाती गुव्हाडे, स. प्रकल्प अधिकारी देविदास जोंधळे, सीएलटीसी विशाल ढोरे, विजय शिंदे,सीसी मजहर शेख, स्वच्छता दूत गणेश जाधव,वैजंता सोनकांबले, ज्योती नलावडे, आशाताई नरवडे, तलवारे, ससाणे, जाधव, रामसिंग थुरवाल, विलास बोरकर, अनिल खडसे आदी उपस्थित होते.**

# लोहा शहरातुन देवाभाऊला पाठवल्या ८६१ राख्या ; महिला मंडळाचा अस्मरणीय उपक्रम

**तभा वृत्तसेवा**
**लोहा , दि. २२ ऑगस्ट -**

लाडकी बहीण योजनेसह महिलांसाठी अनेक शासकीय योजना राबविणारे राज्याचे मुख्यमंत्री देवेन्द्र फडणवीस उर्फ देवाभाऊ यांना रक्षाबंधन बहिण - भावाचे पवित्र नाते अजून दृढ व्हावेत यासाठी महिला मंडळानी ८६१ राखीची भेट पाठवण्याचा अस्मरणीय उपक्रम राबवला. यामुळे महिला मंडळात उत्सवाचे वातावरण निर्माण झाले आहे. अशी माहिती माजी लोकायुक्त नगराध्यक्ष गजानन सावकार सुर्यवंशी यांनी दिली.

भाजपाचे लोहा शहर मंडळ अध्यक्ष तथा माजी नगराध्यक्ष गजानन सावकार सुर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली भाजपा महिला आघाडीच्या लोहा शहराध्यक्षा सौ. भिकुताई पांडुरंग रहाटकर यांच्या पुढाकारातून लोहा शहरातुन राज्याचे



मुख्यमंत्री देवाभाऊ यांना ८६१ महिला भगिनींनी ८६१ राख्या भेट म्हणुन पाठविल्या.

यावेळी भाजपाचे शहर मंडळ अध्यक्ष तथा माजी लोकनियुक्त नगराध्यक्ष गजानन सुर्यवंशी, भाजपा महिला मोर्चाच्या शहराध्यक्षा सौ. भिकुताई पांडुरंग रहाटकर, प्रिया रुद्रावार, योगेश्वरी रहाटकर, निता पडवळकर, सुनंदा बच्चेवार, स्वाती चालीकवार, उमा गड्डम, सविता भोस्कर, कवटीकवार, लता किटे, वैशाली भातलवंडे, जळके, सुवर्णकार, साधना रहाटकर, सुष्मा किटे यांच्यासह मोठ्या संख्येने लाडक्या बहिणी उपस्थित होत्या.

# किनवट तालुक्याच्या दिग्रस गावचे सुपुत्र कर्तार साबळे थेट पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या भेटीला

**तभा वृत्तसेवा**
**किनवट, दि. २२ ऑगस्ट -**

किनवट तालुक्यातील दिग्रस गावाचा सुपुत्र आणि ग्रामपंचायत दिग्रसचे उपसरपंच कर्तार साबळे यांनी संसद भवन, नवी दिल्ली येथे थेट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेऊन किनवट तालुक्याचा व लबाना समाजाचा मान उंचावला आहे.

लबाना समाजातील हा तरुण कार्यकर्ता आपल्या कष्ट, चिकाटी आणि प्रामाणिक स्वभावामुळे अल्पावधीतच दिल्लीच्या राजकारणात लोकप्रिय झाला आहे. तत्कालीन खासदार आ. हेमंत पाटील यांच्या सहवासातून सार्वजनिक जीवनाची सुरुवात करताना त्यांनी राजकारण जवळून पाहिले. नंतर हिंगोली लोकसभा मतदारसंघात संधी मिळाल्यानंतर वर्ध्याचे खासदार अमर काळे यांनी त्यांच्या कार्यकौशल्याची दखल घेऊन त्यांना स्वीय सहाय्यक म्हणून नेमणूक दिली. ज्ञान चातुर्य, नम्र स्वभाव आणि लोकांशी सहज सलगी करण्याची कला यामुळे कर्तार साबळे यांचे अनेक खासदार व केंद्रीय मंत्र्यांशी मैत्रीपूर्ण संबंध निर्माण झाले



आहेत.

दिनांक २१ ऑगस्ट २०२५ हा दिवस त्यांच्या आयुष्यात ऐतिहासिक ठरला. याच दिवशी त्यांना संसद भवनात थेट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेण्याची संधी मिळाली. या भेटीदरम्यान कर्तार साबळे यांनी पंतप्रधानांना किनवट तालुक्याची समृद्ध सांस्कृतिक परंपरा, आदिवासी व बंजारा समाजाचे वैशिष्ट्यपूर्ण जीवन, तसेच लबाना समाजाचे योगदान याबाबत माहिती दिली. त्याचबरोबर त्यांनी पंतप्रधानांना किनवट तालुक्याला भेट देण्याचे निमंत्रण देण्याचे धाडस दाखवले.

या अभिमानास्पद भेटीबद्दल कर्तार साबळे यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. आ. भीमरावजी केराम, आ. बोंढारकर, माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार, जिल्हा बँकेचे माजी अध्यक्ष दिनकर दहिफळे, बाजार समिती सभापती गजानन पाटील मुंडे, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष संदीप केंद्रे, माजी उपनगराध्यक्ष श्रीनिवास नेम्मानिवार, बाजार समितीचे संचालक प्रेमसिंग साबळे, भाजपा नेते अजित साबळे, मंडळ अध्यक्ष स्वागत आयनेनिवार, उद्योजक मनोज तिरमनवार, माजी नगरसेवक शिवाजी आंधळे, आ. हेमंत पाटील यांचे संपर्क प्रमुख सुनील पाटील तसेच पत्रकार मधुकर अन्नेलवार, अरुण तम्मडवार, कचरू जोशी, यांनी त्यांना मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. छोट्याशा गावात उगवलेला हा तरुण आज दिल्लीच्या राजकारणात ठसा उमटवत असून, त्याने घेतलेली पंतप्रधानांची भेट किनवट तालुक्यासाठी अभिमानाचा क्षण ठरला आहे.

# गंभीर रुग्णावर यशोदा हॉस्पिटल सिंकदराबाद येथे उपचार

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड , दि. २२ ऑगस्ट -**

सिकंदराबाद येथील यशोदा हॉस्पिटलच्या टिमने आपल्या अचूक निदानातून आणि उपचारातून नांदेड येथील ३५ वर्षीय युवक शेख मोहम्मद शकील यांची आतड्याला दुखापत, छिद्र पेरिटोनिटिस, बहु-अवयव निकामी संसर्गावर यशस्वीपणे उपचार करत त्यांना जिवनदान दिले यासंदर्भात बुधवार दि. २० ऑगस्ट रोजी हॉटेल चंद्रलोक येथील आयोजित पत्रकार परिषेदेत डॉ. दुर्गेश साताळकर यांनी दिली

यावेळी माहीती देतांना त्यांनी सांगितले की, नांदेड येथील ३५ वर्षीय युवक शेख मोहम्मद शकील यांच्या आतड्यांना गंभीर मार लागल्याने त्यांच्यावर नांदेड येथील यशोसाई हॉस्पिटल येथे ऑपरेशन करून प्राथमिक उपचार करण्यात आले तदनंतर त्यांची एंकदरीत परिस्थिती लक्षात घेऊन त्यांना यशोदा हॉस्पिटल येथे धाडण्यात आले त्यावेळी त्यांचे किडणी फंक्शनिंग व्यवस्थित नव्हते तर क्रियेटीन ६ पेक्षा जास्त होते तसेच त्यांना डायलिसिस करावे लागत होते

**इलियोस्टॉमीसह लॅप्रोटॉमी उपचार**

पण आतड्याला दुखापत झाल्यामुळे रुग्णाला छिद्र पेरिटिनिटिस आणि क्रिएटीन ६ होता तर किडणी फंक्शनिंग डॅमेज झाली होती त्यामुळे डायलिसिसची आवश्यकता होती म्हणून रुग्णाला यशोदा हॉस्पिटल मध्ये हलवण्यात आले तेव्हा तो व्हेंटिलेटरवर होता आणि त्याला बीपी सपोर्टिव्ह औषधांसह डायलिसिसची आवश्यकता होती.पण नंतर उपचारानंतर रुग्णात सुधारणा झाली.... आता डायलिसिसची आवश्यकता नाही. व्हेंटिलेटर काढण्यात आले आहे आणि डिकॅन्युलेट केले गेले आणि पुनर्वसनासाठी जनरल वार्डात हलवले गेले.अलीकडेच त्यांच्यावर इलियोस्टॉमी क्लोजर प्रक्रिया अनियमितपणे पार पाडली आहे व रुग्ण आता सर्वसामान्य जिवन जगत आहे. यावेळी रुग्ण शेख शकील यांनी डॉ.दुर्गेश साताळकर, डॉ.मधूसूधन जाजू, डॉ.प्रसाद बाबू व यशोदा हॉस्पिटलच्या टिमचे आभार मानले

यशोदा हॉस्पिटल सिकंदराबाद संदर्भातीलअ अधिक माहीतीसाठी सहाय्यक व्यवस्थापक श्री अनिल जोंधळे यांच्याशी ९१५४९ ९५४६३ किंवा किरण बंडे ९१५४१६७९९७ या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे